# मृगजळांतलीं वादळं



रघुवीर सामंत

२६ जानेवारी १९५७

[पुष्प १७ वें]

अमरज्योति वाङ्मय

आर्ट कॉर्नर

— मृगजळांतलीं वादळं —

प्रिय मित्र

भालचंद्र भास्कर सामंत

यास सप्रेम

२४-१२-५६


रघुवीर सामंत

यांच्या

आगामी कलाकृति

'भेटेन पुन्हां!'

( स्वतंत्र-सामाजिक कादंबरी )

* देवांची दिवाळी *

( कथा संग्रह )

* दिल-जमाई *

( लघुनिबंध संग्रह )

* घरोघरच्या देवी *

( दुसरी, रंगावृत्ति )

( १९५७ मध्यें प्रसिद्ध होतील )

# मृगजळांतलीं वादळं

[ कथा-शब्दचित्र संग्रह ]

रघुवीर सामंत

अमरज्योति वाङ्मय

पुष्प १७ वें ]

[ डिसेंबर १९५६

सौ. स्नेहल र. सामंत बी. ए.
यांनीं
'अमर ज्योति वाङ्मय'
करितां
प्रकाशित केलें.

पुष्प १७ वें; डिसेंबर १९५५

पृष्ठें १२०: मूल्य २॥ रु.

पुरवणी वाचनाकरितां
९ वी, १०, ११ वी साठीं उपयुक्त
कुमार श्रेणी-मनोरंजन.

( सर्व हक्क लेखकाधीन )

श्री. व्यंकटेश द. सातोस्कर
यांनीं
'न्यू लाईफ प्रेस,' सेंट झेविअर स्ट्रीट,
परळ-मुंबई
येथें मुद्रित केलें.

## जुनें-नवें--

'वाळूंतील पाकळे' या पुस्तकाच्या ( १९३४ व ४५ ) दोन आवृत्त्या निघून त्या संपण्याचाहि योग आला. विश्वविद्यालयाच्या अभ्यासक्रमांत, त्यांचा ( मध्यें कांहीं वर्षांसाठीं ) समावेश झाला होता, म्हणूनच तें घडलें. त्याची तिसरी आवृत्ति काढण्यांत आतां व्यावहारिक स्वारस्य नाहीं हें ध्यानीं घेऊन, त्यांतीलच कांहीं कथा-शब्दचित्रं घेतलीं व त्यांत दोन तीन लेखांची भर घालून, प्रस्तुत 'मृगजळांतील वादळं' प्रकाशांत आणलीं आहेत. सामान्य वाचकां-प्रमाणेंच ९ व्या १० व्या इयत्तांच्या विद्यार्थ्यांच्या हातीं पुरवणी वाचन म्हणून हि हें पुस्तक निःसंदेहपणें देतां येण्यासारखें आहे, ही अपेक्षा व खात्रीहि या प्रकाशनामागें आहे.

— प्रकाशिका

--अनुक्रमणिका--

१ दर्यावरील वादळ
२ माझी देवो
३ मृगजळ
४ समता
५ खडा
६ कोसळणारा वाडा
७ जगावेगळं
८ देऊळ
९ वासांसि जीर्णानि
१० लवंग्या फटाकयांना आग
११ पूर्वजांची आठवण
१२ शारूखाचा शेवट
१३ देहान्त
१४ मानवी भूतदया
१५ त्या पेल्यांतलं अमृत
१६ सौजन्याचं मोल

'समता', 'खडा' यांना 'सोलोगॉब'च्या कथांचा आभार आहे.
'पूर्वजांची आठवण' ला लॉरेल हार्डीच्या चित्रकथेचा आभार आहे.

## प्रकाशित

## सामंत वाङ्मय

*१ हृदय--[शब्दचित्रें; पृ.१८० : मूल्य रु.३; प्र.आ.१९३२;द्वि.आ.१९५०]

*२ वाहूं गेलें पाखरूं-[ कथा-शब्दचित्रें : पृ.१६० : प्र.आ.१९३४; द्वि. आ. १९४५; संपली ]

३ तुर्गेनोव्ही वेणी-[ रूपांतरित रशियन कथा-पृ. १८० : प्र. आ. १९३५]

*४ पणत्या-[ लघुनिबंध-पृ. १०४; प्र. आ. १९३८; संपली.]

५ आजचीं गाणीं-[ सांघिक व गेय गीतें-पृ.१२४; मू. १रु.प्र.आ.१९३९]

*६ मालकेराईक प्राणी-[ व्यक्तिचित्रें-पृ.१२०; मू. रु.२॥;प्र.आ.१९४०; द्वि.आ.१९५०]

७ तारांगण-[ 'चित्रग्रंथ'-पृ. १०४ : प्र. आ. १९४० संपत आली. ]

८ रजःकण-[ कथा-निबंध; पृ.१४०; मू.रु.२ : प्र.आ.१९४१: संपत आली]

## -- उपकारी माणसें —

( 'सागा' पद्धतीचा मराठीतील पहिलाच प्रदीर्घ स्वतंत्र समाज-पट )

[ पृष्ठें डेमी-७८०+ का. २२८ : डेमी ग्रंथालय अँटिक प्रत रु.; १२।१२ ]

९ प्रवासांतील सोबती-[ खंड १. पत्रात्मक कादंबरी; प्र. आ. १९३८ ]

१० अभ्र-पटल-[ खंड २. कथनात्मक कादंबरी; प्र. आ. १९३८ ]

११ आकाश-गंगा-[ खंड ३. आत्मनिवेदनात्मक कादंबरी; प्र. आ. १९४० ]

१२ घरोघरच्या देवी-[खंड४. नाट्यात्मक कादंबरी;प्र. आ. १९४४;संपली]

*१३ आदर्श कृषीवल-[ कृषीवल चरित्र-प्रयोग; पृष्ठें २१०; मूल्य रु. ३॥; प्र. आ. १९५५ ]

१४ तांडा-[ कथा-शब्दचित्रें-पृष्ठें १६०; मूल्य रु. २॥ प्र.आ.११४५ संपली]

१५ जीवन-गंगा-[ मनोविश्लेषक कादंबरी;पृ.२२०; मू. रु. ४॥ प्र.आ.१९४७)

१६ रक्त नि शाई-[ गेय व सांघिक गीतें पृ.१२४;मू. रु.१॥ प्र.आ. १९४७)

*१७ आम्ही खेडवळ माणसं-( ग्रामीण कादंबरी; पृष्ठें १४४; मूल्य रु १॥ प्र. आ. १९४८ )

*१८ आम्हांला जगायचंय्-( आजचा शब्दचित्रपट; पृष्ठें२२०; मूल्य रु.३॥ प्र आ. १९५५ )

* ही पुस्तकें शालेय व विश्वविद्यालयीन अभ्यासक्रमांत वेळोवेळीं समाविष्ट.

याशिवाय बालवाङ्मयाचीं सुमारें १२ पुस्तकें प्रकाशित आहेत.

# दर्यावरील वादळ

आकाश ढगांनीं व्यापलं होतं; पाऊस थोडा पडतच होता.

तरी त्याला इतकी भीति वाटली नाहीं; त्याला वाटलं-' हवेंतील हा फरक नेहमीं दिसून येणाऱ्या क्षुल्लकांपैकींच... '

देवगड बंदरावरील किनारा अस्पष्ट होऊं लागला; मेघाच्छादित सूर्य डोक्या-वरून कलला असल्याची कल्पना करतां येत होती, तरी तो मुळीच दिसत नव्हता.

आज आचऱ्याकडे वळावयाचा दिवस नव्हता. ' वेगावती ' मालवणच्या वाटेला जोरानें चालूं लागली.

पण थोडा वेळ गेला नाहीं, तोंच—

एकएक अनपेक्षित घडूं लागलं. पावसाच्या सरीवर सरी...

हां हां म्हणतां दिशा पूर्ण धुंद झाल्या; समुद्र खवळला...

एक लाट.. दुसरी लाट. .मध्यें एक एक ताड खोली !

सोसाट्याचा वारा; गडगडणारे ढग; धडाधड उडी घेणाऱ्या राक्षसी लाटा ! सर्वांचा सारखा आवाज निसर्गाचं विक्राळ स्वरूप दाखवीत होता !

' पण मागें फिरण्यांत तरी आतां काय अर्थ ? फारच वाटलं तर आचऱ्या-कडे वळूं ! ' उमरखानानें ठरविलं.

आणि वेळही तशी भीतिजनकच होती !

मशिनचा गडगडाट; आरडाओरड करणाऱ्या, क्षणोक्षणीं मृत्यूच्या दारा-वरून मागें वळून पाहणाऱ्या, लहानमोठ्या प्रवाशांच्या हृदयाचा धडधडाट !

उमरखानाची ' वेगावती ' आपला वेग पराकाष्ठेचा वाढवून जिवासाठीं पळत होती; चेंडूसारखी वर खालीं उडविली जात होती !

दर्यावरच काळ्याचे पांढरे झालेल्या आपल्या केसांवरून हात फिरवीत, म्हातारा मधून मधून खलाशांना सूचना देत होता.

प्रवाशांना शांतता राखण्यास ओरडून सांगत होता.--

शांत चित्तानें चोहीकडे लक्ष देतांना त्याची स्वतःची वृत्ति मात्र दर्याच्या नेहमींच्या गांभीर्याची होती !

हाताला लागतील तीं संरक्षक वलयं गळयाभोंवतीं अडकवून, कांहीं जण देवाची प्रार्थना करीत होते; कांहीं गर्भगळित होऊन, जवळ जवळ बेशुद्ध स्थितींत पडून होते; कोणी एकमेकांना घट्ट मिठ्या मारीत होते; कांहीं असहाय्यतेनें, दीनपणें ओरडत सैरावैरा पळत होते.

क्रूर लाटा 'वेगावती' वर हल्ला चढवीत होत्या; 'वेगावती' त्यांच्यावर नाचावयाचा प्रयत्न करीत होती !--

एंजिनजवळ खलाशी; कठड्याजवळ खलाशी; पाणी उपसावयास खलाशी--

त्यांच्या जिवावरच कप्तान होकायंत्र व नकाशा संभाळून होता !

आणि असा मुठींत जीव धरून, निसर्गशक्तीशीं झगडत, वेगावतींतील अनेक हताश जीवाचा त्या क्षणींचा प्रवास चालला होता !

सांज झाली, दाट काळोख पडला; तरी मालवण बंदर अजून लांबच होतं.

कुद्ध निसर्गाशींच ती झटापट होती; सर्वजण भवितव्याविषयीं अगदीं निराश झाले होते.

बोटींत चौफेर नजर टाकतांच वृद्ध उमरखानाचं हृदय हादरलं !

एका बाजूस एक तरुण आपल्या सुंदर पत्नीची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत होता--

दुसऱ्या कोपऱ्यांत, एक चारसहा महिन्यांचं मूल आपल्या रडणाऱ्या आईच्या स्तनांवर हात ठेवून, निश्चित दुग्धपान करीत होतं.

तिसऱ्या...

पण म्हातारा दचकला ! त्यानें दृष्टीच बाजूला फिरविली.

जवळ पडलेला कर्णा उचलून तोंडाला लावीत, सर्वांना उद्देशून तो म्हणाला, "शांत व्हा ! धीर धरा ! अल्ला आपल्यावर कृपेची खैरात करील !"



आशेच्या त्या लहानशा भांडवलावर पुनः साऱ्यांची धडपड सुरू झाली !

लोकांची स्वतःच्या जिवासाठीं, वेगावतीची व म्हाताऱ्या उमरखानाची हजारों जीव बचावण्यासाठीं !...

होकायंत्र व नकाशा यांचा ताळा बसवीत व वेगावतीला इष्ट गती देत, उमरखान आपले दांत पडलेले ओठ हलवून, वर पहात पुटपुटला, "या अल्ला ! परवर दिगर !"

वेगावती ताडताड उंच लाटांवर हेलकावे खात होती; उमरखानाचं हृदयहि त्याच स्थितींत...

उमरखान कप्तान होकायंत्र पाही, नकाशाचं निरक्षण करी; घड्याळ व मिटर पुन्हां पुन्हां पाही; नि सुकाणूंची खबर घेत, तो सर्वांना हुकूम सोडी !

धडधडत्या हृदयानें सर्वांचा असा बराच वेळ गेला !...

पावसांतून आचरें बंदराचे दिवे अंधुक अंधुक दिसूं लागले; पण त्याला वाटलं,-'आतां सरळ मालवणपर्यंतच बोट दाबीत न्यावी'.

बोटीला आणखी वेग देऊन त्यानें त्याप्रमाणें मोर्चा फिरविला.

कसल्याशा संशयानें त्यानें डोळ्याला दुर्बीण लाविली ...

वेगावती वेगानें लाटांशीं झगडत धांवत होती !

जास्त न्याहाळून पहातांच, तो एकदम बिचकला, त्याला मध्यभागींच अगदीं दूर अंतरावर एक बोट असावी अशी खात्री वाटली.

दुर्बीण बाजूस करून त्यानें एंजिनड्रायव्हरला व खलाशांना हुकूम देण्यास सुरवात केली-"मीटरपर ध्यान रखो. संभालो !"

वेगावती तशी वाट काटीतच होती; इतक्यांत--

इतक्यांत, दुसऱ्या कोणत्या तरी बोटीचा कर्कश पण लांबचा अस्पष्ट भोंगा उमरखानाच्या एकदम कानीं पडला !

डोळ्यापुढें ठेवलेल्या दुर्बिणींतून त्यानें सारखी पहाणी सुरू केली.

प्रचंड लाटा अजून भेवडावीत होत्या; पावसाची अव्याहत सरसरहि तशीच चालू होती...

भोंग्याच्या आवाजाच्या दिशेला त्याला दिसलं--अगदीं सिंधुदुर्गाजवळच्या खडकाशेजारीं वरखालीं होणाऱ्या एका बोटींचे दिवे तळपत होते.

त्यानें पुन्हां निरखून पहाण्याचा प्रयत्न केला;--तो दचकला! त्या बोटीचा पुढील भाग पाण्यांत शिरल्यासारखा दिसत होता.

राक्षसी लाटा तिच्याशीं उंदरामांजरांचा खेळ खेळत होत्या!

उमरखानानें आपल्याशींच विचार केला. त्यानें सुकाणूं संभाळून सिंधु-दुर्गाजवळ वेगावतीला वेगानें सोडलं.

सुरक्षितपणें जितक्या जवळ नेतां येईल तितकं नेल्यावर, त्यानें वेग कमी करून, बोटीला अगदीं मंद गतीनें चालविलं.

पुन्हां दुर्बीण पुढें येतांच, त्याला त्या दुसऱ्या संकटग्रस्त बोटींतील हाल-चाल दिसूं लागली--त्याला कांहींसा संशय येऊन तो पुन्हां निरखून पाहूं लागला.

तिचा पुढील भाग फुटून आंत जोरानें पाणी शिरत होतं.

आंतील जीवांच्या अस्पष्ट करुण किंकाळ्या ऐकूं येत होत्या.

दिव्याच्या खुणांनीं त्यानें माहिती काढण्याचा प्रयत्न केला.

ती बोट--'जसवंती' हें कळतांच तो पुनः एकदां दचकला!

तिच्या तरूण कप्तानानें शिकस्त करूनहि रुर्वे आटोक्याबाहेर गेलं होतं.

सिंधुदुर्गाजवळच्या एका खडकानें तिला आपल्याजवळ ओढलंच.

शेवटीं निराश होऊन संरक्षकवलयं वाटलीं होतीं. होड्या सोडून जीव जगविण्याचा प्रयत्न चालू होताच. पण आता बाहेरील मदतीशिवाय तिला आशा नव्हती.

जसवंतीचा पुढील अर्धा अधिक भाग पाण्यांत शिरला होता--

म्हणजे सर्वच आटोपलं होतं.

वेगावतींतही आरडाओरड सुरू झाली.

उमरखानाला क्षणभर मोह पडला. त्यानें खुणेनें संदेश पाठविला--"मी तुम्हांला सोडविण्याचा जातीनें प्रयत्न करतों .."

पण उत्तर आलं--"नको, नको! अल्ला दयाळू आहे! तुम्ही जा!"

उमरखान दचकला. त्याचे डोळे एकदम उघडले.

क्षणभर खवळलेला बेफाम दर्या जणूं पुन्हां शांत झाला.



'वेगावती येथें थांबविण्यांत आपण अक्षम्य चूक करीत आहों' हें त्यानें तत्काळ ओळखलं.

जवळ जवळ पहाटे चाराची वेळ ती! खडकांनीं घेरलेला सिंधुदुर्ग समोर पसरलेला नि दृष्टी समोरच एका बोटीला होत असलेला तो अपघात!

उमरखानला क्षणभर विचार पडला... 'वेगावतीला मालवण बंदरांत घालावी तर खवळलेल्या समुद्रांत ठिकठिकाणचे खडक दगाहि द्यायचे!'

'त्यापेक्षां वेंगुर्ल्यापर्यंतच जावं! खडकापेक्षां खवळलेला समुद्र बरा!'

त्याची छाती खुल्या दर्याला घाबरणारी नव्हती!

शेवटीं, दोन संरक्षक नावा व आठ कसलेले खलाशीच फक्त खालीं उतरवून, वेगावती पुढें सोडण्यास त्यानें हुकूम दिला.

वेगावतीनें विचारपूर्वक भोंगा फुंकला;--नि ती बाजूला झुकली!--

अर्ध्या बुडालेल्या जसवंतीनें तिला दुःखपूर्ण उत्तर दिलं!!--

पुन्हां वेग वाढवून वेगावती जिवासाठीं लाटांवर उड्या मारीत भरधांव धांवूं लागली अजून तिला वेंगुर्ल्यापर्यंत अंतर काटावयाचं होतं.

तिच्यातले कांहींजण ओरडूं लागले,--"त्या बोटींतील माणसांना वांचवा! त्यांना वांचवा!"

पण उमरखानानें तिकडे मळींच लक्ष दिलं नाहीं!

त्याचं हृदय मात्र पूर्वीपेक्षां जास्त धडधडत होतं...

तो हुकूम देतां देतां, मागें वळून जसवंतीकडे पाही.

जसवंती जवळ जवळ बुडालेली लांबूनच पाहून त्याचे डोळे भरून आले; पण पुन्हां भानावर येऊन, त्यानें दुर्बीण बाजूला केली नि डोळे पुशीत, तोंडाला लावलेल्या कर्ण्यांतून त्यानें हुकूम दिला, "बीच बाजू, धीरसे!"

असाच कांहीं वेळ लाटांवरील प्रवास चालू होता.

निवतीचे खडक दिव्याच्या सहाय्यानें टाळून, तो उजाडण्याच्या सुमारास वाट काढून बराच पुढें आला.

शेवटीं, दुर्बिणींतून पहात, कर्ण्यांतून लोकांना म्हणाला, "जवळ आलं वेंगुर्लें आतां आपण मृत्यूला जवळ जवळ जिंकलंच!"

वेंगुर्ले बंदर दिसूं लागलं, बोटींतून सर्व बाजूंनीं आनंदोद्गार ऐकूं येत होते.

उमरखानानें त्या मघांच्या तरूण जोडप्याकडे पाहिलं; दोघांच्याहि चेहऱ्यावर आनंदाची छटा पसरली होती. एकमेकांकडे पाहून गुलगुल गोष्टी करीत तीं दोघं हंसत होतीं.

दुसऱ्या कोपऱ्यांतील माता, दुग्धपान करणाऱ्या आपल्या पदराखालच्या मुलाचे प्रेमभरानें मटामट मुके घेत होती!

त्यालाहि आनंद झाला; त्यानें आपल्या मोठ्या पांढऱ्या मिशांवरून अभिमानानें हात फिरवून, समाधानपूर्ण स्मित केलं. पण—

पण आतां त्याच्या हृदयाला–आंत वेदना होऊं लागल्या!

तीव्र भावना वितळून त्या त्याच्या डोळ्यांतून ओघळूं लागल्या!––

भेटावयास आलेल्या लोकांच्या, बोटीवरील लोकांशीं खुशालीच्या गप्पा चालू होत्या; संकटमुक्त लोकांतील कांहीं स्वगृहीं आप्तेष्टांना सुखरूपपणें भेटण्याचा आनंद उपभोगून, पुनः जसवंतीची पुढील बातमी ऐकावयास दुपारच्या सुमारास बंदरावर आले होते.

संकट संपल्यावर विचार करण्याची पद्धति जरा निराळीच असते!—

जसवंती बुडाल्याची आतां वेगावती बोटींतील सर्वांना आठवण होऊं लागली. इतर वयस्थ आप्तेष्टांनीं तर बोलण्यांत पुढाकारच घेतला होता––

"काय हो भयंकर प्राणहानि ही!"

"तिचो कप्तान बिचारो मोठ्या संकटांत होतासो दिसतां?"

"त्या वेळचीं तीं पोराबाळांचीं काळजाक भिडणारीं वोराडणीं!"

"नकोरेऽऽदेवा तां...! काळीज फाटतां तां आठवून!––"

"त्या वेळेक तुमची बोट पण तिच्या बरीच जवळ गेल्ली होतीशी दिसतां? वांचवायचो यत्न केलो असतो तर बरां झालां असतां!"

"अहो, कप्तानसाहेबांची इच्छा दिसली नाहीं त्यांना वांचविण्याची. आम्ही पुष्कळ ओरड करून पाहिली!"

"स्वार्थ! दुसरां काय? सबसे प्यारा अपना जान!"



"तर काय?— घाबरलोच तो! तुमच्या वरडीकडे त्यांचा कित्याक लक्ष जातलां? वारे वा कप्ताना!"

जवळ काम करणारा एक म्हातारा खलाशी हें ऐकत होता––

त्या खलाशाला आतां रहावेना; तो त्या फेटेपगडीवाल्या कुटाळकंपूकडे रोखून पाहात उपहासानें म्हणाला– "खरा हां सायबांनु तुमचचां तां हुननां?... जसवंतीक... भितुरल्या लोकांक...आनि तिच्या कप्तानाक, सिंधुदुर्गाहार सोडौकच व्हायां व्हतां, खरां!"

इतक्यांत, मागून एक मालबोट आली. तिकडे पाहतां पाहतां तो म्हातारा खलाशी आश्चर्यानें ओरडला–"अरे? करीमा! इलंस तूं?––"

बोट थांबतांच, दोन्ही बोटीमध्यें टाकलेल्या फळीवरून करीमनें आणखी दोघांच्या मदतीनें पांढऱ्या पोशांखातील एक प्रेत आणलं

पांढरा पोशाख रक्तानें सगळा लाल व ओला चिंब झाला होता.

उमरखान आशेनें पुढें गेला–

करीमच्या खांद्यावरील प्रेत पाहतांच, तो मोठ्यानें विव्हळला. त्याच्या डोळ्यांतून सारखे अश्रू ओघळूं लागले.

मेलेल्या तरुणाचा चेहरा उमदा दिसत होता. जसवंतीचा तरुण कप्तान लतीफच होता तो.

"कप्तान सायबानुं!" करीम तांडेल शांत चित्त करण्याचा प्रयत्न करून खिन्न स्वरानें म्हणाला, "हम लोकोने बहोत पर्यत्न किया! लेकिन् जसवंती और अंदरके आदमी आंखके सामे डुबगया! और अदीमुवीं दोतीन मानसांना हातमे मिला! भिंगा, सदो,... बुडो ममद, लाटमे दिसे नैंसे हुवे! हम लोकबी बुडने-केच थे! पणून लगबग म्हालबोटके तरफ आ पोंचे!"

उमरखानानें गुडघे टेकले; त्या शुभ्र पोषांखांतील प्रेताच्या तोंडावरून हात फिरविला; प्रेमानें हृदय भरून आल्यामुळें त्यानें ते दोन्ही निर्जीव हात धरून त्याला गदगदां हलविलं. त्यानें आपली अश्रुपूर्ण केविलवाणी दृष्टि एकदां शोधक-पणें करीम तांडेलावर रोखून, पुनः लतीफच्या प्रेताकडे फिरविली, व मग तो

त्याच्या शांत पण विशाल छातीवर हात ठेवून व खालीं मान घालून निमूटपणें अश्रू ढाळूं लागला ! इतक्यांत—

इतक्यांत, त्याच्या हाताला लतीफच्या आंतील खिशांत कांहींसं घट्ट लागलं. काढून पाहिलं, तों ती उमरखानाच्या अगदीं पूर्ण ओळखीची चीज होती !

त्याला आठवलं; आपणच...

" लतीफ सायबान् एक औरतकू बुडते बुडते बचाई. " करीमनें उगरखानाच्या अस्वस्थ हालचाली पाहून, शेवटीं पुढें सांगण्यास सुरवात केली; त्याच्या तें अगदीं जिवावरच आलं. " इतनेमं एका छोट्या पोराक बचानेकू वापस गया !... पणून ऊस बखत दमनेसं फतरापर वो आदळा; हमारे पर्यत्नकू यश आया नै ! एक अल्लाक मालुम कायतां ! "

" वगल्यात गावकरानुं ? " प्रश्नसूचक चेहरा करून मघांच्या शिष्टांपैकीं एक हळूंच म्हणाला, " वेळेर मदत मिळूक होई होती हो ? आमचा तरी तांच म्हणणां ? "

" होय सायबानू ! " तो मघांचा म्हातारा खलाशी या कुटाळकंपूच्या पाळतीवरच होता जणूं–

तो पुढें येऊन त्यांना म्हणाला, " मदत नाय म्हणूनच मेलो तो ! तरणाबांड आसा बगा. नाय ? गतसालींच त्याचां लगीन झाल्लां. बिचाऱ्याचां दोन म्हैन्याचां चेड्डूं आन् बाईल घरांत रडत बसतली आतां ! "

खिशांत सांपडलेली ती जुनी डबी उमरखान उघडून पहात होता—

तींत दोन फोटो जवळजवळ चिटकविले होते. त्याखालीं पुठ्ठ्यावरच्या मोकळ्या जागेंत शाईनें लिहिलेल्या ,तीन चार ओळी पाण्यामुळें थोड्या पुसट झाल्या होत्या. त्या वाचतां वाचतां त्यानें इतका वेळ आंवरून धरलेला आवेग त्याच्या नेत्रांतून ओसरूं लागला. त्याच्या हातून ती डबी गळून पडली. तो डोळे पुसत बाजूच्या कठडयाकडे गेला.

उमरखानाच्या हालचालींकडे लक्ष न देतां, वार्ताप्रिय कुटाळकंपूंची ती मचमच कदाचित् तशीच चालणार, असं पाहून तो खलाशी म्हणाला, " आमच्या कप्तानसायबान् त्यांकां मारल्यान् असांच तुमचां हुननां असा ना ? होय, त्यांच्यानीच त्यांका मारल्यानी ? पण सायबानुं, तो कप्तान–लतीफसायब्–आमच्या उमरखान सायबांचोच एकुलते एक झील ! "



आणि एका क्षणाचाहि विलंब न लावतां, त्यानें तेथें पडलेली ती उघडी फोटोकेस झटकन् उचलून त्यांच्या हातीं देत म्हटलं, " माकां म्हाताऱ्याक तुमच्यासारखां लिंव्कवांचूक कसां यतालां ? हंयसर काय लिलांसां तां सांगतलांत माकां ? "

फोटोखालचा तो मजकूर ! शाईचीं पुसट अक्षरं होतीं––

" बाबा, तुम्ही दिलेल्या आपल्या फोटोखालींच या घाईंत दोन ओळी... मग शेवटपर्यंत जोराचा प्रयत्न !...

' वेगावती ' घेऊन तुम्ही जवळ आलांत, तेव्हां प्रथम थोडा मोह झाला !

पण मी तुमचा बेटाच ना ?. .म्हणून ' नको ' म्हणालों.

तो आपल्या दोघांच्या बोटींचा...नव्हे, असंख्य जीवांचा प्रश्न होता, बाबा !

हमिदेला सांगा हं घरीं ! म्हणावं ' कर्तव्य प्रथम ! '

आतांपर्यंत दर्यावर अनेक वादळं झालीं––गेलीं ! समुद्र शांत झाला !

तुमचे केसहि काळ्याचे पांढरे झाले आहेत !

...पण आतां, शेवटचं, हेंहि, माझ्या बाबांवरील, माझ्या दर्यावरील –वादळ ! .."

---

# माझी देवी

मी स्वतः माणूसघाण्या आहे, अशांतील प्रश्न नाहीं; पण माझी संध्या फारच प्रेमळ ! सर्वांवर प्रेम करीत असणें हा तिचा स्वभावच !

आमच्या सखू मोलकरणीचा मुलगा रडत रडत रांगूं लागला, तरी तिनें त्याला चटकन् वर उचलून घ्यावें. त्याचें तोंड स्वच्छ पुसून मटकन् त्याचा एक पापा घ्यावा. आम्हांला अजून आपल्याकडे आकर्षिणारा मधला दुवा नव्हता. म्हणून दुधाची तहान ताकावर भागविण्यासाठींच नव्हतें हें सारें; तिला तें मनापासून आवडे.

मला हें प्रथम कसेंसेंच वाटे. पण नंतर नंतर तिच्या नादानें मीहि कधीं-कधीं टिचक्या वाजवून, वाकड्या तिकड्या माना हलवीत त्या बाळाबरोबर खेळूं लागे.

आमचें हें कौतुक चाललें असतां, मध्येंच काम आटपून सखू परतली आणि आनंदानें हसूं लागली, तर मी प्रयत्न करूनहि पटकन् ओशाळावें व बाजूस सरावें. पण संध्येनें आपलें 'च्यकॉव् च्यकॉव्' करीत त्याच्याकडे पहावें; त्याला हंसत हृदयाशीं कवटाळावें. सखूनें त्याला घेण्यासाठीं हात पुढें केले, तर तिनें ओरडावें-"ए बया, ते हात पूस त्या टॉवेलला आधीं; ओल्या चिंब हातानें घेणार आहेस होय त्याला ?"

सखूलाहि आपल्या धनिणीचें कौतुक वाटे.

आणि आपल्या घडीमाणसांशीं संध्येचें वागणें असेंच प्रेमळ–

सखूबरोबरच तिनें भांडीं हिसळावीं. मोलकरणीबरोबर मोलकरणीचीं कामें करावयास तिला लाज वाटत नसे. स्वयंपाकीण ठेवलेली; पण अर्धें जेवण संध्येनेंच करावें. मी तिला रागावण्याचा प्रयत्न केला, तर प्रकरण उलट माझ्याच आंगलटीं येई.



आमची शहरांतली जागा ती कितीशी ? पाहुणेमंडळी एखाददिवसापेक्षां जास्त राहिली, कीं मला मनांतून थोडा राग येई; पण हिचें आपलें संथ चाललेलें ! आज हा विशेष जिन्नस केला, तर उद्यां तो !

पाहुणा निघून गेल्यावर त्याच्याविषयीं एखादा उद्गार काढला, तर तिनें सौम्यपणेंच मला कांहींसा विरोध करावा–" काय झालं, एखादा दिवस जास्तकमी झाला तर ? तुमची सुस्थिति आहे म्हणूनच कोणी येणार–रहाणार तुमच्याकडं !"

" अग, तस नव्हे, संध्या ! पण तुला त्रास नाहीं का होत ? "

" हो तर, बाहुलीच कीं नाहीं मी कचकड्याची ?... आपल्या माणसांसाठीं नाहीं त्रास सोसायचा तर कुणासाठीं ? " तिच्या चेहऱ्यावरील प्रेमळ राग राहिला कीं माझे सगळे शेरे मी ओठांतल्या ओठांत गिळून टाकी.

दोनप्रहरीं ऐन भुकेच्या वेळीं एखाद्या भिकाऱ्यानें भाकरतुकडा मागितला तरी तिनें सबंध पानच वाढून पाठवावें.

मग एखाद्या पाहुण्याची तर गोष्ट कशाला ?

त्या दिवशीं मात्र तिनें कहर केला.

आमच्या विमलचा नवरा आला होता आमच्याकडे कांहीं कामासाठीं. गाडी अवेळीं आल्यामुळें त्याला जवळ जवळ एक वाजला घरीं यायला. वास्तविक संध्या आजारी म्हणूनच मी घरीं सांपडलों. स्नान, जेवण, सारें व्हायचें होतें, त्याचें !

मी हळूंच आंत गेलों व बाईंना सांगितलें, ' भातपिठलं पापड–लोणचं कांहीं जिन्नस झटपट करून, लौकर त्यांना जेवायला वाढा. '

त्यांची आंघोळ झाल्यावर त्याच्याशीं मी गप्पा मारीत बसलों. पण बराच वेळ झाला, तरी आंतून वर्दी येईना.

म्हणून उठून आंत स्वयंपाकघरांत गेलों; तों काय ? खुद्द आमच्या सौ. संध्याबाईच आपल्या पुऱ्या लाटीत आहेत ! मी तर थक्कच झालों.

तरी त्यांतूनहि मला किंचित् हसूं आल्यावाचून राहिलं नाहीं !

मीं जवळ जाऊन तिच्या गालाला हात लावून पाहिलें; अंग थोडें गरमच होतें. मी तिच्याकडे दृष्टि वळविली.

हातांत पुढें मागें होणारी लाटणी; पीठ पसरलेल्या पोळपाटावर कणकेची गोळी; चेहरा कांहींसा लालबुंद झालेला; केसांच्या बटा मागें सारतांना कपाळाला पीठ लागलेलें; अशा थाटांत बाईसाहेब शेगडीवरल्या कढईजवळ बसलेल्या; आणि हातानें मधून मधून एकादी पुरी कढईंत सोडीत आहेत—

मी थोडया रागानेंच पलीकडच्या स्वयंपाकीणबाईकडे डोळे फिरविले.

"त्यांना कां रागावतां?" पदरानें तोंड पुसत, हंसून संध्या म्हणाली, "मीच आलें हो उठून! घरांत कधीं नाहीं तो पाहुणा आला अन् मी बिछान्यावर लोळत पडूं वाटतं?"

"अग पण, संध्या, तुझ्या जिवाला बरं नाहीं..." मी माझी बाजू मांडावयास लागणार, तों ती ओरडली—"बरं, बरं. तुमचीच एकटी बायको! पुरे, बरं का कौतुक!... आधीं त्यांना आंत बोलवा पाहूं! पान तयार करतें, तंवर!"

आम्ही दोघे आंत आलों, तों पाटावर ताट वाढून ठेवलें होतें. कोबीची भाजी, बटाटयाचे काप, चटणी, पुऱ्या, रसाची आमटी, वाटीभर केशरी दूध;..मला खरोखरच धन्य वाटलें, त्यावेळीं!

"वहिनी आजारी आहेत म्हणत होतास ना रे तूं?" अण्णा पाटावर बसता बसतां मला म्हणाला.

"अरे, आतांसुद्धां थोडा ताप आहे अंगांत...पण माझे ऐ..." मी तिच्याकडे पहात म्हणालों.

"त्यांचं काय ऐकतां, आण्णा?... आतां पस्तीशी आली तरी त्यांना वाटतं, आपली बायको कुठं ठेऊं न् कुठं नको!" ती मान थोडी उडवून हंसत मुखानेंच म्हणाली.

"नाहीं, पण वहिनी, तुम्ही आजारीपणांत इतका त्रास घ्यावयाचा नव्हता—" अण्णा भातावर आमटी ओतीत सहानुभूतीनें म्हणाला.

"पण अण्णा, तुम्ही कधीं बरं येणार असे आमच्याकडे? विमलवंन्संच्या लग्नाला आतां पांच वर्षं झालीं. पहिल्या दिवाळसणाला आलांत तेवढंच कीं नाहीं? त्यानंतर जे दिल्लीला गेलांत ते हे आज येताहां! मी म्हणतें, थोडा त्रास पडला



तर काय झालं?—माझं दुखणं हें नेहमीचंच आहे. देवानं शरीरच थोडं रोगी बनवलं, त्याला काय करणार?"

त्यावर मग तिच्या प्रकृतीविषयीं वगैरे प्रश्नोत्तरांत विषय बदलला.

थोड्याच दिवसांपूर्वीं एका प्रमविवाहित जोडप्याघरीं गेल्यावर रात्रौ जेमतेम पिठलं भात खाऊन परतल्याची, न विसरण्यासारखी आटवण मला होती. आणि त्यामुळें माझ्या संध्येशीं त्या प्रसंगाची तुलना करतां करतां माझी छाती अभिमानानें फुगून आली. माझा कांहीं प्रेमविवाह झाला नव्हता. पण तिच्याकडे पाहिलें कीं धन्य वाटे मला! खरेंच, त्या वेळीं संध्येकडे पाहतां पाहतां मला वाटलें, जावें नि तिला कडकडून मिठी मारावी.

सगळ्याच हकीकती अशा सांगत बसलों तर गोष्टीची होईल कादंबरी.

तथापि एवढें मात्र खरें, तिच्यावरील माझ्या या निष्ठेमुळें मला ती जें जें करी तें तें योग्य, खरें वाटे. नाहीं म्हणावयास एका बाबतींत मात्र मी अजूनहि संशयातच गुरफटलों होतों.

तिची देवावर अनन्यभक्ति!

सोमवार, मंगळवार, गुरुवार, शनिवार, आठवड्यांतील सगळे वार तिला पुरत नसत. प्रकृति निसर्गतः नबळी; तरी एकादशी, चतुर्थी कधीं चुकत नसे. चातुर्मास्य आला कीं, तिची कोण धांदल! नाना तऱ्हेच्या वासाबिनवासांच्या फुलांच्या लाखोल्या मोजण्यांत आणि वाहण्यांत तिचा वेळ जाई. सोळा सोमवाराचें तिच्या प्रकृतीबाहेरील व्रत, मी तिला 'नको नको' म्हणत असतांहि ती करीत असे. संकष्टीला ती नुसत्या पाण्यावर राहिली कीं माझा जीव कासावीस होई!

देव नाहीं, सब झूट, असें म्हणण्याची माझी कधींच छाती झाली नाहीं. पण या सर्व गोष्टी पहायला आणि त्यांचा स्वीकार करून पुण्य वांटायला देव आहे तरी का मुळांत, असा संशय मात्र मला वारंवार पछाडीत असे.

तरी तिला तसें उघड सांगण्याचें मी कधींच धाडस करीत नसें. उलट तुळशीला एकशेंआठ प्रदक्षिणा घातल्यावर ती निरंजन ओवाळीत डोळे मिटून ग्यालरींत उभी राहिली, कीं मला तिजकडे पहात रहावेसें वाटे.

आणि कधींकधीं तर मी मनाशी म्हणावें, "खरेंच मला असल्या भावना

कधींच कां होत नाहींत ? असला आनंद मला कधीं मिळेल का ?"

तिच्या हातालाच यश आहे म्हणतात; आणि त्यावर माझा विश्वास आहे. मी डॉक्टर नसलों तरी तिला शेजारी लोक डॉक्टरीणबाई म्हणतात. कोणाच्या प्रकृतीला कोठें 'खुट्' झालें तरी संध्या आपलें काम बाजूस सारून, आपली देशी औषधींची पिशवी घेऊन तिकडे धांव ठोकणार. आणि एकदां तिकडे गेली कीं मग तिला आपल्या प्रकृतीचा, माझा साऱ्यांचा विसर पडावा. त्या माणसाला साधारण आराम पडल्याशिवाय तिनें परतूंच नये

एकदां एक तरुण पहिलटकरीण मुलगी अडली. औषधपाणी करून, दिवसभर तिची सुश्रुषा करून संध्या रात्रीं एकदांची परतली; तेव्हांचा तिचा हंसतमुख चेहरा पाहून मला आल्हाद झाला. पण मग तिचे हाल सांगतां सांगतां संध्येच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागलेल्या पहातांच मलाहि कळवळून आलें.

मी कचेरींतून परतण्याच्यावेळीं ती माझ्या वाटेकडे डोळे लावून नेहमीं बसलेली असायची. त्या दिवशीं मी परतलों आणि हंसतमुखानें पायऱ्या चढलों. पण अंगांतील तापामुळें माझ्या झोकांडया जात होत्या. तिच्या लक्षांत येतांच तिनें माझे दोन्ही हात धरून एखाद्या लहान मुलासारखें ओढतच कोंचावर झोपविलें व माझें डोकें आपल्या मांडीवर घेऊन ती बाम चोळूं लागली. मी थट्टेनेंच म्हणालों, "बाईसाहेब, आपली औषधांची पिशवी सोडा ती; आमच्यावर प्रयोग चालूं या आपला !"

"पुरे बरं का थट्टा ! स्वस्थ विश्रांति घ्यायची आतां !" ती माझ्या कपाळावर गार पाण्याची घडी घालून, गरम कॉफी करावयास आंत निघून गेली.

त्या वेळचा तिचा हंसरा पण किंचित् म्लान चेहरा अजूनहि माझ्या दृष्टीसमोर येतो.

रात्रीं माझा ताप जास्तच चढला. आणि दोन दिवस झाले, तीन दिवस झाले, तरी तो काढला नाहीं. तिची कोण धांदल !

माझा विषमज्वर किती दिवस होता कोणास ठाऊक, पण ती मात्र रात्रंदिवस माझ्या उशाशीं, मजकडे टक लावून पहात अगदीं जागृत बसलेली असे. मला हलूं देत नसे, बोलूं देत नसे, माझ्या जिवाची नर्स माझी काळजी



वहात होती. पण माझा ताप कांहीं हटेना.

एके दिवशीं तर मी घाबरा झालों. शक्य तीं औषधें संपल्यामुळें, शेवटीं डॉक्टरनें जवळजवळ आशा सोडलीच. पण ही पांच पांच मिनिटांनीं माझ्या तोंडांत चमच्यानें पाणी सोडीत सारखी बसून होती, म्हणतात.

मी केव्हां, कसा बरा झालों कोणास ठाऊक ! पण सुमारें पंधरावीस दिवसांत पुन्हां हळूं काठी धरून इकडे हिंडूं फिरूं लागलों.

एके दिवशीं संध्याकाळीं ती हळूंच माझ्या कानाशीं वांकली. तिला कांहीं तरी सांगायचें होतें. पण मी ऐकेन कीं नाहीं, तिला खात्री नव्हती.

"ऐकायचं हं !... त्या दिवशीं तुम्ही कसंसंच करूं लागलां. शेवटीं, मी विठोबाला गाऱ्हाणं घातलं, 'यांतून त्यांना सहीसलामत सोडवलंस, तर बरे झाल्यावर दोघंहि येऊन तुझी जोडप्यानं पूजा करूं !' त्याच दिवशीं रात्रीं घाम सुटून आपला ताप उतरला. आतां बरं वाटतंय् ना ? आतां आपण एकदां पंढरपुरला जाऊं, म्हटल्याप्रमाणं..."

तिच्या दृष्टींत उत्सुकता होती, अपेक्षा होती. मला त्यांत फारसें तथ्य वाटत नव्हतें. तरी तिच्या डोळ्यांतील भाव ओळखून मी थोडया वेळानें तिला म्हणालों, "मग काय म्हणणं तुझं ? केव्हां निघायंच जायला ? अं ?"

किती आनंद झाला तिला माझ्या त्या उत्तरानें ! आणि त्यामुळेंच पुढल्या चार दिवसांचें मांस एकाच क्षणांत माझ्या अंगांवर चढलें.

मनांतून पंढरपूरला जाण्याची कल्पना मला हास्यास्पद वाटत होती. पण संध्येच्या समाधानासाठीं, तिच्या प्रेमामुळेंच मी होय म्हटलें.

झालें ! दुसऱ्या दिवशीं आम्ही जावयास निघालों.

ओळखीमुळें देवळाजवळील मोठ्या बंगल्यांतील खोलीच आम्हाला वापरावयास मिळाली होती.

त्या दिवशीं तिनें मला मुद्दाम गरम पाण्याची अंघोळ घातली. कपडे लपेटून, मला तिनें आपल्या बरोबर चालविलें.

केशरीरंगाचें रेशमी शोवळें ती नेसली होती. कानांत कुडी व गळ्यांत फक्त छडा; एका हातांत [illegible] हातातील सोन्याच्या दोनच बांगडया मनगटापर्यंत उतरल्या होत्या. [illegible] हातांत पूजेचें साहित्य !

मी जातां जातां तिच्याकडे वळून पाहिलें. तीहि मजकडेच पहात होती.

दृष्टादृष्ट होतांच ती मनापासून तोंडभर हसली. त्यावेळीं तिचा चेहरा किती प्रफुल्ल व उत्साहि दिसत होता.

तोंवर आम्ही देवळाशीं आलों.

पायऱ्या चढतां चढतां हळूंच मजकडे वळून ती सस्मित म्हणाली, "भटजी-बरोबर सोंवळं पुढें पाठविलं आहे. नेसणार ना ?"

"तुला काय वाटतं ?" मी उलट थट्टेनें म्हटलें.

"इश्श ! मला काय वाटणार ? एवढी देवाची नवसानं पूजा करायची तर सोंवळं नको वाटतं ?" ती मान वेळावून हसत म्हणाली.

"पण मी कुठं काय म्हणतोय ?" मीहि हसून म्हणालों.

मी हंसलों; तशी पुन्हां तीहि हंसली.

गाभाऱ्याशीं भटजी वाटच पहात होता. मी अंगातलें काढून सोंवळें नेसलों. 'वारा लागेल' म्हणत तिनें माझ्या अंगांभोवतीं लागलीच शाल लपेटली. आणि आम्ही दोघें देवासमोर शेजारीं ठेवलेल्या पाटावर बसलों.

बडवा बाजूस बसून मंत्र बडबडत होता. समोर विठोबाची काळी काभिन्न मूर्ती उभी ! त्याला वस्त्रें नेसवलीं होतीं. भूषणं चढविलीं होती. क्षणभरच मला हसूं आलें. पण संध्येनें तें पाहिलें. तर नाहीं ना, असें वाटून मी पटकन् तोंड पुसण्याचं आमिष केलं.

ती अगदीं मनापासून हात जोडी व डोळे मिटी. एकादशणी, महारुद्र,... आणखी काय काय प्रकार होईपर्यंत जवळ जवळ दीडदोन तास गेले. शेवटीं तिनें उभें राहून अनन्यभावें करुणा भाकली व मजकडे वळून ती म्हणाली, "देवापुढें साष्टांग नमस्कार करून नाक घासायचं !"

माझ्या संध्येचा शब्द तो. मी लागलीच जमिनीवर पडून नाक घासलें !

गाभाऱ्यांतून खालीं उतरतांना तिच्या चेहऱ्यावर किती तेज फांकलें होतें !

'चला एकदां मनासारखं झालं !' ती आपल्याशीच पुटपुटली. शेवटची पायरी उतरून आम्ही पुढल्या पटांगणांत येणार, तोंच तिला कसलीशीं आठवण होऊन ती म्हणाली, "थांबा हं ! निरंजन तिथंच विसरलें, तें घेऊन येतें."



मी तेथेंच उभा राहिलों. ती आंत परतली.

समोरच्या भव्य पटांगणांत आज गर्दी करण्यास कोणीच नव्हतें.

नाहीं म्हणावयास एक म्हातारा एका हातांत एकतारी, एका हातांत चिपळ्या, अशा थाटानें पुढें मागें फिरत होता. मीं हंसलों. त्या किंचित् कुत्सित दृष्टींतहि थोडें औत्सुक्य असावें. कारण मी थोडा जवळ जाऊन त्याच्याकडे निरखून पाहूं लागलों.

"पतीत पावन नाम ऐकुनी आलों मी द्वारा !" तो झपझप पावलें टाकून देवाकडे तोंड करून अगदीं पायऱ्यांपर्यंत चालून जाई. थोडा वेळ तेथें डोळे मिटून उभा राही आणि मग पुनः "पतीत पावन न होसि म्हणुनी फिरतों माघारा !' असें म्हणत म्हणत, देवापुढें मान वांकवून मागें मागें जाई.

संध्या येईपर्यंत त्याच्या जवळजवळ पांचसहा तरी खेपा झाल्या.

ती अजून येत नाहीं म्हणून मी वर पाहिलें, तों संध्या एका पायरीवर बाजूस बसली आहे. तिच्याजवळच निरंजन तेवत आहे.

मी तिच्याजवळ, निरंजनाच्या दुसऱ्या बाजूस जाऊन बसलों.

एकदां मजकडे प्रेमळ दृष्टी टाकून ती हंसली. नंतर कांहींसा विचारी चेहरा करून म्हणाली, "कां, त्या बुवांची चेष्टा चालली होती वाटतं ?"

मी कांहींसा चपापलों; पण बोललों नाहीं.

"एवढ्याच बाबतींत तुमचं काय आहे समजत नाहीं !" तिचा चेहेरा जास्तच अंतर्मुख झाला. कांहीं क्षणांनीं ती एकदम म्हणाली–"खरंच का देवबीव नाहीं, असं तुम्हांला मनापासून वाटतं ?"

प्रश्न किती साधा पण किती कठीण; मी स्वतःला शहाणा समजत नव्हतों ! पण मला मनापासून देवाची कल्पना प्रतीत होत नसे. मग मी तिला नाहीं म्हणालों असतों तर ? पण माझ्या संध्येची ईश्वरभक्ति मनापासूनची होती. त्या दुथडी भरून चाललेल्या नदीपुढें माझ्या शुष्क विचारवाळवंटाचें प्रदर्शन करणें मला असह्य झालें. तिच्या खांद्यावर हात ठेऊन मी तिला म्हणालों, "संध्या, देवासंबंधीं मला विचारूं नकोस. पण तुझ्यामाझ्यांतील, या निरंजनाच्या ज्योतीप्रमाणें असलेलें कांहींतरी असेपर्यंत, मला तरी देवाची जरूरी भासणार नाहीं !"

ती कांहींच बोलली नाहीं. मीहि समोरच्या एकतारी चिपळी घेऊन पुढें मागें येणाऱ्या बुवाकडे पाहूं लागलों.

त्याचें सर्व पूर्वींप्रमाणेंच चालू होतें. आतां मात्र तो 'देवाच्या द्वारा' आला आणि क्षणभर उभा राहिला. त्याच्या हातांत या वेळीं एकतारी नव्हती. चिपळ्या खालीं ठेवल्या होत्या. मला वाटलें, तो 'माघारा फिरेल.'

पण इतक्यांत हात वर करून विठोबाकडे वर पहात तो ओरडला, "कां रे माझा अंत पहातोस ?...ये ये माझ्या विठोबा...येरे !"...

थोडा वेळ तो तसल्याच स्थितींत होता. नंतर अंगावर शहारे आल्यासारखें करून त्यानें शरीर एकदम झटकलें. हात छातीजवळ कवटाळून तो मोठ्यानें ओरडला, "अहाहाहा ! आला रे आला रे माझा विठोबा आला आला !"

त्याच्या दोन्ही डोळ्यांतून अश्रूंचे ओघळ चालले होते. शेवटीं त्यानें बसकण घेतली. थोडा वेळ जमिनीवर डोकें टेकून तो स्वस्थ पडल्यावर पुन्हा शुद्धीवर आला. त्यानें सभोंवार पाहिलें व झटकन् उठून एकतारी चिपळी घेऊन तो देवळाच्या आवाराबाहेर जाऊं लागला.

मी संध्येकडे पाहून कांहीं बोलणार, इतक्यांत तीच एकदम मोठ्यानें त्याला म्हणाली, "महाराज, जरा थांबतां का ?"

लांबून ती हांक ऐकतांच तो मागें वळून थबकला.

संध्येनें स्वतःच निर्णय करून त्याला बोलावलें हें मला थोडें कौतुकास्पद वाटलें.

मलाहि त्याला प्रश्न विचारावेसें वाटत होतें.

बुवानें हसत मुखानें आमच्याकडे पाहिलें. त्याच्याशीं बोलावयास अवघड वाटण्यापूर्वींच तो आमच्याशीं एखाद्या जुन्या ओळखीसारखा प्रेमळपणें बोलूं लागला. त्यांत माझ्या अपेक्षेप्रमाणें कसली स्वार्थी लबाडी दिसली नाहीं. औपचारिक बोलण्यानंतर त्याला मी विचारलें, "आपण दरवर्षी येतां वाटतं पंढरपुरास ?"

"वारकरीच महाराज मी ! वर्षांतून चार तरी खेपा होतात माझ्या पण आतां शरीर ताब्यांत नाहीं राहिलं. देवानंहि सडफटिंग होण्याची व्यवस्था



केली. म्हटलं चला, त्याच्या दारांतच जाऊन बसूं !" तो थोडक्यांत आपली हकीकत सांगत होता.

बोलतां बोलतां त्यानें भक्तिभावानें विठोबाच्या बाजूस पाहून हात जोडले. "त्या जवळच्याच जुनाट घरांत मी राहतों. मनाला वाटलं कीं आपलं देवाजवळ यावं, त्याचं पवित्र नांव जपत त्याला आळवावं—अहाहा, आनंद...आनंद... मनाला आनंद वाटला कीं क्षणभर विठोबारायाच्या पायावर मस्तक ठेऊन धरणीमातेवर लोळण घ्यावी—"

बोलतां बोलतां त्याच्या डोळ्यांतून घळघळां अश्रू ओसरूं लागले. मनांतील आवेगानीं त्याचे ओठ थरथरत होते.

तो लबाड नव्हे असें वाटूनहि, माझ्या मनावर याचा कांहींच परिणाम झाला नाहीं. मी संध्येकडे वळून पाहिलें. तिचा चेहरा मात्र गोरामोरा झाला होता. डोळ्याच्या ओल्या कडा तिनें पदराच्या टोंकानें हळूंच पुसल्या.

माझ्या मनांत विचार आला, विठोबाची काळी मूर्ती याचें काय करणार ? आणि त्याची भक्ति केली नाहीं तर आमचें काय अडणार आहे ? मला कांहीं या लोकांच्या मनोवृत्तींशीं एक होतां येईना.

असले विचार माझ्या डोक्यांत येऊन जात आहेत, तों म्हातारा आवंढा गिळून, माझ्याकडे लौकर लौकर उघडझांप करणाऱ्या आपल्या पांढऱ्या भिवयांच्या डोळ्यांनीं पहात म्हणाला, "काय सांगू, महाराजा, तुम्हांला माझ्या विठोबाच्या लीला !"...

म्हाताऱ्याचा गळा दाटून आल्यामुळें तो मध्येंच एकदम थांबला.

माझ्या मनांतील प्रश्नांनांच उत्तर देण्यासाठीं तो आपण होऊन तयार झाला हें पाहून मी मात्र दचकलों.

"चला, आपण त्या पटांगणांत थोडा वेळ बसूं या, साहेब ! देवरायाच्या गोष्टी आमच्या वारकऱ्यांच्या तोंडीं अनेक सांपडतील तुम्हांला. पण आज तुम्हांला प्रत्यक्ष पाहिलेली एक गोष्ट सांगतों. प्रत्यक्ष म्हणजे काय मी दुसऱ्याच दिवशीं इथं येऊन पोहोंचलों..." म्हातारा पटांगणाकडे आमच्याबरोबर चालतां चालतां म्हणाला.

मला त्याच्या 'प्रत्यक्ष' पुराव्याचें थोडें हसूं आलें. पण पुढें काय सांगतोय् तें तर ऐकावें म्हणून मी स्वस्थ राहिलों.

एके ठिकाणीं बसल्यावर त्यानें आपली गोष्ट रीतसर सुरू केली.

संध्या तर अनन्यभावें म्हाताऱ्याकडे पहात होती.

तेव्हां मीहि कांहीं प्रश्न न विचारतां ऐकूं लागलों—

"आमच्या पंढरपूरहून पंचवास मैलांवर देवगांव म्हणून गांव आहे. तिथला पाटील विठाईचा भक्त. दरवर्षी आषाढीकार्तिकीला देवाकडे कांहींतरी भेट पाठवायची हा त्याचा शिरस्ता. अजूनहि त्याचा मोठा मुलगा पाळतो तें.

पण जितका देवापुढं लीन तितकाच चाकरांना कडक बरं का ? चाबकाखालीं फोडून काढी. म्हणून सगळे थरथरां कांपत...

गांवचा म्हातारा महार—गेल्याच वर्षी देवाघरीं गेला बापडा! सोनं झालं त्याचं—आज्ञाधारक होता; तरी आपल्या धन्याच्या चाबकाला तो फार भिऊन वागत असे.

त्या वर्षी आषाढी एकादशीच्या भल्या पहांटे पाटलानं म्हाताऱ्या महाराला उठवलं आणि म्हणाला, "देहू, मी अंगणांत एका टोपलींत आंबे मोजून ठेवले आहेत. ते डोक्यावर घेऊन लागलाच नीघ. देवरायाच्या दुपारच्या नैवेद्यापर्यंत पोंचशील ना पंढरीला ? मीं येतोंच पाठोपाठ काम संपवून."

"जी" म्हणून देहू लागलीच अंगणांत आला. पाटींत नारळाएवढे रसभरीत आंबे होते. देहूनं ते नीट रचले. त्यावर आपला फाटका फडका टाकून पाटी उचलली. आणि एका हातांत वहाणा घेऊन दुसऱ्या हातानं पाटी सांवरीत तो चालूं लागला.

विसांवा घेत घेत त्यानं दहावाजेपर्यंत पंधरा मैल मजल मारली !

-आतां फक्त दहाच मैल राहिले होते. देहूनं विडीचा शेवटचा झुरका मारून टोपली पुन्हां डोक्यांवर घेतली.

"सूर्य हळूं हळूं तापूं लागला. त्याचे पायहि थोडे पोळूं लागले. पण वेळेवर गेलं पाहिजे म्हणून तो घाई करीत होता.



आपल्याच विचारांत जातां जातां रस्त्याच्या कडेला त्याला एकदम आवाज ऐकूं आला. त्यानं दचकून सभोंवार पाहिलं तों जवळच्या झाडाखालीं कुणी अस्ताव्यस्त पडलं होतं.

जवळ जाऊन पाहिलं तों एक जराजर्जर म्हातारी, व जवळच भुकेलेलं पण हसऱ्या तोंडाचं उघडं-नागडं मूल !

'पाणी पाणी ! तहानेनं मी व्याकूळ झालें आहे हो ! " ती म्हातारी या कुशीवरून त्या कुशीवर वळत विव्हळली. पण तें लहानगं मूल टणटण उड्या मारीत पळणाऱ्या खारीमागं धांवून मोठमोठ्यानं हंसत होतं.

देहूला तें दृश्य पाहून भरतं आलं. त्यानं आपल्या डोक्यावरील पाटी खालीं ठेवली. व 'हुश्श' करीत बसतां बसतां त्याच्या डोक्यांत विचार आला. 'आतां हिच्या तहानभुकेची आपण कशी व्यवस्था करणार ?'

पाणी तरी आणून द्यावं या विचारानं त्यानं म्हातारीला विचारलं, "बाई, तुमची जात कोण ?"—"कुणबी"

देहू दचकला ! आपल्या महाराहातचं पाणी त्यांना कसं चालणार ?...

बागडणाऱ्या बाळाचं लक्ष देहूकडे वळतांच तो एकदम त्याच्याकडे धांवला. त्याला कसली आली शिवाशीव ? तो धांवत जाऊन देहूच्या मांडीवर बसला ! टोपलीवरील फडका बाजूस करीत तो ओरडला "ओहोहोऽआंबे—आंबे—"

त्याचा तो बालिश आनंद पाहून देहूलाहि हंसूं आलं. तो सहज म्हणाला, "तुला पाहिजे आंबा ?"

पण चटकन् त्याला आठवण झाली 'ते आपले आंबे नव्हेत. एक जरी आंबा कमी झाल्याचं मालकाला कळलं तरी तो आपल्याला चाबकानें फोडील !'

तींच तें मूल जवळ येऊन म्हणालें, "मला द्या आंबा आजोबा ?"

म्हातारी पडल्या पडल्याच पुन्हां ओरडली "आई ग !—पाणी"

देहूला आतां राहवेना—'यांना यांतले आंबे दिले तर ? देवाला कमी पडतील ? पण त्याचंच सर्व आहे. त्याला कशाला पाहिजे ? आणि बडवा नेतो आपल्या घरीं तो ? देवाला सगळं समजतंच; मग मी यांना आंबे कां देत आहें तेंहि त्याला समजेल !'

त्यानं मुलापुढं टोपली ठेविली. म्हातारीच्या तोंडांत रस पिळला.

दोघांची तृप्ती होईपर्यंत खाणं झाल्यावर त्यानं टोपली डोक्यावर घेतली व गेलेला वेळ भरून काढण्यासाठीं झटपट पावलं टाकीत तो चालूं लागला !

त्याला आतां मात्र पुन्हा विचार सुचूं लागले. 'आपण एकदम काय केलं हें ? बडव्याला किती आंबे होते तें ठाऊक असेल; आणि मालकाला समजल्यावर तो तर आपल्याला चाबकानं सपसप मारील !'

सारीं चित्रं त्याच्या डोळ्यापुढं येऊं लागली.

पाटलाचं काम लौकरच संपलं; आणि तो महाप्रसादासाठीं तसाच देहूच्या मागोमाग यावयास निघाला. रस्त्यांतून येतां येतां त्या मोठ्या झाडाखालीं तो विश्रांतीसाठीं सहज थांबला. पायाखालीं पाहिलं तों त्याच्या ओळखीच्या आंब्याचे बाठे आणि साली पडलेल्या त्याचीं तळपायाची आग एकदम मस्तकाला गेली. 'देहू आपल्याशीं बेइमान !' रस्त्यांत कुणी नाहींसं पाहून त्यानं देवासाठीं पाठविलेले बरेचसे आंबे स्वत:च फस्त केले काय ?'

'या हलकटपणाबद्दल आपण त्याला चाबकानें चांगले फटकावूं !' असं ठरवून तो आपलीं पावलं जोराजोरानें टाकीत संतापानें चालला होता.

पंढरींत देहूनें पाऊल टाकलं; त्यावेळीं माध्यान्हस्नानाचा सोहळा चालला होता. काय त्यावेळचं वर्णन करावं महाराजा ?

देवरायाच्या स्नानासाठीं, गरम पाण्याचे, दुधाचे, दह्याचे हंडे !... मंत्रोच्चार जोराजोरानें चालला होता. हजारों लोक नानातऱ्हेचे नैवेद्य घेऊन देवाच्या पूजेची वाट पहात होते. कित्येक बायकापोरं वर पाय करून विठोबारायाच्या दर्शनास उत्सुक उभे होते.

देहूनें पाटलाचा निरोप सांगतांच बडव्याचा मुलगा आंबे मोजून घ्यावयास पुढें आला. देहू जीव मुठींत धरून बाहेर अंगणांत उभा होता.

'आतां आंबे कमी सांपडतील, पाटलाला कळेल, आणि पाटील आल्यावर आपल्याला दगलबाज ठरवून'...

पण बडव्याचा मुलगा कांहींच बोलला नाहीं, उलट म्हणाला, "आंबे पोचले बरं ! जा देहू, देवदर्शन कर"...



देहूला आश्चर्य वाटलं, "असं झालं कसं ?"

पाटील थोड्या घुश्शांतच गांवांत शिरला. देहू भेटला कीं प्रथम त्याला हटकायचा त्याचा विचार होता.

देवळाजवळ येतो तों पटांगणाजवळच त्याला बडव्याचा मुलगा भेटला.

"ओहोहो, पाटीलबुवा ! उशीर केलांत जरा !" तो त्याच्याबरोबर हंसून म्हणाला, "देहू, नुकताच आंबे ठेऊन गेला. यंदा मुद्दाम दोन शेंकडे पाठविलेत वाटतं ?..."

पाटील तर चकीतच झाला. सकाळीं आज आपल्या हातानेंच मोजून एक शेंकडा पाटीमध्यें भरले. रस्त्यांतले ते आपल्याच आंब्याचे बाठे आणि त्या साली ! आणि हा पोर दोन शेंकड्यांचं काय म्हणतो ?

तो विचार करीतच गर्दींत शिरला.

इकडे काय झालं आहे, महाराजा ? देवाची आंघोळ चालली होती. दुधाचे तांब्ये घालून त्याचं स्नान चाललं होतं.

घाबरत घाबरतच धन्याच्या येण्याची वाट पहात देहू दाराशीं उभा होता. बडवे पंचामृतानें देवाला न्हाऊं घालीत होता.

तों काय चमत्कार झाला ?

देवरायाच्या गाभाऱ्यांत आंब्यांचा घमघमाट येऊं लागला. जवळपासचीं माणसं सभोंवार पाहूं लागलीं; तों-काय ? विठोबारायाच्या हंसतमुख चेहऱ्यावार तेज चढलं होत. आणि ते तिकडे विस्मयानें पहातात, तों श्रीमुखांतून आंब्याच दाट रस ओघळूं लागला.

सगळीकडे एकच गोंधळ ! बडव्यांची धांवपळ सुरूं झाली. बातमी कुजबुजत कुजबुजत पटांगणाच्या दाराशीं येऊन पोहोंचली..."देवरायाच्या तोंडांतून आंब्याचा रस ओघळत आहे"......

बुवांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वहात होत्या; त्यांचा स्वर एकाएकी विद्ध झाला. आणि तोंडांतून शब्द फुटेना...

मला त्या गोष्टीची थोडी गंमत वाटली. म्हातारबुवांची सहृदयता पाहून मन किंचित् भरून आलें.

पण ती भोळी भाविकता पाहून किंचित् हसूं आल्यावांचून राहिलें नाहीं. ! आणि माझ्या तोंडून नकळत अर्धस्फुट हास्य बाहेर पडलें.

बुवांनीं मजकडे पाहिलें तेव्हां मी त्यांच्याकडे पाहून स्मित करीत होतों.

क्षणभरच असा गेला असेल; तोंच बुवांचा शांत चेहरा कांहींसा गंभीर झाला.

त्यांचे पाण्यानें भरलेले डोळे पहातां पहातां कठोर झाले. ते मजकडे वटारलेले डोळे स्थिरपणें लावून रागानें ओरडले—" हे शिकलेले गाढव ! देवरायाच्या लीलेवर तुमचा विश्वास नाहीं ! माझ्या विठोबारायाला हसतां ?...तुम्ही नास्तिक ! ..तुमचें तोंड पाहूं नये; हंसा ! असेच हंसा...पाहिजे तर आणखी कांहीं बरळा !...पण ध्यानांत ठेवा!...तुमची जिव्हा झडेल;...देवाला हंसणाऱ्या तुमच्या तोंडाला किडे..."

" महाराज महाराज, असं नका बोलूं ! " मी दचकून त्यांचें रागाचे बोलणें निमूट ऐकत असतां, माझ्या संध्येनें एकदम पुढें येऊन म्हाताऱ्यापुढें डोकें टेंकलें. " बोलूं नका असं; देव इतका दुष्ट निष्ठुर नाहीं हो. यांना तितकं कळत नाहीं ! आम्ही माणसं अज्ञ आहोंत. "

संध्येच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. तिच्या चेहऱ्यावर कारुण्य पसरलें होतें. कपाळ, गाल सारें लालबुंद झालें होतें. माझ्यावर होणाऱ्या माऱ्यांतून माझें रक्षण करण्यासाठीं, ती ढालीसारखी पुढें झाली होती.

माझी श्रद्धा व तिची देवाबद्दलची भक्ती यांमधील तें युद्ध.—

म्हाताऱ्यानें झटकन् शांत होऊन तिजकडे पाहिलें. त्याचा राग नाहींसा झाला.

संध्येच्या डोक्यावर हात ठेवून तो प्रेमळपणें म्हणाला, " उठ, मुली उठ; मी रागावलों नाही बरं...अष्टपुत्रा सौभाग्य..."

किंचित् काळ कोणीच बोललें नाहीं. संध्या उठली व मजजवळ येऊन बसली. मजकडे प्रेमळ कटाक्ष टाकीत तिनें माझ्या खांद्यावर आपला हात ठेवला. माझी चूक झाली असें वाटत असूनहि, ती मला क्षमा करून माझें समाधानसांत्वन करीत होती.

" आजोबा, मी तुमची थट्टा करण्यासाठीं नाहीं हसलों..." शेवटीं मी समेट करण्याच्या हेतूनें शांतता मोडून म्हणालों,—" तुमच्या ईशप्रेमाची



ओली हिरवळ, माझ्या अश्रद्धेच्या वाळवंटाजवळ "—

" ह्या सोडून झालं तें; पण बरं का, साहेब,...यांनीं मला शांत केलं नसतं तर..." आजोबा संध्येकडे बोट दाखवून, आम्हां दोघांकडे हंसून पहात म्हणाले —" पाहिलंत ! शब्द आणि अनुभव त्यांत कसा फरक असतो तो!... देवरायानें हेंच का मला शिकवलं ? "

शेवटीं आम्हीं उठलों.

संध्येच्या हातांत ताम्हणांत राहिलेलें पूजेचें साहित्य आणि पेटतें निरंजन होतें;...ती पुढें चालली होती व मी शांतपणें तिच्यामागून ...

रात्रीं बिछान्यावर मी किती तरी वेळ तळमळत होतों. तो भाविक म्हातारा, माझी प्रेमळ संध्या ! त्यांना त्यांच्या देवांत विश्व दिसत होतें; मला साऱ्या विश्वांत देव आढळत नव्हता !

त्यांना मनापासून तसें वाटत होतें. आणि त्यासाठीं ते आपले अमोल अश्रू ढाळीत. पण माझा त्या बाबतींतील कोरडेपणाहि मनापासूनचाच नव्हता का ?

संध्येनें केलेल्या विठोबाच्या नवसामुळें मी बरा होऊनहि माझ्यांत फरक झाला नव्हता.

पण म्हणून माझी संध्या मात्र मला माझें सर्वस्व वाटल्यावाचून रहात नसे. तिच्या प्रेमानें ओथंबलेल्या नजरेशीं माझी नजर मिळाली, कीं मी स्वतःला क्षणभर विसरे. माझ्याशीं ती प्रेमळपणें बोलूं लागली कीं, माझ्या रोमारोमांत उत्साह, आनंद संचारे ! तिच्यांतच माझें सारें सारसर्वस्व सांठवलेलें होतें !

तिच्यावर माझें नितांत प्रेम होतें. म्हणूनच तिला आवडणाऱ्या साऱ्या गोष्टी मलाहि प्रिय वाटत. तिच्यापुढें माझी मान वांके म्हणूनच ती जिच्यापुढें आदरनें मान वांकवी ती ती प्रत्येक गोष्ट, प्रत्येक कल्पना मला आदरणीय वाटे...

" नाहीं महाराज, ते अज्ञ आहेत. त्यांना दोष देऊं नका; त्यांना वाकडं बोलूं नका ! " मी असा विचार करीत असतां संध्या बिछान्यावर एकदम हात वर करीत झोंपेंतच पुटपुटली.

तिच्याकडे वळून मी तिच्या अंगावर हात ठेवत होतों. इतक्यांत ती जागी झाली. खिडकींतून आलेल्या चंद्राच्या किरणांत तिचे डोळे आर्द्र दिसत होते. गालावरून ओघळ वहात होते. मी अत्यंत प्रेमानें तिला जवळ ओढलें. ती मजकडे पाहून हंसत होती. त्या हास्यांत प्रेम ओथंबत होतें.

पडल्या पडल्या माझ्या केसावरून हळुवारपणें हात फिरवीत संध्या माझ्या कानाशीं कुजबुजली—" हें पहा,...किती आनंद वाटतोय् मला आपल्या सहवासात ! किती किती चांगले आहांत तुम्ही !...पण...पण, खरंच का आमची देवाची भाविक कल्पना तुम्हाला हास्यास्पद वाटते ? "

तिच्या नजरेंत प्रेम होतें, तितकीच खिन्नता होती. मला अगदीं उचंबळून आलें.

मी तिला हृदयाजवळ घेत म्हणालों,—" देवाविषयीं मी काय सांगूं बरं ?...मला त्यांत खरोखरच कांहीं कळत नाहीं. पण संध्या, तूं मात्र देवता...माझी देवी आहेस ! "

---



# मृगजळ!

शेवटीं जोशी मास्तर वर्गांत शिरले त्याबरोबर चुपाचूप झाली; पण त्यांचा चेहरा नेहमींपेक्षां जास्त गंभीर दिसत होता.

खुर्चीच्या हातांना धरून, ती थोडीशी टेबलाजवळ ओढून त्यांनीं भिंतीकडे कलवली. टेबलावरील रुमालाची घडी उचलून संवयीप्रमाणें उगीच फळा पुसला; समोरचें पुस्तक उचलून हातीं धरलें,...सर्व अगदीं यंत्रासारखें चाललें होतें !...

हळू हळू चाललेली कुजबूज साफ बंद झाली; प्रत्येकानें आपापलें पुस्तक उघडीत मास्तरांकडे पाहिलें.

बोर्डाकडील बाजूस असलेल्या खिडकींतून विजेच्या इंजनाची कर्कश शिटी व त्यामागूनच खाडीच्या पुलावरून जाणाऱ्या डेक्कन क्वीनच्या डब्यांत खडखडाट ऐकूं आला; त्या भरभर जाणाऱ्या काळ्या डब्यांवरून पांचाला पांच मिनिटें आहेत, हें नेहमींच्या माहितीमुळें मुलांनीं ताडलें. तासाचा जवळजवळ अर्धा भाग गेला होता. त्यांना वाटलें, आतां वीस पंचवीस मिनिटांत काय होणार ?

इतक्यांत सर्व वर्गावरून आपली मंद दृष्टि फिरवीत मास्तर म्हणाले, " कोणता धडा चालला होता आपला ? "

त्यांचा आवाज बराच जड येत होता; भिंवया प्रश्नसूचक वर चढल्या-मुळें कपाळाच्या मध्यभागीं दोन आठ्या पडल्या होत्या; मुलांनीं सांगितलेलें पान त्यांनीं उघडलें. धड्यावर मथळा लिहिला होता, " तत्वनिष्ठा... "

जोशी मास्तरांनीं खुर्चीचा झोंक टेबलाकडे टाकीत एक सुस्कारा सोडला, 'हं:ऽ' !

एकाददुसऱ्या ठिकाणच्या कुजबुजाटानें वर्गातील शांतता जास्तच भीषण झाली !...

"हंऽ—! करा पाहूं तुम्ही दुसऱ्या प्याऱ्यापासून सुरवात, दामले !..." चेहऱ्यावर त्यांचें त्रस्त मन पूर्णपणें उमटलें होतें.

दामलेनें हातांतील आपलें कांहींसें जीर्ण पुस्तक चाळलें व उभें राहून सांगितलेल्या पानावर वाचावयास सुरवात केली..."तेव्हां, तत्वावरील निष्ठा हो जगांतील खऱ्या यशाची गुरुकिल्ली होय ! आपल्या आयुष्यांत असे पुष्कळ प्रसंग पहावयास मिळतात. मनुष्य हटकून मोहांत पडतो; आणि त्या झंझावातांत..."

मास्तरांनीं रुमाल काढून आपला डबडबलेला चेहरा पुसला. मधल्या कांहीं वाक्यांकडे त्यांचें लक्षच नव्हतें;...दामले आपला वाचीत होता पुढें...

"नेहमींच्या व्यवहारांतलेंच उदाहरण पहावें ! सत्यनिष्ठा !!...शब्द, ठीक आहे. पण आपण कितीदां स्वतःला व दुसऱ्याला फसवीत असतों?...आणि..."

जोशी मास्तरांची तीक्ष्ण दृष्टी एक क्षणभरच दामल्याकडे लागली.

मागचें कांहीं आठवल्यासारखें करून ते एकदम हात पुढें करीत म्हणाले, "थांबा दामले !...तें सत्यावरचं प्रवचन पुरे तुमचं ! कितव्या पानावरचा मजकूर आहे हा ?"

त्यांच्या आवाजांत किंचित् कठोरता व कांहींसा तिरस्कारहि व्यक्त झाला.

पानें उलटून सर्वांच्या पुस्तकांचा झालेला 'सळसळ' आवाज, कुतुहलानें मागील पान पुन्हां पाहण्यासाठीं झालेल्या गडबडीनें, प्रतिध्वनित झाला.

प्रश्नाचा रोख न समजून दामले आपला प्रश्नार्थक चेहरा मास्तरांकडे गोंधळून फिरवून पाहूं लागला.

"कितव्या पानावरचा मजकूर वाचतां आहां ? सत्तेचाळीस ?"

"हं !"

"तुमचंच पुस्तक ना तें ?"

"होय !"

"वा ! छान ! मागच्या वेळीं पुस्तकांत तीं पानं नव्हतीं; आणि आज



आलीं !...काय ?...तत्वनिष्ठेचा धडा कशाला पाहिजे उगीच ? कागदी घोडे नका नाचवूं, दामले ! धडधडीत खोटं बोललां तुम्ही...बसा खालीं !" ते शब्द बोचावेत म्हणून मास्तर मुद्दाम हळूहळू बोलत होते.

मुलें संदर्भ न समजल्यामुळें एकमेकांकडे कावरीबावरी पाहूं लागलीं.

वर्गांत अगदींच शुक्र होतें; बाहेरचें पिंपळाचें मोठें झाड वाऱ्यानें सळसळलें तेवढेंच ! बाकी सारें शांत !

इतक्यांत, दामलेच्या डोक्यांत चक्कन् वीज चमकल्यासारखें झालें. त्याला गेल्या वेळच्या तासाची आठवण झाली.

आपलें लक्ष नाहीं असें वाटून जोशी मास्तरांनीं प्रश्न विचारला होता. आपण उत्तर देण्यासाठीं जवळच्या मुलाच्या पुस्तकांत पाहिलें, तेव्हां मास्तरांनीं विचारलें होतें—"तुमचं पुस्तक ?"...

"आहे; पण पानं गेलीं आहेत मधलीं !..."

आणि त्याला हा प्रसंग आठवला, तेव्हां तर त्याला जास्तच वाईट वाटलं; 'बसा' म्हणण्यापूर्वीच त्यानें बाकावर बसकण घेतली.

त्याचा चेहरा मलूल झाला होता; डोळे पाण्यानें भरून आले होते !

मास्तरांना चमत्कारिक वाटलें—"आपल्या बोलण्यांत चूक तर झाली नाहीं ना कुठं ?"

ते एकदम उठून उभे राहिले. दामलेजवळ मंद पावलें टाकीत जातांना त्यांची दृष्टि किंचित् साशंक पण तितकीच निर्णयेच्छु दिसत होती.

जोशी मास्तर जवळ आल्यावर त्यांच्या नेहमींच्या स्वभावानें उचल खाली. दामल्याच्या पाठीवर ते हात ठेवून म्हणाले, "काय ? माझा संशय खरा ना, दामले ?"

ते पुढें कांहीं बोलण्यापूर्वीच दामल्याच्या बालीश डोळ्यांतून उतरलेले दोन ओघळ त्याच्या हातांतल्या उघड्या पुस्तकावर पडले.

मास्तरांचें सहज लक्ष गेलें; तों पुस्तकावर दोन मोठमोठे शाईचे ओले डाग त्यांना दिसले.

मास्तरांनीं चपापून दामलेचें पुस्तक वर उचललें. पाहिलें, तों मधलीं

पंधरा वीस पानें सुंदर व बारीक अक्षरांतली हस्त-लिखितच-होतीं.

वाचत असलेल्या पानावरच त्याचे ठिबकलेले अश्रू व शाई सैरावैरा पसरली होती !......

मास्तर दचकले ! मनांत हळहळले !...

त्यांनीं त्याच्या पाठीवर हात ठेवून म्हटलें, "केव्हां लिहून काढलींत हीं मधलीं पानं, दामले ?"...

"कालच्या सुटीच्या दिवसांत !" दामले जड आवाजानें म्हणाला.

मोकळ्या मनाच्या मास्तरांच्यानें आतां राहवेना; ते दामलेच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाले "क्षमा करा हं, दामले, मला !"

टेबलावरील पुस्तक घेऊन दाराकडे जातां जातां जोशी मास्तर म्हणाले "पुढच्यावेळीं संपवूं तो धडा ! आज पुरे !"...

मास्तर व दामले यांच्याकडे मुलें आळीपाळीनें आश्चर्यानें पहात होतीं.

टेबलावर पुस्तकें अस्ताव्यस्त पडलीं होतीं. दौतीला बूच लावायाचें तसेंच राहिलें होतें. दोन दिवसांपूर्वीची तारीख कॅलेंडरवर लटकत होती. घड्याळाचा एकच एक टिक्‌टिक् आवाज तेवढा त्या खोलीतील शांतता मोडीत होता; आणि चिंवचिंव करीत मधूनच आंतबाहेर भुरभुरत उडणारी एकादी चिमणी त्याला मदत करीत होती !...

फेट्याचें गुंडाळें खुंटीवर ठेवून त्यांनीं कोट काढला; भिंतीजवळ उभी असलेली आरामखुर्ची पाडली व तीवर आपलें अंग टाकलें.

कांहीं वेळ असाच शांततेंत गेला. मास्तरांच्या डोक्यांत कितीतरी विचार येत जात होते; पण कोणताच स्थिर होत नव्हता.

असें आणखी कितीवेळ चाललें असतें कोणास ठाऊक ? इतक्यांतच त्यांच्या अंगावर एका चिमणीच्या तोंडांतील काटक्या पडल्या; आणि एक गोंधळी चिंवचिंवाटहि झाला...

त्यांनीं चमकून वर पाहिलें; दोन चिमण्या कौलांच्या वळचणीला घरटें बांधण्याच्या खटपटींत होत्या. त्या तेथून उडाल्या आणि चिंवचिंव करीत बहालावर बसून उड्या मारूं लागल्या. जवळजवळ येऊन एकमेकांना कांहीं



सांगूं लागल्या. इतक्यांत काय त्यांच्या मनांत आलें कोणास ठाऊक ! 'भुर्रर'...करून त्या खिडकींतून लांब उडून गेल्या.

मास्तरांची दृष्टि त्यांच्या मागोमाग किती तरी दूरपर्यंत गेली.

त्यांच्या मनांत विचार आला—'काय हा स्वैर आनंद ? तसा आपल्याला कां नसावा बरं ?...'

बाहेर हिरवळ वाढली होती. मास्तरांनीं केलेल्या लहानशा बागेंत पांच-दहा फुलें वाऱ्यावर डुलत होती. किती मोहक रंग त्यांचा ? जणूं काय हंसताहेत प्रफुल्ल मनानें !...त्यांना वाटलें, 'आनंद नाचतो आहे नुसता जिकडे तिकडे !'...

पण त्या चांगल्या विचारांबरोबरच त्यांच्या मनांत दुःखी विचारहि थैमान घालूं लागले. त्यांच्यासमोर त्यांच्या आयुष्यांतील प्रसंग आले.

आणि पुन्हां त्यांना वाटलें, "आनंद ? छे; ! भ्रम आहे नुसता !"

पण मग पुन्हां ते मनाशीं म्हणाले, "भ्रम कसला ? सभोंवारचा हा साक्षात् आनंदच नव्हे का निसर्गांतला ?...मग ही घाण दिसते ती मानवी करणीचीच !!...मघांचा तो धडा !...हँऽऽ ! काय ? 'तत्वनिष्ठा'ऽ म्हणे !...खुळीं अज्ञानी पोरं !...आणि हे अभ्यास नेमणारे !!"...

उपरोधिक हंसत खुर्चीवरून उठून पाठीमागें गुंतवलेल्या हातांनीं ते येरझारा घालूं लागले; खिडकीच्या धक्क्यावर उजवा पाय ठेवून उभे राहिले; ढोंपरावर कोपर ठेवून दोन्ही पंज्यांच्या बेंचकांत त्यांनीं हनुवटी टेंकली व गंभीर चेहऱ्यानें ते दूरवर एकाग्र पण शून्यमनस्कपणें कांहींतरी पाहूं लागले !...

"मास्तरसाहेब, यावर सही करून मागितली आहे !" त्यांची तंद्री मोडायला त्यांच्या शाळेचा रामा शिपाई कारण झाला. मोठ्या मिशा नदि करीत तो आदबीनें दाराशींच उभा होता.

किंचित् दचकून मागें वळून पहात मास्तर उभे राहिले; कांस नीट सांवरीत त्यांनीं धोतर घट्ट केलें.

"कायरे आणलं आहेस ?" असें म्हणत रामाजवळ येऊन मास्तरांनी त्याच्या हातचा कागद घेतला.

वरून हेडमास्तरांकडे आलेलें तें कसलेंसें सर्क्यूलर होतें. त्यावर सही करीत ते म्हणाले,“ बऽरंऽ म्हणावं !...जा.”

रामा पाठमोरा होऊन दारापर्यंत गेला असेल नसेल, इतक्यांत जोशी मास्तरांना काय वाटलें कोणास ठाऊक ? त्यांनीं एकदम म्हटलें, “ अरेऽएऽमोरेऽ! थांब जरा;इकडे ये ! ”

रामा दचकला. त्याच्या त्या आडनांवानें कितीतरी वर्षांत मास्तरांनीं त्याला हांक मारली नव्हती.

त्यांच्या चेहऱ्याकडे संकोचानें नि कांहींसा आनंदानें मोरे पहात राहिला.

मास्तरांनीं पुढें होऊन त्याचा हात धरला व त्याला जवळजवळ ओढीतच खुर्चीजवळ नेलें–“ हं बस इथंऽ !. . .अरे, लाजूं नको ! बस इथं !. .बस ! !”

खुर्चीवर बसतांना मोरे ओशाळा झाला. थोडे खोल गेलेले त्याचे डोळे आनंदाश्रूंनीं चमकले ! चपट्या गालावर ओझरतें स्मित झळकलें !

“ मी विसरलों नाहीं, मोरे ! ” मास्तरसुद्धां थोडे गहिवरून म्हणाले, “पण तुला आठवतं कारे शाळेतलं सर्व ?. . .मला तूं शुद्धलेखन काढून देत असस. त्या वेळीं काय सुंदर अक्षर होतं तुझं वर्गांत ? तूं म्हणायचास मी खूप शिकणार आहे. नाहींऽ ? ”

रामानें स्मित करीत मान हलविली. दोघेहि कांहीं वेळ गप्प होते.

पुन्हां मास्तरांनींच शांतता मोडली.

“ मग पुढं कितवीपर्यंत गेलास रे तूं ? ” मास्तरांनीं त्याच्या खांद्यावर हात ठेवून विचारलें.

आज त्यांच्या मनांत नाना भावना कल्लोळ करीत होत्या !

“ कुठचं मास्तरसाहेब ? ” निदान त्या वेळीं तरी त्यांना ‘ जोशी ’ म्हणावेंसें वाटलें मोरेला; पण त्याला तितकें धैर्यच होईना, नेहमींच्या संस्कारामुळें ! “ मराठी सहावीपर्यंतच गेलों; आणि मग लगीन, मुलंबाळं. . .त्यानंतर ही नोकरी आजपर्यंत !. . ”

कितीतरी वेळ तेथें शांतता नांदत होती. मास्तर येरझारा घालीत होते. मास्तरांची हालचाल पहात मोरे खुर्चीवर संकोचानें बसला होता.



“ तुम्ही मात्र वरच्या पदाला पोंचलेत, मास्तर ! इंग्रजी शाळा, कॉलेज सर्व झालं तुमचं !. . .आणि आतां चांगला पगार. . .”

“ हंः ऽ! मास्तरांनीं एक सुस्कारा टाकला. “एका अर्थी बरोबर आहे तुझं म्हणणं. . .”

आपल्या बालसोबत्याचा स्वभाव पूर्वी होता तसाच प्रेमळ आहे हें पाहून मात्र मोरेला एक प्रकारें आनंद झाला; तरी त्याला तेथें जास्त वेळ बसवेना. तो झटकन् उठून दाराकडे वळून म्हणाला, “जातों मी आतां !. . .असाऽच दयालोभ ठेवा गरीबावर, मास्तर ! ”

रामा दाराबाहेर लांब गेल्यावर मास्तरांचें अंतःकरण उचंबळून आलें.

रामाला किती आनंद वाटला त्या जुन्या स्मृती आठवून ? पण तो म्हणाला त्याप्रमाणें आपण खरोखरच मोठ्या पदाला पोंहोचलों का ?. . .

जोशी मास्तरांच्या पुढून सारा आयुष्यपट जाऊं लागला. . .

माधुकरी मागून आणि सर्व कष्ट सोसून कॉलेज गांठलें, पदवी मिळविली. काय त्या, त्या वेळच्या भराऱ्या ! प्रोफेसर, बॅरिस्टर. . . ! पण सर्व स्वप्नें हळूंहळूं विरघळलीं. एम्. ए. ला बसतां आलें नाहीं. एल्‌एल्. बी. च्या टर्मस् फुकट गेल्या. केवळ अडचणींत कुटुंबपोषणासाठीं म्हणून मास्तरकी हातीं घेतली काय, आणि ती कायमची जन्माला चिकटली काय !

उच्च तत्वें गेलीं, महत्वाकांक्षा विरल्या...आणि केवळ जिवंत राहण्यासाठीं...कुटुंबासाठीं......

त्यांना एकदम एका इंग्रजी वाक्याची आठवण झाली...‘ मी मोची असलों तर मी उत्तमांत उत्तम मोची होऊन दाखवीन...’

‘ मी उत्तम शिक्षक तरी होऊं शकलों का ?...’ त्यांना प्रश्न पडला.

मास्तरांच्या डोक्याच्या शिरा तडतडत होत्या !

त्यांना अगदीं आजचाच ताजा प्रसंग आठवला.

दुपारीं हेडमास्तरांनीं बोलावून नेलें होतें. त्यांचे ते शब्द जोशी मास्तरांच्या कानांत अजून घुमत होते; हृदय कापून जात होते !—

ते म्हणाले होते—“ मास्तर, आज माझ्याकडे लिहून आलं आहे

तुमच्या प्रमोशनविषयीं !...जोशी, तुम्ही आपण होऊन पायावर धोंडा पाडून घेतलात; तुम्हाला कल्पना नाहीं तुमचे वर्गांतले अवांतर विषय व राजकीय सामाजिक चर्चा, यांच्या परिणामांची !...त्यामुळं तुमच्या मागच्या सान्यांची मात्र फर्स्ट असिस्टंट म्हणून नेमणूक झाली !...पण मी म्हणतों, सरळ रेखीव अभ्यासक्रम व नेमलेली पुस्तकं सोडून तुम्ही...आणि...अलीकडलीं तुमचीं तीं कामगारसहाय्यक व शिक्षणप्रसारक मंडळ..."

कितीतरी वेळ तसेंच लेक्चर चालेलसें वाटून—"बरं; तासावर मुलं खोळंबलीं असतील, मी घेतों रजा ! " असें म्हणून जोशी मास्तरांनीं आपली सुटका करून घेतली होती.

आणि साहजिकच त्यांना त्यानंतरचा वर्गांतील प्रसंगहि आठवला.

त्या वेळचा तो धडा !...

"तत्वनिष्ठा !" स्वतःशींच उच्चार करून ते किंचित् उपहासानें हंसले.

पण दामलेची हकीकत पुन्हां आठवून त्यांचा चेहरा गंभीर, झाला.

"गरीब बिचाऱ्या दामलेच्या बाबतींत आपल्या हातून अपराध झाला का ?" असें पुन्हां पुन्हां वाटून त्यांना चैनच पडेना !

"आणि आपल्या असल्या होरपळलेल्या मनाला समाधान देणाऱ्या लहानसान चळवळींचीहि होळी करणारं नुकतचं रामानें आणलेलं सर्क्युलर ?...' त्यांचे डोकें सुन्न झालें.

सर्व उत्कट भावनांचा कोंडमारा असह्य झाल्यामुळें बाहेर जाण्याच्या हेतूनें त्यांनीं डगला चढवला व डोक्याला फेटा गुंडाळीत ते खिडकीबाहेर शून्यपणें पाहूं लागले.

"हा इतक्यांतच आलास वाटतं ?" आंतल्या खोलींतून शुभ्र केसांची त्यांची आई काम करतांना कमरेभोंवतीं गुंडाळलेला आपला पदर सोडवून सुरकुत्या पडलेलें तोंड पुसतपुसत बाहेर आली. "अरेऽ...हेमा सारखा रडतोय बघ ! आधींच आई मेललं पोरं तें, अन् त्यांत तर तापानें पडलेलं ! आज आणखी औषध संपलंय् ! नमूविसूंना सांगितलं तर ते गेले खेळायला ! 'मग आणूं' म्हणाले !..."



"मी केव्हांच आलोंय्, आई; " मास्तर वळून फेटा डाव्या हातानें चांचपत, कोपऱ्यांतून काठी घेऊन म्हणाले,—"आतां जरा बाहेर जायचा विचार आहे. येतांना आणीन औषध ! अंऽहं ! चहा वगैरे नको मला ! लौकर जेवायलाच येतों परत ! समजलीस ? "

आईनें दिलेली बाटली घेऊन जोशीमास्तर बाहेर पडले.

त्यांच्या डोक्यांत विचारांचा वणवा पेटत होता.

पत्नीनंतर त्यांच्या एकाकी आयुष्यांत, सर्व घर म्हातारी आईच चालवत असलेलें पाहून त्यांना तिचें कौतुक वाटे—'ही म्हातारी हें सारं कां करते ? मनुष्य करतो तें सारं मृगजळासारखंच ? '

'आपण पुन्हां लग्न केलं नाहीं म्हणून आपली कांहींशी थट्टाच झाली;... आणि कां नाहीं केलं लग्न ? आपल्या सुशील पत्नींच्या सान्निध्यांतील प्रेमळ गोड स्मृतीच्या जोरावरच ना ?...

'आपलीं उच्च ध्येयें गेलीं !...

'आणि आपल्या सुखाच्या कल्पना ?...

'आपण दुःखी कां ?...पण मोऱ्यानें आपली त्याच्याशी तुलना करून काय म्हटलं ? '...

तोंच समोर एका वळणाजवळ त्यांना एकदम दामले दिसल्यामुळें त्यांच्या विचारांत खंड पडला.

अंगाच्या व कपड्याच्या साबणाच्या हातांतील वड्या तो जाणाऱ्या-येणाऱ्यापुढें करून विचारीत होता–"पाहिजेत कां ?"

स्वतःला मदत म्हणून असले उद्योग तो करीत असेल अशी मास्तरांना कल्पनाहि नव्हती. जोशी मास्तर आपलें कष्टमय बालपण आठवून कांहींसे चपापले.

ते हळूंच त्याच्याजवळ जाऊन उभे राहिले.

त्याच्या खांद्यावर पटकन त्यांचा हात पडतांच तोहि एकदम दचकला.

"काय हो, दामले ? " मास्तर हंसरा चेहरा करून म्हणाले. "बरीच खटपट करतां ! दर दिवशीं तीनचार आणे मिळतात कां ? "...

"हो बहुतेक !" मास्तरांच्या सस्मित चेहऱ्याच्या संसर्गानें तोहि किंचित् हंसला; "माझ्या आईभावंडांच्या संसाराला असल्याच लहानसहान रीतीनं मदत होते."

असें बोलतांना त्याचे करारी पाणीदार डोळे चमकतांना पाहून मास्तरांना शाळेंत घडलेली हकीकत पुन्हां आठवली.

"दामले, मघाचं वर्गातलं ?...माझं एकंदरींत चुकलंच बरं काऽ ?!"... मास्तर दिलगिरी प्रदर्शित करण्यासाठीं सौम्य स्वरानें म्हणाले–"क्षमा क"...

"त्यांत कांहीं नाहीं, सर !" दामले थोडा हिरमुसला होऊन म्हणाला, "माझ्या आईची शिकवण नाहीं तशी ! मी खोटं कधीं बोलणारच नाहीं !"...

"दामले !" क्षणभरानें खिशांतून महिन्याच्या सरत्या पगारापैकीं राहिलेले तीन रुपये मास्तरांनीं काढले; त्यापैकीं दोन त्याच्यापुढें करीत ते म्हणाले,—"हें पहा, दामले ! मला माहीत नव्हतं; नाहींतर पूर्वीपासूनच तुम्हांला मदत करीत आलों असतों. हें घ्या दोन रुपये. असूं द्यात ! तुमच्या उपयोगीं पडतील !"...

दामलेनें त्यांच्याकडे कृतज्ञतेनें पाहिलें, पण तरी विनययुक्त स्मित करीत तो म्हणाला, —"आम्ही गरीब आहों, सर !...आम्हांला हे असले नकोत. आपला मी आभारी आहे."

मास्तर किती चमकले ! हें सर्व त्यांना अगदीं अनपेक्षित होतें.

पण त्यांच्या डोक्यांत पुन्हां एक कल्पना आली !

"मग हातातल्या या सर्व साबूच्या पेट्यांची किंमत काय सांगा ?"

"यांची ?...एक रुपया पंधरा आणे !"

"द्या तर त्या इकडे ! आणि हे घ्या ! एक आणा परत द्या !"

मास्तरांचें हें म्हणणें मात्र दामलेला ऐकणें भानच पडलें.

"नेटानें अभ्यास करा, दामले ! मोठे व्हा ! अं ऽ ?!" काठी किंचित् आपटून मास्तर चालण्याच्या तयारीनें म्हणाले.

जातां जातां मास्तरांच्या डोक्यांत विचारांचें पुन्हां नुसतें तुंबळ सुरू झालें होतें...



"दामले इतके कष्ट करून कां शिकतों ? मोरे जुन्या गोष्टींनी कां आनंदतो ? आणि त्याच्या मतें मी सुखी !...आई म्हातारपणीं सुद्धां आपल्या मुलाचा संसार चालवते आहे. आपल्याला दुसरं लग्न करणं अशक्य वाटावं हेंही त्यातलंच कां ?...

"मनुष्य जुनीं क्षुद्र सुखं व पुढील भडक सुखस्वप्नं याच्या जोरावर वर्तमानकाळांतील दुःखं सोसतोच म्हणावयाचं तर !...सर्व मृगजळच नव्हे !...

"अपयश आलं म्हणून काय झालं ?...असल्या स्थितींतही आनंदी वृत्तीनें आपल्या तत्वावर निष्ठा ठेवून जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे !..."

आणि मग त्यांना ब्राउनिंगचा 'ग्रॅमॅरिअन' आठवूं लागला.

त्याच्या प्रेतयात्रेप्रसंगीं म्हटलेल्या त्या ओळी !...किती अर्थपूर्ण !...

"तो क्षुद्र ठरवितो क्षुद्र कर्म करण्याचें !
यश मिळे !...तयाची शतही होती ! नाचे ! !
—हा थोर महात्मा श्रेष्ठ एक करतांना !
अर्धेंहि संपण्यापूर्वी वरितो मरणा ! !"

मास्तरांना पूर्ण पटलें !

"अशीं कितीं अज्ञात आयुष्यं अपयशानीं ग्रासून लोकांच्या दृष्टीनें मातीमोल ठरलीं असतील ! पण म्हणून काय झालं ? ध्येय आहेत म्हणून जग आहे !

"खरंच !...दुपारचा धडा चुकीचा नव्हता ! ! ज्यांच्या आयुष्याला अजून सुरवात झाली नाहीं, अशा पोरांपुढें हे उच्च तत्वांचे मनोरे उभे करायचे नाहींत तर कोणापुढें ? या विषम व्यवहाराची झळ आतापासूनच कशाला त्यांना ?"

मग खिन्न स्मित करीत तें स्वतःशींच पुटपुटले—

"आपलं स्वतःचं आयुष्य कल्पिल्याहून निराळं झालं हें खरं !...हो, त्याला सर्व विषम सामाजिक परिस्थिती कारण झाली !...पण म्हणून स्वतःचीं प्यार तत्वं अजूनही स्वतःशीं चिकटलेलीं आहेतच ना ?...आहों त्या स्थितींतच कांहीं एका तत्वनिष्ठेनें निष्काम कर्म करीतच आहोंना आपण ? झालं तर !—तेंच प्रत्येकाचं काम ! तत्वावरील प्रीति मृगजळ नव्हे ! खरंच, त्यापासून मिळणारा सात्विक आनंद !......"

"जेवायला चल रे ऽ" विचार करतां करतां आपण सरळ घरीं येऊन खुर्चीवर लवंडलों होतों, याचें मास्तरांना भानही नसल्यामुळें, आईच्या या शब्दांनीं ते एकदम दचकून उठले ! आणि भानावर येतांच खिशांतली रिकामी बाटली टेबलावर ठेवून त्यांनीं फेटा सोडावयास सुरवात केली.

दुसऱ्या दिवशीं इंग्रजीच्या पहिल्या तासाला मास्तर आले, तेव्हां त्यांचा चेहरा नेहमींसारखाच प्रेमळ होता; आंत येतांच ते म्हणाले, "कालचा अर्धवट राहिलेला मराठीचा धडा आतांच संपवूं आपण !"

मुलें एकमेकांकडे विस्मित नजरेनें पाहूं लागलीं !

पुष्कळांकडे पुस्तकें नव्हतीं.

ती त्यांची आपापसांतील कुजबुज ऐकून मास्तर हात वर करून किंचित् स्मितयुक्त स्नेहाळ चेहऱ्यानें म्हणाले, "अरेऽ शिकायला नेहमीं पुस्तकंच लागतात असं नाहीं, वेड्यानों ! अन् पाहिजेच तर ..हें माझं एक पुस्तक आहेच कीं तुमच्या पुढं —!..."

"घ्या बरं, दामले, हें पुस्तक ! वाचा ! कालचाच धडा वाचा !..." आपल्या बांकावर विचारी मुद्रेनें स्तब्ध बसलेल्या दामलेकडे पाहून मास्तर पुढें म्हणाले "अन् हें पहा, कालच्याच ठिकाणीं करा सुरूं !"


दामले उभा राहिला; मास्तरांचें पुस्तक समोर ठेवून अगदीं गंभीर होऊन तो हळूंहळूं वाचूं लागला—

"आपल्या आयुष्यांत असे पुष्कळ प्रसंग पहावयास मिळतात,...मनुष्य हटकून मोहांत पडतो;...आणि त्या झंझावातांत सांपडलेल्या जर्जर जिवाला वैतागानें स्वतःचीं आयुष्यांतील उदात्त तत्वें जर मृगजळासारखीं वाटूं लागलीं, तर..."

आणि आज मास्तरांच्या त्या आगंतुक मराठी तासाला नंतर बराच रंग चढला !......

---






एका मोठ्या माशानें दुसऱ्या लहान माशाला गांठलें !

त्याला गिळायचा विचार होता त्याचा !

धाकटा मासा जिवावर उदार होऊन ओरडला, "अन्याय ! अन्याय !! मलासुद्धां जगण्याची इच्छा आहे !... तुझ्यासारखा मलाहि जीव–आहे ! निसर्गाच्या राज्यांत सर्वच मासे सारखे ! नव्हे का ??"

मोठा मासा कुरकुरत उत्तरला, "...काय कटकट आहे रे ?...मी नाहीं वाद घालीत बसत. आपण समान योग्यतेचे आहोंत कीं नाहीं, त्याविषयीं !... पण कायरे ? मी तुला खाऊं नयेसं वाटतं ना तुला ?...अंऽ?...बोल लौकर !"

छोटा धडधडत्या छातीनें उत्तरला— "हो !"

"मग घाबरूं नको मला ! मी करणार तेंच करायला आतां तुला मोकळीक देतों मी ! काय ? चल ये पाहूं पुढं ! गीळ मला, असेल हिंमत तर आटप ! हं !"

बिचार लहानगा मासा ! त्यानें आपला चिमुकला जबडा पेंचला !—

तें बडें धेंड आपल्या बारक्याशा तोंडांत मावेल या आशेनें तो त्याच्या भोंवतीं भोंवतीं फिरला !...त्यानें आपल्या जीवाचा अगदी आटापिटा केला !—

अखेर शेवटीं त्यानें एक दीर्घ निश्वास सोडला; व मन घट्ट करून तो त्याला म्हणाला "हं !... आहे खरं, बाबा ! तुझीच सरशी !...चल...गीळ मला !"

तें बडं प्रकरण पुढें झालं !...

नि हें छोटं तिथेंच आटोपलं !!

---

# खडा

एका शहरांतील नुकतीच डागडुजी केलेला रस्ता !...

एक गाडी येऊन गेली; चाकानें त्यांतला एक खडा सुटला.

आपल्याशींच तो म्हणाला— "माझ्या इतर जातभाईशीं इतका निकट संबंध ठेवून त्यांच्यांतच कां रहावं ?...मी आपला निराळा राहीन !"

एक मुलगा आला; त्यानें तो वर उचलला.

खड्याच्या मनांत विचार आला, "पाहिलं ! इच्छाच पाहिजे तितकी उत्कट !...वाटलं, प्रवास करावा...कीं प्रवास सुरू !..."

त्या पोरानें त्याला एका घराकडे भिरकावलें !

खडा स्वतःशीं विचार करीत होता, "आपण उडावं अशी कल्पना मनांत आली मात्र; हा पहा उडूं लागलों !... इच्छा मात्र तितकी प्रबळ हवी !!..."

खळ्ळ्ळ् !......

खडा एका खिडकीच्या तावदानांतून आंत शिरला; तशी कांच ओरडली, "ए बदमाष ! ...काय करतो आहेस हें?..."

खडा तिला ताठ्यानें उत्तरला, "जरा बाजूला होतीस, तर काय अंगाला भोकं पडतीं का ?...मला नाहीं आवडत माझ्या वाटेस कुणी आलेलं ! घडतं तें सर्व माझ्या सुखासाठीं घडतं ! हें तर माझं ब्रीदवाक्य !..."

पुढल्याच क्षणीं तो एका मऊ गादीवर पडलेला होता.

मनांत विचार आला, "चला ! थोडा वेळ उडालों; आतां कांहीं काळ स्वस्थ पडून विश्रांति तरी घेऊं !..."



पण तेवढ्यांत एक नोकर आला; त्यानें त्याला त्या खड्याला बाजूला उचलून घेतलें; नि पटकन् खिडकींतून बाहेर भिरकावलें !...

तेव्हां तो खडा बिचारा पुन्हा त्या भरीला घातलेल्या रस्त्यावरील इतर खड्यांत जाऊन पडला ! !...

मग तो खडा, खड्या सुरांत आपल्या भोवतालच्या असंख्य बांधवांना म्हणाला, "भाई हो...ठीक आहे ना ? नुकताच एका राजेशाही बंगल्यांतून परतलों !..."

कोणीच कांहीं बोललें नाहीं !

तरी तो खडा पुढें म्हणाला "पण तो श्रीमंती थाट मला कसला पटतो ?... माझं हृदय या गरिबाऊ जमावासाठीं तिळतिळ तुटूं लागलं ! मला राहवेना ! मीं परतलोंच शेवटीं ! !"

पण इतकें झालें तरी कोणीच कांहीं बोललें नाहीं ! ! !

# कोसळणारा वाडा

राजमार्ग त्याच्या दुतर्फा ऐसपैस लांबपर्यंत गेला होता.

रस्त्याच्या त्या मध्यवर्ति वाड्याच्या भिंतीवर, वेगानें चालणाऱ्या कित्येक वाहनांनीं क्षणाच्या चुकीनें कपाळमोक्ष करून घेतला असेल !

भोंवतालच्या सर्व नव्या वातावरणांत हा कोसळावयास आलेला, पण भर रस्त्यावर मान पसरून अनर्थ करणारा, ओंगळ वाडा पाहिला कीं, कांहीं प्रगति-प्रिय जीवांच्या कपाळास आठ्या पडत.

आणि त्यांचे पुष्कळ अंशीं खरें होतें. जवळपासच्या लहानलहान जुनाट इमारतींनीं परिस्थिति जाणून माना वांकविल्या होत्या. तेथें आतां नवीन टुमदार इमारती उभ्या झाल्या होत्या. मध्यावर पसरलेल्या विस्तृत तलावाला लागून जाणारा तो रस्ता; आणि त्याला लागून उभ्या असलेल्या त्या इमारती...

तो देखावा सुंदर दिसे.

तो वाडा मात्र अगदींच जुनाट !

एके काळीं त्यांत ऊर्जितावस्थेतील कुटुंबें नांदत होती. वारा, पाऊस, ऊन, सर्वांच्या माऱ्यातहि, किती शतकें तो तसा शीरसलामत उभा राहिला होता कोणास ठाऊक ...

पण आतां ते सुदिन संपले; काळ बदलला होता.

परवां परवांपर्यंत फुकट म्हणून आंत रहाणारीं गरीब कुटुंबेंही वापरत असलेल्या खोल्या निर्जन टाकून, दुसऱ्या नव्या खोपटांत रहावयास गेलीं होतीं.

अगदीं प्रत्येकालाच वाटत होतें. 'आतां हा वाडा खरोखर कोसळावयासच आला आहे !'



बाहेरचे चित्रविचित्र फिक्कट रंग अजूनदेखील चुकल्या वाटसरूला आकर्षिण्याचा प्रयत्न करीत; पण आंत मात्र धुळीचें साम्राज्यच फार माजलें होतें !

निशाचर वटवाघळें, सर्वसाधारण जगाचा डोळा चुकवून उलटीं टांगून किलकिलाट करीत; तोच आंतील शब्द ! लहानसान कीटकांना खाऊन धष्टपुष्ट झालेले कोळी सर्व घरभर दुष्ट हेतूनें विणीत असलेलीं जाळीं; हीच तेथलि कारागिरांची कामगिरी ! लठ्ठ घुशींच्या नांड्यांचीं पायापर्यंत खोल बिळें खणण्यातील उत्सुकता व दक्षता; याच तेथील मूर्तिमंत इच्छाआकांक्षा !!...

उलट्यासुलट्या वाऱ्याच्या लहानसान झुळकांनींही त्याचे नबळे भाग कोसळत; जणूं काय प्रत्येक झुळकीनें तो जास्त जास्तच खचत चालला होता !...आपली दुबळी मान टाकत होता !

जुनें काम तसें एके काळीं भक्कम वाटण्यासारखें होतें; पण बदलत्या परिस्थितीला आतां तेंच निरुपयोगी व्हावें यांत आश्चर्य काय ?

आणि म्हणूनच सूज्ञ त्याच्या आश्रयाला रहावयास तयार नव्हते.

पुष्कळांना वाटे, 'पडेल तर बरा !'

बहुतेकजण त्याच्या कोसळण्याची वाटच पहात होते !

"सध्यां पांचदहा मिरासदार स्वार्थी प्राण्यांनीं राजरोस आडवलेली जागा सर्वोपयोगी अशा नूतन इमल्यानें व्यापली जावी;...राजरस्ता मोकळा व ऐसपैस व्हावा; कासाराचें सौंदर्य वाढून त्यावर येणाऱ्या लहरी आपल्याबरोबर प्रगतिप्रिय मनाला पुढेंपुढें अनंत मर्यादेपर्यंत नेऊं लागाव्यात !" ही त्यांची इच्छा !...

"शेवटीं असा एक क्षण येईल, कीं त्या वेळीं त्याचा डोलारा खालीं यावयास एखादी लहानशी झुळकहि पुरे होईल; आणि तो क्षणहि अगदीं निकट आहे," हें ते सर्व जाणून होते.

'पण हा विलंब तरी कशाला हवा ? आपणच त्यावर प्रहार चालविली तर ?' त्यांच्या डोक्यांत कधीं कधीं विचार येई.

'पण नको ! नव्या इमारतींच्या तयारीस लागा; तो तर आतां आपोआपच खालीं येईल !'—अशी उलट त्यांची मनोदेवता त्यांना सांगूं लागे.

तज्ञ शेवटीं सहज चौकशीसाठीं आंत शिरून पाहूं लागले.

चोहो बाजूस निराशेचें वातावरण पसरलें होतें ! ठिकठिकाणी धुरळा उडत होता; आंतील लहान मोठे किटक स्वार्थी हेतूनें एकमेकांवर मात करूं पहात होते !

तेथील ती अधाशी वृत्ती पाहून त्यांना वाटलें, "हें असेच चालेल, तर नुसत्या या आपसांतील धांगडधिंग्यानेंहि तो खालीं येईल !"

कारण बहुतेक भाग जमिनीशीं हितगुज करीत होते; मानवी वाऱ्याची ही नवी झुळूक येतांच उभ्या भिंतीहि थरथरूं लागत !—

शेवटीं, नैसर्गिक वातावरणाचें वावडें असलेल्या आंतील प्राण्यांची पळापळ सुरू झाली; वाघळांचा फडफडाट झाला; कोळी भरभर जाळयाच्या कोंपऱ्यात लपले. घुशी पायापर्यंत नेलेल्या बिळांत दिसेनाशा झाल्या.

जिकडें तिकडें एकच एक हाःहाःकार माजला !

इकडून तिकडे तिकडून इकडे झालेल्या या हालचालीनंतर सगळीकडे पुन्हां नेहमींची प्रेतकळा पसरली.

अवशिष्ट राहिलेल्या मध्यभागाच्या समोरासमोरील भिंती जरा एकमेकांकडे कलल्या होत्या. आपल्या वृद्धापकाळीं, एकमेकांच्या आसऱ्यासाठींच व आपलें मनोगत सांगण्यासाठींच जणूं त्या जवळ आल्या होत्या !

"समजलं का ते कां आले आहेत ?"

"हो, आपलीच वासलात लावायला !"

"म्हणजे ? संपलंच म्हणावयाचं आपलं आयुष्य !"

"इतका काळ लोकोपयोगी होऊन मैत्रीनं जवळ जवळ राहिलों ! आपण अनेक सुजनांचं छत्र होतों..."

"आणि आतां..."

"खुल्या वातावरणाचा गंधहि नाहीं...स्वार्थी कीटकांचीं हीं जाळीं..."

"नको तें चित्र डोळयांपुढं ! जिणं कंटाळवाणं झालं आहे !..."

"सुजनांचा संपर्क संपला ! सर्व सुज्ञ तर बाहेरच्या खुल्या वातावरणांत ! आणि आंत हा असा नीच धुडगूस !...एक दुसऱ्याची नरडी दाबायला आपला सदा तयार !"

"वाटतं परिस्थितीला मान वांकवावी !..."



"आणि म्हणावं आपले दिवस संपले !..."

"बोलणं सोपं ! पण बाई करणं कठीण !..."

"खरंच !... आठवतात तुला ते मागले दिवस ?..."

दोन्ही भिंतीच्या अंगावर कांटा उभा राहिल्यासारखें झालें !...

"हं हं संभाळ !" दोघीहि एकमेकींना इषारा देण्यासाठीं ओरडल्या.

"आपलं तारुण्यं गेलं; आतां बाई, भावनांचा आवेग आवरला पाहिजे; नाहींतर जिवावरच बेतायचं !...अंऽ?...कांग...?...हंसतेसशी ?..."

"हंसू नको तर काय करूं ? जिवावर बेतायचं आणखी कांहीं निराळं राहिलं आहे का ग ?"

"हंऽ ! तेंहि खरंच !...पण आणखी जनसेवा करावीसं वाटतं ना !..."

"हो पण, तुम्ही आम्हींच करावीसं कुणी सांगितलंय् ?...आपल्या मागच्यांनां द्याना वाट करून !..."

"पण एके काळीं आपण..."

"एके काळची परिस्थिती सर्वकाळ रहावी असाच कां तुझा अट्टाहास ?"

"पण आपण अजून..."

"समजलं समजलं !...हें पहा, वातावरण बदललं आहे. गरजा निराळ्या झाल्या आहेत ! तुझ्यामाझ्या सेवेची आतां अपेक्षा नाहीं. !..."

"आपण उचलून धरलेलं छत्र कुणालाच नको म्हणतेस, तेव्हां ?..."

"कुणाला पाहिजे आहे हें पहातच आहेस ! जरा भोंवतीं डोळे फिरव हवे तर !..."

सबंध वाडा एकदां मोठ्यानें हदरला !...

पाहणी करणारी मंडळी भराभर बाहेर पडली.

कोळी मात्र या कोपऱ्यांतून त्या कोपऱ्यांत गेले. घुशींनीं बिळांतून तोंडें बाहेर काढून पुन्हा आंत घातलीं; वाघळांनीं जागच्या जागीं एकदम कर्कश शब्द केला.

तेव्हां बाहेरची मंडळी कुजबुजली—"कांहो कोसळतोय कीं काय ?..."

पण आंत तर मर्यांचीच विचारसरणी पुढें चालू होती !

" पाहिलंस का काय गोंधळ उडाला !..."

" पण एकाच परिस्थितींत खिचपत पडणारे हे जीव ! यांच्याच उपयोगी पडायचं ना आपण?...यांच्याचसाठीं आपलं हें छत्र?...त्यापेक्षां..."

" पण आपल्यानंतरची रचना-घटना तरी लोकोपयोगी होईल का ?... लोक पुन्हा वापर सुरूं करतील म्हणतेस ?..."

" हो खरंच; तोहि एक प्रश्नच आहे !..."

" शंकाकुशंका कशाला उगीच ?" जमिनीकडून एकदम गंभीर आवाज येतांच दोन्ही भिंती दचकून जास्त खालीं वांकल्या.

" काय म्हणालांत, मोठे आजोबा ?" दोघींनीं पायाकडे पाहिलं.

" नाहीं, म्हटलं शंकाकुशंका कसल्या काढीत बसलां ? नव्या घटनेची काळजी करून तुम्हांला काय मिळणार आहे जास्त ?...मी तर आज अनंत काळ तुमच्यासारखीं बालकं येतांना नि जातांना पहात आहे. एकाचा काल संपला कीं दुसरा त्या जागीं येणारच ! स्वतःच कायमचं रहावं हा अट्टाहास कां तुमचा ?.." पाया गांभीर्यातें म्हणाला.

" तसं नव्हे, आजोबा !" त्याच्या बाजूस जास्त झुकून त्या म्हणाल्या, " पण यानंतर आतां आमची वाट काय ?"

" तुमच्यांतील चांगला अवशेष नवीन रचनेच्या भरीला पडेल; बाकी व्हाल जमीनदोस्त ! याशिवाय जास्त अपेक्षा कशाला ?..."

" पण आजोबा, आमच्यामागून होणारी इमारत आमच्याहून जास्त चांगली व उपयुक्त होईल कांहो ?..."

" तुम्हाला कां काळजी ?...अगदीं जगाच्या सुरवातीपासून आपणच असल्यासारखं एखाद्यानें कां बोलावं ? मला समजत नाहीं !—"

" तसें नव्हे ! मनाला आपलं तेवढंच समाधान !..."

" तर मग एवढं आपलं लक्ष्यांत असूं द्या ! माझ्या पायावरील कोणतीहि घटना हितावहच होईल !...तुम्ही सुखानं निरोप घ्या !..."

त्या दोघी एक क्षणभर अगदीं जवळ जवळ आल्या.

वरील छप्पर गदगदां हलूं लागलें; आंतील जीवांची एकाएकीं सुरू झालेली



ती कर्कश आरडाओरड !...

" पाहिलंस ! हें एक आणखी नवंच संकट !..." एक भिंत जमिनीवर कलतां कलतां म्हणाली, " आपल्या आसऱ्याच्या या जीवाचं—"

" अगबाई खरंच !"

दुसरीहि अगदीं लवंडलीच !

धडाड् !...धडाड् ! ! धड् !...धाऽऽड् ! !

झालें ! वाडा एकदांचा कोसळला !

आपापसांतील स्वार्थासाठीं विणलेलीं जाळीं विरलीं !—

आप्पलपोटेपणानें परक्यांना पुरणारीं बिळें बुजालीं.

कर्कश शब्दांचा एकच ओरडा झाला ! शिव्याशाप बाहेर पडले !

पण छप्पर खालीं कोसळतांना झालेल्या भीषण निनादांतूनही वाड्याच्या पायाचा तो गंभीर आवाज सर्वांना ऐकूं येत होता–" हरकत नाहीं !...जा ! जा ! ! जीव उगीच मागं ताटकळत नका ठेऊं ! बहुजनसमाज बाहेरच आहे ! !..."

# जगावेगळं

आम्ही राजकारणाच्या किंवा समाजकारणाच्या गोष्टी बोलत होतों असें नाहीं; पण नाही नाहीं म्हणता जवळ जवळ अर्धा तास तरी आनंदानें बोलत बसलों होतों.

शेवटीं हंसतमुखानें त्याच्यापुढें कोल्ड्रिंकचे पांच पैसे चुकते करून, मी रस्त्यावरच्या गर्दीत पाऊल टाकलें मात्र;...पुन्हा उन्हाचा रखरखाट सुरू झाला. भोंवतीं वर्दळ चालूच होती पूर्वीसारखी; प्रत्येकजण आपलेंच घोडें पुढें दमटीत...

आम्हा मराठी संपादकांचें आयुष्यच मोठें गमतीचें (!); एकएका अंकाची प्रसिद्धी म्हणजे एक एक बाळंतपण; त्याच दिवशीं एका दूरच्या मित्राला लिहिलें होते—"माझ्या गैरशिस्त व्यवस्थापकाविषयीं तूं तक्रार करतोस होय ? पण माझे आई, माझ्या ऑफिसांतल्या शिपायाला जरी चार शिव्या हसडल्यास, तरी त्या मला एकट्यालाच पोहोचतील. तुला इकडली जरा बित्तंबातमी सांगतों आपली; इथल्या सर्व 'म्हारकी'ची केंद्रित जबाबदारी एका व्यक्तीतच समावलेली आहे ! तेव्हां मला शिव्या द्यावयाच्या नसतील तुला तर माझ्या व्यवस्थापकाला किंवा शिपायालाहि एकादी शिवी देत जाऊं नकोस कधीं !"......

...आणि याच नियमाप्रमाणें मी आज माझ्या मासिकाचा जाहिरात-एजंट म्हणून व्यापारी भागांतून मोठमोठ्या पाट्या वाचीत फिरत होतों.

चार ठिकाणीं ठरल्याप्रमाणें नकार ऐकून, पायऱ्या उतरून रस्त्यावर येतों, तो डोक्यावर पुन्हां तळपता सूर्य रागारागानें बोलूं लागला; व समोरचें ल्हानसेंच 'कोल्ड्रिंक हाउस' तर मला हांकाच मारूं लागलें.



'चला' असें आपल्याशींच पुटपुटत मी रस्ता ओलांडून आंत शिरलों.

बांकावर बसतों, तों एक हंसतमुख प्राणी-बहुतेक तिथला मालकच-मजपुढें येऊन आदबीनें उभा राहिला !

मी रॅकेनें ठेवलेल्या तांबड्या हिरव्या बाटल्याकडे पहात म्हटलें, "कसलं देतोस बाबा सरबत ?"

"कसलं देऊं ? नारिंग, चफरचंद, डाळींब, पाइन..."

"दे झालं कसलं तरी !" मी विशेषशी चिकित्सा केलीच नाहीं.

"केशरी देऊं ?" तो हंसून म्हणाला, "केशराचाच नुसता अर्क आहे तो, साहेब !"

"हं ऽ ! होना देव" मी किंचित् बेफिकीरीनेंच म्हणालों- "एकूण आंत बर्फ असलं म्हणजे झालं !"

सरबत तयार करतांनाची त्याची चलाखी; बर्फ आंत टाकतांच ग्लासाच्या तोंडावर एक हात ठेऊन दुसऱ्या हातांतील चमचानें तें घुसळणें !......सरकन् त्यानें गवताची नळी काढून ग्लासांत टाकली व तें मजपुढें ठेवलें.

मी नळीनेंच बर्फ ढवळलें आणि एक गारसा घोंट घेत त्या चिंचोळ्या दुकानांतील व्यवस्था पाहूं लागलों.

निरनिराळीं चित्रें लावलीं होतीं. सत्रा निरनिराळ्या तारखा दाखविणारीं अनेक कंपन्यांचीं कॅलेंडरें, भिंतीवरील गेलेला रंग झांकण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होतीं.

त्याच्या घरमालकाचें 'वैभव' लपविण्याचा त्यानें प्रयत्न केला होता !

दुसरा घोट घेऊन मी क्षणभरच मनाशीं हंसलों.

आणखी कोणी गिऱ्हाइक नव्हतें; म्हणून तो समोरच्या खुर्चीच्या रांगेत बसला व रस्त्यावरील ये-जा पाहूं लागला.

मी माझ्या मागल्या भिंतीकडे दृष्टि वळवली. दोनतीन चित्रांतील मधल्याच एका चित्रानें माझें लक्ष वेधलें.

दोनतीन वर्षांपूर्वीचें कोणतें तरी कॅलेंडर होतें तें !

हिमानें आच्छादिलेलें तें पर्वताचें पांढरें पांढरें शिखर; भोंवती थोडथोडीं बर्फानें आच्छादिलेलीं हिरवीगार झाडें......

बर्फामुळें आलेल्या पोटांतील गारव्यानें मला क्षणभर वाटलें, मी त्या हिमालयांतच आहे जणूं !

आणखी एक घोट घेऊन मीं पुन्हां मागें वळून पाहिलें; व आपल्याशींच आणखी एकदां हंसलों.

त्याचं लक्ष होतं माझ्याकडे—

" कां साहेब, हंसलात हो ? "......

" नाहीं ! तुझी एक एक करामत पहातोंय् इथली बसल्याबसल्या ! " मी ग्लास टेबलावर ठेऊन म्हणालों.

" कां ? काय झालं ? " तो थोडें गोंधळून सभोंवार पहात म्हणाला.

" विशेष नाहीं कांहीं ! हें हिमालयाचं चित्र लावणाराचं लक्ष गिऱ्हाइकां-कडे होतं मला वाटतं !...उलटच लावण्याची लहर लागलेली दिसते त्याला ! " मान खालीं वांकवून मी आणखी एक घोट घेतला.

" मींच लावलं साहेब तें चित्र ! उलटं न् सुलटं ! पाहायसाठीं नाहीं तें. " तो उठून उगीचच चित्राकडे जात म्हणाला.

" म्हणजे ? "

" साहेब, मालकाला जागा-भाडं ऐशीं रुपये देतों. बायको अन् चार पोरं आहेत पाठीशीं !...चालवावं लागतं दुकान ! दुसरं काय ?...मालकाला तर दिडकी खर्चायला नको !...रंग गेला, चुना पडूं लागला, तिथं एक मोठं भोंक पडलं भिंतीला, शेवटीं. म्हटलं, मालक नाहीं दुरुस्त करीत तर आपण तरी लपवून टाकावं तें ! हो ! चार गिराईक येणार जाणार...तेव्हां टाकलं झालं, चार खिळे ठोकून चित्र भिंतीला लटकवून ! "

त्याची बचावाची मुळमुळीत पद्धत पाहून मला हसूं आलें.

" कबूल रेऽ ! पण म्हणून हिमालयाला डोक्यावर उभा करायचं नव्हतंस असं !...सरळ, चार लोक लावतात तसं नीट लावलेलं चित्रसुद्धां मागली पडकी भिंत झाकूं शकतं ! पण आतां तर हा शिखरावरचा बर्फ केव्हांतरी वितळून तुझ्या दुकानांत एकदम पाणीच पाणी होईल असं वाटतंय् ! अन् मग काय गार-गार सरबतच सरबत ! " मी मुद्दाम त्याची थट्टा करीत म्हणालों.



तो अगदीं मनमुराद हंसला. मग थोडा वेळ विचार केल्यासारखें करून तो हळूच म्हणाला, " खरं साहेब तुमचं म्हणणं ! पण तुम्हीच पहा. आतां इतकीं गिऱ्हाइकं येतात; पण प्रत्येक आपापल्या धांदलींत. आणि आम्ही तरी कशाला; लक्ष देणार ? एकेका माणसामागें पैसा मिळायचा; एवढं भाडं, नोकराचा पगार, पाठींमागचीं बायकापोरं, यांचीच सारखी काळजी !...कुणाला कुणाशीं बोलायला वेळ आहे, साहेब ? प्रत्येक येतो; आपली सोय बघतां बघतां सभोंवार पहातो; काम झालं कीं चालला... "

मी सरबताचे शेवटचे दोनचार घोंट घेतले. आणि त्या तत्वज्ञान्याकडे कौतुकानें पहात उभा राहिलों.

" इतकीं सरळ टांगलेली कॅलेंडरं आहेत !–पण या एका उलट्याविषयींच तुम्ही चौकशी केलीत ? " तो पुढें थोड्या गांभीर्यानें पण वरवर हंसून म्हणाला–" सरळ नेहमींसारखंच लावलं असतं हें चित्र तर आपल्यासारखीं माणसं माझ्याबरोबर बोललीं तरी कशाला असतीं ? सरबत प्यायला येणारे इतर तसेच तुम्ही एक !... पण साहेब, आज आपली त्यामुळेंच तर ओळख झाली; आपण एकमेकांबरोबर बोललों;...हें काय थोडं झालं ? असलं जगावेगळं कांहींतरीं चमत्कारिक असलं तरच आमच्यासारख्या लहान माणसांची आपल्यासारख्या थोरांशीं ओळख व्हायची ! "

त्यानें मजकडे पाहून स्मित केलें. मलाहि त्याच्या बोलण्याची मोठी गंमत वाटली. —' जगा वेगळं !?'...

मी पायऱ्या उतरतां उतरतां मनांत हसूंन म्हणत होतों—" अरे कोण मोठा अन् कोण लहान, बाबा ? तूं म्हणतोस तसं जगावेगळ्याशिवाय मन आकर्षिलं जात नाहीं एवढं मात्र खरं !...हं...जगावेगळं !!–"

अन् मग मी कायम ठशाच्या गर्दींत जाहिरातीच्या पाट्या पहात शिरलों.

...उन्हाचा रखरखाट सुरू झाला; भोंवतीं वर्दळ चालूच होती पूर्वींसारखी; प्रत्येक जण आपलेंच घोडें पुढें दामटीत...

———



परवांच्या इलेक्शनच्या गडबडीमुळें मला माझ्या कांहीं वर्षांपूर्वींच्या धडपडीचें हंसूं आलें; आणि ओघानेंच ते दोन तीन प्रसंगहि आठवले.

माझ्या सविस्तर पत्राला बाबांनीं नकारार्थीं तार पाठविली; त्याच दिवशींचीं, प्रभातफेरी, लाठीमार, घोडदौडी, यांचीं वर्णनें पुन्हां वाचतां वाचतां माझ्या सात्विक संतापानें उचल खाल्ली; आणि स्वतःच्या आजपर्यंतच्या नामर्दाईची मला फार लाज वाटली.

त्या दिवशीं डोक्यांत सारखे विचार चालले होते !...निष्ठुर लाठीमार. जखमांतून सांडणारें रक्त—सत्याग्रहांतील एकेक दृश्य...

अनत्याचार म्हटलें म्हणून काय ? युद्धच जुंपलें होतें. तें एक ! सारी रात्र मी जागूनच काढली.

मला वाटत होतें, 'बाबांना कांहीं भावना आहेत कीं नाहींत ? पण आपण तरी त्यांचं नेहमींच अक्षरशः का ऐकावं ?'

शेवटीं कोंबडे आरवूं लागले. आमच्या वसतिगृहाच्या स्नानगृहांतून बालद्या आपटल्याचा आवाज झाला. एखादी गरम पाण्याच्या वाफेबरोबरच निघणारी कोणाच्या तरी गाण्याची लकेर कर्णपथावर आदळूं लागली.

मी बिछान्यावर झटकन् उठलों. टॉवेल खांद्यावर टाकला; कोनाड्यांतील साबणाची पेटी हातांत घेतली; आणि खोलीला कडी लावून खडावांचा 'चटक् पट्' आवाज करीत आंघोळीला निघालों.



बंबाखालच्या धगधगत्या भट्टीजवळच जोगळेकर ब्रश घाशीत उभा होता. त्याचा निस्तेज बसक्या गालांचा चेहरा पाहून मी मनाशींच किंचित् हंसलों; आणि स्वतःशींच उपहासानें म्हटलें —"हे आमचे हिंदुस्थानचे तरुण; पुस्तकं घोकून देशाची सेवा करणार ! साऱ्या स्कॉलरांची एक जात एथून तेथून !"

बालद्या नेऊन एका खोलींत टाकल्या व दार बंद केलें. त्या थंड हवेंत अंगावर पडणाऱ्या गरम पाण्यांतून निघणाऱ्या वाफा माझ्याशीं विचारविनिमयच करीत होत्या जणुं..."ही आपली इथली शेवटचीच अंघोळ बरं ! आतां युद्धांत कुठलं गरम पाणी ? अंघोळ तरी करायाला मिळेल कीं नाहीं कुणास ठाऊक !"

अंग पुसतां पुसतां विचारांचें काहूर उठत होतें—"देशांतला वणवा भडकला आहे; आणि आम्ही कारकुनी विद्या हस्तगत करण्यासाठीं धडपडत आहों; हाडांचीं काडं करीत आहों !...आणि इतकं असूनहि बाबा म्हणतात...छे ! अशा वेळीं त्यांचं काय म्हणून ऐकायचं ?..."

सकाळच्या वाऱ्याची एक मंद झुळुक माझ्या स्नानमुळें उत्तेजित झालेल्या अंगाला गोंजारून गेली. मला वाटलें त्यांतूनहि मला तोच संदेश मिळत आहे.

मनाशीं म्हटलें, "ठरलंच आतां !"

दार उघडून मी पुन्हां कॉटवर पडलों. स्प्रिंग करकरल्याचा आवाज होतांच, माझ्या मनांत प्रतिध्वनी उमटला, "बाबारे, देशाच्या या हलाखीच्या दुःखद स्थितींत तुला अजूनहि असल्या मऊ गाद्या-गिरद्या आठवाव्यात ना ?"

विंचू डसल्याप्रमाणें मी चटकन् उठलों. पसरलेलें बेडिंग बांधलें.

घोंगडी, चादर, दोन तीन खादीचे सदरे, यांची एक लहानशी वळकटी केली. मऊ बिछाना गुंडाळून जाड दोरानें करकचून बांधला, व कोपऱ्यांत टाकला. छानछोकीचें सारें सामान एका कोपऱ्यांत उडवलें.

काल परवांच सुशोभित दिसणारी ती खोली आतां ओकीओकी दिसत होती.

खिडकीखालीं टाकलेल्या घोंगडीच्या वळकटीवर मी डोक्यावर हात घेऊन पाय जवळ ओढून बसलों. माझा विचार चालला होता.

बाबांची संमति नव्हती; तरी गुलामी मनानें उभारलेल्या नरकांत खिचपत पडण्यापेक्षां चळवळींत मनापासून पडावयाचें मीं ठरविलें होतें. त्यामुळें मनाला

वाटणारा एक प्रकारचा उत्साह अंगांत फिरत होता; डोळ्यांपुढें आपल्या भावी यशाचीं कल्पनारम्य चित्रें उभीं रहात होतीं...

सकाळच्या एक्स्प्रेसला निघावयाचा बेत...'आपल्याला दोस्त पोंचवायला स्टेशनवर येतील!' हा विचार नको नको म्हणतांहि मनांत डोकावलाच!...

एखादा हार...फोटो...वर्तमानपत्रांत नांव...

तोंच दारावर 'टक् टक्' आवाज आला. दोनदां ऐकल्यावर भानावर येऊन मी एकदम दचकलों.

उजाडण्यापूर्वी कोण आला माझ्याकडे मला समजेना!

कडी काढली. तों एक बत्तीस तेहतिशीचा मनुष्य मजपुढें उभा!

'ना ओळख ना देख; याचें सकाळींच मजकडे काय काम?'—

पण तो कांहीं एक न बोलतां एकदम आंतच शिरला.

"काय पाहिजे?" मी आश्चर्यानें त्याच्या हालचालीकडे पाहूं लागलों.

तो एकदम खिडकीकडे गेला. कठड्यावर बसून झटकन् उठला. नंतर प्रत्येक कोंपरा तपाशीत तो माझ्या टेबलाशीं आला. टेबलाकडे थोडेसें पाहून त्यानें मागल्या कोपऱ्यांत पाहिलें. दाराशीं आला व कड्या खालीं-वर करूं लागला.

पुन्हां कॉटजवळ जाऊन क्षणभर बसला. तेथून उठून हंसत हंसत खोलींत येरझारा घालीत कांहींसें पुटपुटला. मग खिडकीजवळ जाऊन एक पाय धक्क्यावर ठेवीत त्यानें आपली दृष्टि खिडकीबाहेरील काळोखांत स्थिर केली.

पुन्हां त्याला काय वाटलें कोणास ठाऊक? माझी खुर्ची खिडकीजवळ ओढून तो तिच्यावर बसला; व पूर्वीप्रमाणेंच किंचित् स्मित करीत तो पुन्हां काळोखांत पाहूं लागला.

एकामागून एक सारखे होत राहणारे त्याचे हे चाळे मला शेवटीं असह्य झाले. ओळख नाहीं कांहीं नाहीं. हा माझ्या खोलींत एकदम शिरतो काय आणि कांहींएक न बोलतां वेड्यासारखा...

'खरंच, वेडा तर नसेल हा?'...माझ्या डोक्यांत चटकन् विचार आला; आणि मी त्याच्याजवळ जाऊन उभा राहिलों.



कांहीं वेळ असाच स्तब्धतेंत गेल्यामुळें तो मजकडे मान वळवून गालांतल्या गालांत हंसला. "मी कुणी वेडा आहें असंच वाटलं असेल तुम्हाला, नाहीं?"

माझ्या मनांतली कल्पनाच त्यानें बोलून दाखविलेली पाहून मी दचकलों!

"सर्व दृष्टींनींच मी वेडा आहें!" तो हंसून म्हणाला, "नि या ओळखीच्या खोलींत शिरतांच मी तर जास्तच वेडा झालोंय्."

मला अजूनहि कांहीं उलगडा होईना.

मी गोंधळून त्याच्याकडे पाहूं लागलों.

"त्याचं असं पहा..." त्याचे डोळेच जणूं काय त्याच्या मनांतलं सारं बोलत होते. "याच खोलींत मी दहा अकरा वर्षांपूर्वी रहात असें. माझं टेबल असे त्या कोंपऱ्यांत; कॉट दाराला लागून. आरामखुर्ची ठेवीं या खिडकीजवळ; आणि मग तासचे तास वाचीत नाहींतर या टेकडीवरील नानाविध दृश्यं पहात विचार करीत बसे;...एकाएकीं ही खोली सोडीपर्यंत माझा असा क्रम चाले. किती छान खोली आहे, नाहीं? कुणालाहि प्रेम वाटावं तिच्याबद्दल! अलीकडे नोकरी लागल्यापासून अनेक वेळां जातां येतां मी पाहीं; तों कुलुप असे. काल तुमच्याच कुणाचीशी घरून आलेली तार माझ्या पहाण्यांत आली. मींच यंत्रावर घेतली ती; कुणाच्या तरी वडिलांची होती; 'चळवळीस मिळण्याचा अविचार करूं नकोस!' अशा अर्थाचा मजकूर होता त्यांत. इतके दिवस संभाळून धरलेल्या मनाला पुन्हा क्षणांत वणवा लागला. जुन्या गोष्टी आठवल्या. ही माझी आवडती खोली. म्हटलं उठवावं लागलं आंतल्या विद्यार्थ्याला तरी हरकत नाहीं. चार शिव्या खाऊं!..पण आज आपल्या खोलींत क्षणभर बसायचंच!! म्हणून मुद्दाम काळोखांतून ठेंचाळत ठेंचाळत आलों. जिथं बसून, आतां साफ नाहींशा झालेल्या ध्येयांचें मनोरे बांधले, मूर्ती केल्या, त्या माझ्या देवळाच्या द्वारीं उभा राहिलों, कीं क्षणभर तरी मनाला समाधान वाटे. आज तर तुम्ही आंत बसूं दिलं! तुमचे आभार मानावेत तेवढे थोडेच!"

माझी पहिली-त्याच्या वेडेपणाची-कल्पना जेथल्या तेथें विरून गेली. किती विलक्षण! माझी व त्याची राहाण्याची खोली एकच!

त्याच्या बोलण्यावरूनच आतां मला समजलें. स्वारी पोस्टांत टेलिग्राफ क्लार्क असावी. पण ज्यामुळें त्याच्या मनाची विलक्षण खळबळ उडून देऊन आपल्या जुन्या खोलीची त्याला आठवण झाली, ती बाबांकडून मला आलेली तारहि याच्याच हातीं प्रथम जावी हा तरी चमत्कारिक योगायोगच नव्हे का ?

पण त्या तारेनें त्याच्या मनावर इतका परिणाम कां व्हावा, याबद्दल मात्र मला न समजून माझें कुतूहल वाढलें; एकदम जागृत झालें.

मीं तें तसेंच दाबून ठेवून त्याला विचारलें, "कां ? एकदम खोली कां सोडावी लागली ? कांहीं संकट आलं आपल्यावर ?"

"हॅः हॅः !" तो किंचित् उपाहासानें हंसून म्हणाला–"संकट तर खरंच ! पण तें माझ्या एकट्यावर नव्हतं ! साऱ्या देशावर !...पण ती फार फार लांब गोष्ट आहे...चला, आपण फिरायलाच बाहेर पडूं..."

मी वळकटी वरून उटलों. इतक्यांत त्याचें लक्ष माझ्या साऱ्या बांधलेल्या सामानाकडे गेलें. तो किंचित् चमकून म्हणाला "कां ? कुठं जायला निघालां आहां वाटतं ?...मग उगीच तुमचा वेळ मोडला मी...क्षमा करा हं !"

तो खुर्चीवरून उठला व टोपी चढवून दाराकडे वळला.

माझें कुतूहल जास्तच वाढलें; मी क्षणभर मनाशीं विचार केला. व म्हटले "तसं विशेष नाहीं. आपण फिरून येऊं शकूं सहज, पेन्शरांच्या मारुतीपर्यंत !"

"अंऽ ?"त्याच्या थोड्याशा हिंमुसल्या चेहऱ्यावर पुन्हां उत्साह चमकला; "तुम्हाला त्रास होत नसेल तर मी तयारच आहे. मात्र पेन्शनरांपेक्षां जोरानं जाऊं !...पण पेन्शनरसुद्धां नेहमींच तरुणांपेक्षा निराळे नसतात बरं का ! त्यांच्यासारखं हळूंहळूंच जाऊं बोलत बोलत..."

आम्ही दोघेहि कुलूप लावून हॉस्टेल डिस्पेन्सरीला वळसा घातला; आणि फर्ग्युसन टेंकडीकडे चढूं लागलों.

"माझं नांव गोरक्षकर—भाई गोरक्षकर !...हल्लीं एक सरकारी कारकून आहे पन्नास रुपयांचा !" तो आपल्याविषयीं हळूं हळूं माहिती सांगूं लागला.

त्याच्या प्रेमळ स्वभावाची मला गंमत वाटली; मी गप्प गप्पच चाललों होतों त्याच्याबरोबर.



"तुमचं नांव ?" त्यानें चालतांना एकदम मजकडे वळून विचारलें.

"मी साने ! भाऊ साने, भाईसाहेब ?" त्याच्याकडे क्षीण स्मित करून मीं म्हणालों. आतां त्याला आपली थोडीशी ओळख पटणार अशी माझी अटकळ होतीच.

आणि तसेंच झालें. तो क्षणभर चमकला व पांचसात पावलें चालल्यावर म्हणाला—"म्हणजे कालची तार..."

"हो, मलाच आली !...पण तरीहि मीं चळवळींत पडण्याचं ठरविलं आहे !" मी त्याचें वाक्य पुरं करून पुढें म्हणालों.

"काय चमत्कारिक घटना ही !" तो अस्पष्ट स्मित करीत थोड्या वेळानें म्हणाला. "आज अचानक तुमचीच ओळख व्हावी आणि तुमच्याशीं बोलण्याचा हा अकल्पित योग यावा !"

"देशांत असं युद्धकुंड पेटलं कीं आपल्यासारख्यांचं कुठंच लक्ष लागत नाहीं, नाहीं ?...वाटतं, आपले पूर्वज वेळोवेळीं कर्तव्याला जागले. आपण आपलं कर्तव्य केलं नाहीं तर आपले वंशज काय म्हणतील आपल्याला ? डोळ्यांदेखत दुसऱ्यांचे स्वार्थत्याग चालतांना आपण ठोकळ्यासारखें थंड पडून राहणं ! किती अशक्य ? तुम्हांला नाहीं असं वाटतं ?" तो मजकडे वळून क्षणभरानें म्हणाला.

तो जणुं काय माझ्याच मनांतील विचार बोलत होता.

"तुमच्यासारखीच मला माझ्या वडीलांची तार आली होतीं. त्या वेळीं आपल्या खोलीच्या खिडकींतून मी या टेकडीकडे पहात दिवसामागून दिवस विचार करीत होतों. शेवटीं ठरविलं कॉलेज सोडायचं !" भाईसाहेब मजकडे अर्थपूर्ण दृष्टिक्षेप टाकीत म्हणाले, "आणि मग मला वाटत होतं मी कोणी मोठा आहें. माझ्या बरोबरचे रुळल्या मार्गानं जाणारे किती संकुचित वृत्तीचे, स्वार्थी !.."

मला पटलेंसें पाहून ते पुढें म्हणाले, "केव्हां निघणार ? आज ?"

मीं मानेनेंच 'होय' म्हटलें.

"कुठं जाणार प्रथम ?...कोणतं कार्य हातीं घेणार ?"

त्यांनीं विचारलेल्या प्रश्नांनीं मी चमकलोंच.

त्या प्रश्नांचा मीं त्या क्षणापर्यंत कधींच विचार केला नव्हता. मीं कांहींच उत्तर दिलें नाहीं.

“ सीनिअर बी. ए. ला आहांत का ?...मी पण त्याच वर्गांत होतों !” भाईसाहेब थोड्या वेळानें म्हणाले, “ महात्माजींनीं म्हटलं कॉलेज सोडा, आम्ही सोडलं. ते म्हणाले तुरुंग भरा, आम्हीं भरले. चांगला वर्षभर होतों आंत ! माझे संसारी बाबा आपले तळमळ होते. पण थोड्याच दिवसांत गांधीजींची ‘ हिमालया-एवढी चूक ’ झाली; आणि आम्ही बाहेर पडलों. पदवी नाहींशी झाली होती. भावना संपल्या होत्या. बाबा आजारी आणि भावंडं वाऱ्यावर पडललेलीं...संसाराचे पाश असे अचानक माझ्यापुढें आले; आपल्या कल्पना अशा एकाएकीं ढांसळल्या, म्हणजे सामान्य माणसानं काय करावं ? रागावूं नका भाऊसाहेब, तुम्ही मग काय केलं असतं ?”

माझ्यापुढें सहजच एक चित्र उभें राहिलें. बाबा आजारी आहेत, त्यांना बिनपगारी रजा घ्यावी लागत आहे. आपला शरद्, सुनीती, आई, सारीं माझ्याकडे आशेनें पहात आहेत; आणि मी नोकरीसाठीं अर्ज करीत आहें; सुचनासें होऊन इकडे तिकडे फिरत पोटाच्या साधनाचा शोध करीत आहें.

“ मला वाटत होतं मी कुणी नेता होईन !” तेवढ्यांत भाईसाहेब पुढें हळू हळू शब्द उच्चारीत म्हणाले, “ पण तुरुंगांतून आल्यावर साधा लढवय्या शिपाई म्हणूनहि माझी कांहीं निराळी किंमत कुणी करायला तयार होईना ! घरीं जाऊन पाहिलं तों सारा गोंधळ माजला होता. माझा धाकटा भाऊ मॅट्रिक अर्धवटच टाकून नोकरी शोधीत होता...आईचे बरेचसे दागिने कमी झाले होते. देशसेवा करायची खरी...पण तीहि कायम कशी टिकणार ? माणसाला साधीं जगण्याचीं साधनं तर मिळविलीं पाहिजेत ?...बराच प्रयत्न आणि वशीले झाले. माझीं ध्येयं हळूहळू विरघळलीं. आणि शेवटीं आतां साध्या कारकुनींत माझं लौकिक आयुष्य सुरूं झालं आहे. क्षणभर असामान्यामागें लागलेला सामान्य थरांतील मनुष्य ! शेवटीं सामान्यांतच जाऊन पडयचा असा !”

त्यांचें संथ बोलणें चालू होतें. माझें विचार मात्र डळमळूं लागले होते !



“ तरुणपणांतील उत्साह भावनांवर उभारलेला असतो, भाऊ ! आणि सामान्य माणूसहि आपलं संथ आयुष्य सोडून असामान्य होऊं पाहातो; आटोक्याबाहेरील मोठ्या गोष्टींस मोठ्या हुरुपानं हात घालतो.” भाईसाहेब शांतपणें आपले विचार मांडीत होते. “ पण त्यांतून गळून पुन्हां जर का तो सामान्यांत मिसळला तर त्याचे सारे उच्च विचार, सारीं ध्येयं कुठल्या कुठं गडप होतात; आणि या एका निरुत्साहानंच तो थेट दुसऱ्या टोंकापर्यंतहि पोहोंचतो...”

क्षणभर कोणीच कांहीं बोललें नाहीं.

“ पदव्या साध्य नव्हेत, भाऊ ! साधनंच ! ! पण त्यांचा उपयोग साफच संपलेला नाहीं ! घडणजडण करणारी विद्यार्थीदशा प्रत्येकाला पाहिजेच ! नको ?” थोडें थांबून भाईसाहेब पुढें म्हणाले—“ भाऊ ! ध्येयं संपलीं कीं मनुष्य मेला ! माझंच घ्या कीं ! आपल्या त्या खोलींत राहणारा भाई ! आणि आजचा पन्नास पंचावन रुपडे कमविणारा आपल्या समोरचा कारकून भाई किती फरक ? त्या वेळचं तें निस्वार्थी जीवन ! आणि आज भोंवतीं असलेलं स्वार्थी आकुंचित वातावरण !...एकंदरीत जगाशीं जास्त संबंध न आलेलाच बरा, भाऊ ! त्याचे नानारंग दिसले कीं ध्येयं बाजूस पळूं लागतात. आणि मग सुरवातीच्या तारुण्यांतील आपलींच ध्येयं, आपलीच उत्साही मूर्ती,...आपल्याला दैवी,... देवासमान वाटतात...”

आम्ही पेन्शनरांच्या मारुतीला वळसा घालून टेकडी उतरूं लागलों होतों. दिशा साफ उजळल्या होत्या. बालरवीचे गुलाबी किरण आकाशांत वर चौफेर पसरत होते.

मोळी डोक्यावर घेऊन शहराकडे जाणारी एक बाई आमच्याच पुढून चालली होती. उज्वल आकाशाच्या पार्श्वभूमीवर तिच्या शरीरयष्टीची काळी रेषा व डोक्यावरील वांकड्यातिकड्या कांटक्यांचा भारा !...‘ जणूं काय श्रमदेवीच आपल्या समोर चालली आहे !’ अशी कल्पना माझ्या डोक्यांत आली.

“ ही चळवळ हा एक मार्ग आहे...” भाई पुन्हां माझ्याकडे पाहून म्हणाले, “ पण तो एकटाच मार्ग नव्हे, भाऊ ! ती आपल्या समोर एक मोळीविकी चालली

आहे पहा ! दरिद्री हिंदुस्थानचं चित्र असंच एखाद्या प्रकारं काढतां येईल. तिकडे तुमचं देशसेवकांचं लक्ष आहे का ?"...

"चार आण्यासाठीं ती दोन दिवस धडपडली पहा !" भाईसाहेबांचा आवाज कांहींसा रुद्ध झाला होता—"तिला आपल्या देशाची, फार काय, नुसत्या पुणें शहराची तरी काय माहिती आहे ?...चार आण्यासाठीं ही गांवभर फिरत असतांना हिचीं नागडीं उघडीं पोरं मातींत खेळत बसलीं असतील !...आणि नंतर माती व पैसा यांतील भेद समजण्याचं त्यांचं वय झालं कीं बिचारीं पोटामागं लागणार !—त्यांना तुमचा देश व तुमची चळवळ काय देणार ? त्यांचं, त्यांच्या पोरांचं, पोट शिक्षण, त्यांना कुणी पुरवायचं ?"—

जिमखान्यावरून आम्ही वसतिगृहाजवळ पोहोंचत होतों.

"भाऊ, आपल्याला एकदम वाटतं तसंच सर्व नसतं !" भाईसाहेब म्हणाले. "सामान्य माणसाला स्वार्थत्याग काय उपयोगी ? आणखी स्वार्थहि त्यांना चिकटलेला असल्यामुळं, दुहेरी ओझं न झेंपून तो जर एकदां घसरगुंडीला लागला तर साफ तोंडघशीं पडतो. आणि या घाईमुळं तो पूर्वीपेक्षांहि खालच्या थराला पोहोंचतो, बघा !"

भाईसाहेब अगदीं मनापासून बोलत होते; आणि मी निमूटपणें सर्व ऐकत होतों. त्यांच्या शब्दांतील जिव्हाळा मात्र माझ्या हृदयाला आंत आंत भिडल्यावांचून रहात नव्हता.

"तीं त्या वेळचीं ध्येयं आतां व्यवहारामुळं मला साफ पारखीं झालीं आहेत, भाऊ !" भाईसाहेब शांतपणें दिंडींतील फाटकांतून आंत पाऊल टाकीत म्हणाले—"माझ्या आयुष्याला मधें लागलं तें असामान्य वळण इष्ट होतं कीं काय ह्याचा मी मजजवळच अनेक वेळां विचार करतों आहे !...गेलं तें आयुष्य !...माझ्या नातेवाईक मित्रमंडळींत मी त्याच वेळीं मूर्ख ठरलों होतों. माझ्याशीं विचार करूं लागलों म्हणजे आतां मलाहि मी वेडाच वाटतों. तुरुंगाबाहेर राहूनहि कार्य करतां येणार नाहीं असं नाहीं, भाऊ !...तशी इच्छा पाहिजे मात्र !...दिवसांतून हजारों प्रसंग दिसतील. त्या वेळींच त्या इच्छेची कसोटी लागेल. आणि म्हणूनच मला आज प्रांजळपणें वाटतं;... सामान्य माणसानं



कसला स्वार्थत्याग करण्याच्या गोष्टी न बोललेल्याच बऱ्या ! क्षणिक भावना उचंबळतात, जातात—आयुष्याचा लढा तेवढा कायमच टिकतो ! आणि त्यांत मात्र कुणी कुणाला ओळखत नाहीं !..."

माझे बंडखोर विचार मला एकदम सोडून जाईनात खरे; पण मन मात्र आतां द्विधा होत होतें खास !...

"बाटलींत भूत गाडल्याप्रमाणंच जणुं काय माझीं पूर्वीचीं ध्येयं आतां जरासुद्धां उसळी मारून वर येत नाहींत ! आतां माझं अगदीं प्रवाहपतित जीवन चाललं आहे !" भाई हळू हळू पण एक एक शब्द विचारपूर्वक उच्चारीत होते.

दाराची कडी काढली व आम्ही दोघेहि आंत शिरलों. भाईंच्या चेहऱ्यावर खिन्न स्मिताची अस्पष्ट रेषा उमटली होती.

"याच लहानशा छताखाली राहून मी ध्येयाचे गगनभेदी मनोरे बांधीत होतों ! पण आतां काय त्याचं ?" भाई क्षणभर थांबून म्हणाले, "तरीसुद्धां भाऊ, माझा आणि या खोलीचा संबंध साफ संपला नाहीं. बरं का ? नांवापुरता तरी असेल !..."

असें म्हणत भाईनं घाईघाईनीं टेबल खिडकीजवळ ओढलें व त्यावर खुर्ची ठेवून ते खोलीच्या छताचीं लांकडें हातानें चाचपूं लागले.

मला वाटलें त्यांना मघासारखा पुन्हां वेडाचा झटकाच आला आहे !

पण इतक्यांत ते मोठ्यानें हंसून म्हणाले—"दार उघडा तें, भाऊ ! म्हणजे सूर्यप्रकाशांत दिसेल तुम्हांला सारं !"

मी दार उघडून टेबलावर वर चढलों; उजेड व हात यांच्या सहाय्यानें मी वरच्या बहालावर कोरलेलीं अक्षरें वाचलीं—

"बॅ. भाई गोरक्षकर,
President,
All India Social Service League"

मी चमकून त्यांच्याकडे पहातांच ते मोठमोठ्यानें हसूं लागले. पण हसतां हसतां एकदम थांबले. त्यांचा चेहरा उतरला होता.

"माझ्या जुन्या इच्छा—आकांक्षांचीं मूर्तिमंत चित्रं पुढं उभी करणाऱ्या या पवित्र ठिकाणाचे सुदैवानं तुम्ही मालक आहां आज !" भाई क्षणभर थांबून माझ्याजवळ आले. माझ्या खांद्यावर हात ठेवून ते मला पुढें म्हणाले, "भाऊ, नुसता या देवळाच्या दाराशीं फिरायला, आणि क्षणभर त्याच्या छताखालीं विसांवा घ्यायला मी आज तळमळत आहें!...बरं भाऊ, येतों मी..."

"थांबा, चहा ठेवतों..."

"अहंः कांहीं नको. ओळखदेख मात्र ठेवा..."

आणि भाईसाहेबांनीं मला कीं खोलीला—कोणाला तरी—जातां जातां लवून नमस्कार केला.

मी भाईंच्या आणि माझ्या देवळांत शिरलों—

आणि विचार करीत हळूहळू बांधलेली वळकटी सोडूं लागलों...

भाईसाहेब आज जर आमच्या त्या एकेकाळच्या देवळाकडे वळले तर त्यांना आपल्या नांवाजवळच दुसरें एक नांव कोरलेलें दिसेल—

"डॉ. भाऊ साने,
प्रिन्सिपॉल, फर्ग्युसन कॉलेज."

दोन व्यक्तींच्या पुढील इतिहासांत आतां अशी तफावत पडलेली दिसेल हें खरें; पण भाईंना मात्र मी आज इंग्रजीचा असिस्टंट प्रोफेसर आहें हें ठाऊक असल्यामुळें निर्मळ आनंद वाटल्यावांचून खास राहणार नाहीं.

आणि आम्ही दोघे मिळून कधीं त्या देवळांत गेलों तर ?

तर मला वाटतें, या विषमतेमुळेंच आम्हीं तेथें मोठ्या समाधानानें थोडातरी जास्त वेळ बसूं !






'इश्श रेऽरामा !...अग...अग ?...काय गलिच्छ मेली !...जमिनीवरचीं शितं उचलतीन् !...'

...शितावरून भाताची परीक्षा करतां येते ! पण नेहमीं दिसणाऱ्या मुबलक भातावरून शिताची किंमत करतां येईलच असें नाहीं !...

खरकट्या पानांतून जमवलेल्या भाताची पुडी, आपल्या मलीन फडक्यांत हली बांधत असलेली पाहून मंदाकिनीचें तसेंच झालें.

'कंटाळा नाहीं का ग येत तुला तें खायला ? शीःऽ !'—बोलल्यावांचून तिच्यानें शेवटीं राहावेनाच !

हलीचे मात्र केविलवाणे डोळेच तेवढे पुष्कळ बोलत होते !...

हली !...ग्यालरींतून खालीं तिच्याकडे पहाणाऱ्या मंदाच्याच वयाची !...

पण दोघींच्या जगांतील स्थितींत केवढा मोठा फरक ! !

आपल्या शरीराभोंवतीं कसेंबसें गुंडाळलेलें, नाना ठिकाणीं ठिगळलेलें, तें काळें मळकट पातळ ! सैल होत असूनही अंगांत चढवलेला (कोणा तरी 'उदार' बाईनें दिलेला) जीर्ण पोलका ! मलीन फिक्कट चेहऱ्यावर भुरभुरणारे, कधी तेल न लावलेले, गुंतलेले केस !...

तिच्या चेहऱ्याकडे पाहिलें कीं सहज कल्पना येई—'हिला रोगबीग तर नाहीं ना कसला ?'

डोळ्यांचा साधारणतः हृदयाशीं संबंध असतो ! तिची दृष्टी तेवढी तिच्या निर्मल हृदयाची साक्ष देत होती !

हातांतील भाताची पुरचुंडी घेऊन हली जावयास फिरली तेव्हां उन्हांत तिच्या गळ्यांतील कायसें चमकलें !

" ओ हो हो !...भिकारीणबाईसाहेबानीं सरी पण घातली आहे कीं गळ्यांत !" मंदाकिनी हंसून म्हणाली, " किती तोळ्याची ग ? "

गरीबी असली कीं आयुष्याची चेष्टा ही व्हायचीच !

' दोन आन, ताईसाएब !'...आपल्या गळ्यांतील कांचेची सोनेरी सरी घोळवीत हली हिरमुसली होऊन म्हणाली.

' अगबाई, बरीच दिसते आहेस ! ' मंदाकिनीनें हलीला वरपासून खाल-पर्यंत न्याहाळलें; ' कुणाला खूष करणार आहेस बाई तिनं ? '

जिव्हारीं बसलेल्या बाणानें ठिबकलेले अश्रू पुसण्यास हलीनें आपल्या फाटक्या पातळाचा पदर वर उचलला. हातांतील पिवळे तांबडे ' अंबर ' एकमेकांवर आपटून ' खळ् खळ् ' असा मृदु आवाज झाला.

' कोणाशीं बोलते आहेस, मंदा ?' ग्यालरींत येत रावसाहेब म्हणाले.

' ती भिकाऱ्याची पोर पाहिलीत का, बाबा ? ' मंदाकिनी किंचित नैसर्गिक बेजबाबदारीनें खुद्‌खुदली; " थाट तरी बघा मेलीचा ! "

हलीकडे पहातां पहातां रावसाहेबांच्या चेहेऱ्यावर किती तरी नवीन छटा आल्या...गेल्या !...शेवटीं तिच्याकडील दृष्टी काढून त्यांनीं एकदम मंदाकिनी-कडे वळून पाहिलें.

" अग ! वाटली ना तुला भीक ?...मग आतां उभी कां इथं ?" ते पुन्हां हलीकडे पाहून ओरडून म्हणाले. कदाचित् जवळ मंदाकिनी असतांना, तिच्याच वयाच्या त्या खालच्या दरिद्री पोरीकडे त्यांच्यानें जास्त वेळ पाहवलें नसावें !

" ए बयाऽ !" रावसाहेबांची मर्जी संभाळण्यासाठीं पहाऱ्यावरील आज्ञा-धारक सेवक खेंकसला. " जा नीघ इथून !...घाण नाहीं ती..."

"जातें, बाबा ! मारूं नको !..." आपल्यावर दगड उगारलेला पाहून हली आपलें अन्नाचें गाठोडें संभाळीत भराभर पावलें उचलूं लागली !...



आनाथ, पंगु, रोगी किंवा गरीब यांस ' दान देणें ' याच्या मुळाशीं खरी भावना कोणती ?

निस्वार्थी, सहानुभूतीजन्य करुणा ?—कीं, ' आपण किंवा आपलं कोणी तशा स्थितींत नसावं, ' अशा विचारानें उत्पन्न होणारी स्वार्थी भीति ? नि त्यांतून आपण विमुक्त असल्याच्या समाधानाचे निर्वांत सुस्कारे ?

त्यावेळीं हलीच्या मनांत असले कोणते विचार डोकावले असतील का ?

पण तिला आपल्या आईची मात्र आठवण झाली खरी !

आणि ती वेगानें पावलें टाकीत घराकडे वळली.

अगदीं लहानपणाची आठवण ! त्या वेळीं गरिबीचें लहानसेंच भाडोत्री घर होतें; तरी ' आई मला दे !' म्हटलें कीं बहुतेक सगळें मिळे. अन् नसलेंच तर तर बाबा सांगे—' आणून देईन हं बाळ ! '

पण त्यानंतर कांहीं दिवसानंतरचाच प्रसंग ! आईबाबा दोघेंही ओक्सा-बोक्सी रडत होतीं. आणखी चार दिवसांनीं त्यांचें बिऱ्हाड गांवाबाहेर गेलें ! तेव्हांपासून तिचे खेळगडीही तिला अंतरले.

आईच्या पायांतील तोडे, दंडातील रुप्याचें कडें, हलीच्या गळ्यांतील चांदीची माळ, कमरेंतील साखळी ..एक एक नाहींसें होऊं लागलें !

तिचा बाबाहि तेव्हांपासून घरींच राहिला !...फारसा चालत फिरतसुद्धां नसे. आणि तें हलीला चमत्कारिकच वाटे.

मग एके दिवशीं तिची आई तिला घेऊन बाहेर पडली; लाचारीनें भीक मागूं लागली. आणि तेव्हांपासूनच हली भिकाऱ्याची पोर झाली !

प्रत्येक घरीं तोंड वेंगाडतांना तिची आई रडत असे. चार घरीं मिळेल तें घेऊन, दोघी सूर्य डोक्यावरून थोडासा कलेपर्यंत घरीं येत.

घरीं येतांनाची आईच्या जिवाची व शरीराची कोण ती धडपड ! खाटेवर पडलेल्या बाबाजवळ प्रथम गडबडीनें जाऊन, ती त्याच्याशीं किती तरी कळकळीनें बोले !......

त्यानंतरचा तो हृदयद्रावक प्रसंग; आई बाबाचे पाय फाटक्या चिरगुटांनीं बांधत होती. बाबाच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. आईहि रडत होती.

दोघांनाहि रडतांना पाहून हलीच्या पण हृदयांत कालवलें !

'तूं कां रडतोस बाबा ?' ती त्याला मिठी मारावयास धांवली; पण—

दोघेंही एकदम ओरडलीं. "हं हं ! लांब..."

तिच्या बालमनाला त्या वेळीं त्याचें कारण समजेना ! पण तेव्हांपासून ती नवींनवीं कारणें शोधूं मात्र लागली.

बाबाच्या तोंडाला सूज आल्यासारखें दिसे; अन् हातापायाच्या बोटांना घरांतल्या घरांत कसल्या जखमा झाल्या ?

बालमनांत नाना संशय उभे रहात !

आईबरोबर जायचें; नाना ठिकाणीं दीन होऊन केविलवाण्या आवाजानें भीक मागायची. घरीं येऊन बाजूला जेवायचें. बाबा आई जेवतांना आपण एकलकोंडेपणें दगडमातीबरोबर खेळायचें; बोलायचें. तीं रडत असतील तर आपण त्यांच्याबरोबर रडायचें !

फाटके परकरपोलकें जाऊन चिंध्यावजा चिरगुटें गुंडाळायचे दिवस येईपर्यंत, अशा तऱ्हेनें, नाना प्रसंग अनुभवीत ती वाढत होती !...

आणि ती अगदीं अलीकडील गोष्ट—

बाबा अंथरुणाला पुरता खिळला होता. केव्हां मृत्यु कवटाळील याचा नेम नव्हता. आईला घरांतून बाहेर पडणें अशक्य झालें होतें; म्हणून हली एकटीच चार घरें भीक मागून आणी !

एके दिवशीं परत येऊन पहाते तों बाबानें आपला जीर्ण देह सोडला होता; जवळ बसून आई रडत होती !

अन् हें शेवटचें चित्र समोर दिसूं लागतांच, चालतां चालतां हली केवढ्यानें तरी दचकून भानावर आली.

ती आतांपर्यंत आपल्या गांवाबाहेरील झोंपडीपर्यंत येऊन पोंचली होती !

चटकन् तिला आपल्या आईची करुण मूर्ती दिसूं लागली. अगदीं नकळत तिनें आपल्या गळ्यांतील सरी मानेभोंवतीं फिरविली.

डोळे पुसत तिनें लांब लांब पावलें टांकून झोंपडी गांठली एकदांची !

"आलीस बाई, हले ऽ !" आईचा क्षीण आवाज आला; तिच्या रोगी चेहऱ्यावर क्षणभर वत्सल हास्य चमकून गेलें.



आणलेलें जेवण आईसाठीं मातीच्या थाळींत काढून कोपऱ्यांतील मडक्यां-तून तिनें तिला पाणी दिलें. 'आई ऊठ' म्हणून तिला बसवलें.

आईनें हलीला लहानपणीं भरविलें होतें; हलीनेंहि तसेंच आपल्या हातानें तिला आतां भरविलें.

तिनें थाळी, हात, सर्व मातीनें स्वच्छ धुवून, राहिलेलें अन्न स्वतः जेवाव-यास घेतलें; पण जेवणापेक्षां तिच्या हृदयाचें धडधडणें व डोक्याचें भ्रमणच जास्त चाललें होतें !

जेवण झाल्यावर हली आईजवळ बसून तिच्या जखमा बांधूं लागली. पाहतां पाहतां आई एकदम ओरडली. 'लांब हो बाई तूं !' ती रडूं लागली. तिला वाटलें, 'आपला काळ जवळ आला. पोर उघडी पडणार ?'

'तूं गप झोप बरं, आई !' हलीनें डबडबलेल्या डोळ्यांनीं म्हटलें.

सारी रात्र आईच्या उशाशीं ! त्या भयाण शांततेंत विचारांचीं भुतें तिच्या मोडक्या घरट्याभोवतीं घिरट्या घालीत होतीं !...ती व तिची आई याशिवाय तिला दुसरें कांहींच दिसत नव्हतें ! !

पहांटेच्या सुमारास हलीनें आईकडे पाहिलें. मिणमिण प्रकाशांत तिच्या मिटलेल्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या. पहातां पहातां तिच्या शरिरास आंचके बसूं लागले !...हलीला थोडा मोह झाला. तिनें प्रेमभरानें आपल्या आईला एकदम मिठी मारली. क्षीण डोळे किलकिले करून, आपल्या उघड्या तोंडांत पाणी घालावयास आई तिला सांगत होती !...

मग तिची आई गेली !...रोगानें पिडलेलें तिचें शरीर तेवढें मागें राहिलें ! त्याच्याशीं हलीला काय करावयाचें होतें ?

स्वतःच्या शरीराची तरी तिला इतकी कुठें पर्वा होती ? ?...

त्या भयाण शांततेंत मिणमिण पेटणाऱ्या दिव्याच्या उजेडांत हली आपल्या आईच्या शवाशेजारींच बसली होती. बाहेरील रातकिड्यांच्या किर्र आवाजा-इतका चमत्कारिक विचारांचा कोलाहल तिच्या मनांत चालला होता !

शरीराच्या हालचालीमुळें, हलीच्या गळ्यांतील सरी उजेडांत स्पष्टपणें चमकली. त्याबरोबर ती जुनी आठवणहि तिच्या मनांत तशीच चमकली.

आपल्या कष्टानें मिळविलेली दोन आण्यांची कांचेची सरी, आईनें किती प्रेमानें तिच्या गळ्यांत घातली होती.

पण तिच्या त्या मूक आनंदांत कालदुपारच्या प्रसंगानें विरजण घातलें; ...तिच्या कानांत ते उद्गार स्पष्ट ऐकूं येत होते—"किती तोळ्याची ग ए?... कोणाला खूष..."

"इतकंहि करूं नये असं मी काय पाप केलं आहे?" तिला कांहीं समजेना; तिचें मन शांतच होईना कांहीं केल्या! "मी कोणालाच नको आहे जगांत! कशाला आमच्या सारखीं माणसं जिवंत रहातात!"...

शेवटीं कांहींसा मनाचा निश्चय करूनच ती आईच्या शवाजवळून उठली. ती थाळी, पाण्याचें मडकें, कुडाचें झोपडें, आईचें तें रोगी शरीर!

त्या सर्व वस्तूंजवळच तिनें राहिलेल्या भाताची पुरचुंडी, आपल्या हातांतील अंबर व गळ्यांतील आईनें प्रेमानें दिलेली सरी काढून ठेवली.

ते मिणमिणणारें दिवटें अगदीं कुडाला लागून ठेवलें...

नि आपल्या कृश शरीराला घेऊन ती भर भर चालूं लागली!

थोड्या अंतरावरून तिनें मागें वळून पाहिलें—

ज्वालांनीं घेरलेली झोंपडी! त्यांतच त्या सर्व वस्तू पिचताहेत.

तिनें पुन्हां समोर मान फिरवून धांवतच रेल्वे फाटक गांठलें!...

देशावरून येणारी लांबची गाडी, 'घोऽऽऽ'करीत वेगानें गेली!—

हलीही तितक्याच वेगानें या जगांतून निघून गेली;..तिच्या शरीराचे शेवटचे आवेगहि त्या निनादांतच लपले!..!

आतां त्या शरीराचा व तिचा संबंध नव्हता!

जीर्ण वस्त्रें टाकून नवीं धारण करावींत तसें...

पण दुसरा मार्गच नव्हता मोकळा तिला!...

रावसाहेबांचा आज्ञाधारक सेवक स्टेशनवरून टाइम्स घेऊन आल्यावर सांगत होता, "पहांटे अपघात झाला एक, बाईसाहेब!...... ताईसाहेबांची ती कालची सरीवाली भिकारीण? ...मेलखालीं सांपडली म्हणे पहाटे!—"

---



# लवंग्या फटाक्यांना आग

पावसाळा संपला. शरदृतूनें आपलें मायाजाल पसरलें!

निरभ्र आकाश, उडते पांढरे ढग, वाऱ्यावर माना डोलावणारीं गव्हाचीं पोपटीं शेतें, आल्हाददायी कोमल पालवी, पहांटेचे दंवरुपी मोती व अरुणानंतरच्या कोमल सूर्यकिरणांचा मोहक पाऊस! हिरव्यागार टेंकड्या;...आणि शांत स्तब्ध पाण्याचे मोठमोठे आरसे!

जिकडे तिकडे आरासच आरास! अत्तर-गुलाबाला तोटाच नव्हता. सारे कीटक या फुलावरून त्या फुलावर उटणीं लावून फिरत! दिवाळी साजरी करायचें सृष्टीनें अगदीं मनावरच घेतलें होतें.

अनादीअनंतकालच चालत आला होता तो सारा प्रकार!

पण ही झाली खेडेगांवांतल्या सृष्टिसुंदरीची दिवाळी!

मानवानें वसवललीं शहरें फार निराळीं; माणसांचा व्यवहारच बेगळा!

यावर्षी तर सगळीच मंदी! कां, कशी झाली, हा आपला प्रश्न नव्हे; पण वस्तुस्थिती मात्र अशी.

शहरांतील माणसांचे गट अनेक! दुसऱ्यांना पाडून जगणारे, शेजारचा चढला तर त्याचा पाय ओढणारे, नरकुंजर करणारे धर्मराज, नाहींतर प्रवाहपतित...

पण असले नाना गट असले तरी जन्मजात स्वभाव बदलतो थोडाच! 'मनू पालटला, मनू पालटला;......कल्कीचे घोडे नाचूं लागले!' म्हणत म्हणत शेवटीं लहानांच्या नांवानें-त्यांचा हात भाजेल म्हणून कां होईना,—आम्ही

फटाक्या वाजवायचे सोडीत नाहीं. त्या निष्पाप बालकाच्या आडोशाला उभे राहून चांगल्या वाईट अनेक जबाबदाऱ्या आपण टाळावयास पाहतों.

पण या कृत्रिम व्यवहाराचा फुगा...

पण हें काय? निघालों गोष्ट सांगायला आणि सभ्यपणाच्या साळसूद व्याख्यानासह मीहि दंभांतच शिरूं लागलों कीं!

मला सांगावयाची आहे ती या वर्षांतल्या दिवाळींतली एक गोष्ट!

आमच्या शेजारच्याच मन्याची!

दिवाळी दिवाळी करतां करतां शेवटीं सुटी पडली. मास्तरनीं गणितें सोडवायला दिलीं होतीं; पण तिकडे त्याचें लक्ष नव्हतें. 'त्रैराशिकं त्रैराशिकं तीं काय? शेवटच्या दोन दिवसांत करून टाकायचीं!' असें त्यानें ठरविलें; बॅग बंद करून कोपऱ्यांत उडवली.

सामान आणायला बाबा पैसे काढून देत; पण तरी थोडे कुरकुरत.

दुपारीं घरीं शेजारणी जमत; आणि मग करंज्या, लाडू, चकल्या...

आईची ओरड ऐकत मन्यानें करंज्याचें सारण बोकणावें आणि हंसत हंसत पळून जावें. देवाचा नैवेद्य प्रथम त्याच्या पोटांत जावा. तोंडांनीं नानाविध विषयांवर व व्यक्तींवर बायकांचें संभाषण व हातानें लाटणें, तळणें चाले!

अलीकडे कांहीं दिवस हा असा क्रम सुरू होता.

मन्या शेजारचे खेळगडी गोळा करी; आणि खेळ सुरू होई.

सर्वांच्या कल्पना चालत. दौती, टांक व पुस्तकें...गोळा करून ते 'कोट' रचित; आणि मग सगळे एकदम तोंडानें आवाज करीत, 'फाट्‌ फाट्‌, धडाड्‌ धुम्‌, सुर्र्र्‌ ...फुस्स्स्‌'...

त्यांत सर्व येई. विजेच्या फटाक्या, लवंग्या, डांबरे, नळे, चंद्रजोती!

बिनपैशांत असले 'कोट' पुष्कळ वेळां रचतां रचतां शेवटीं समोरच्या बैठ्या घरांत फटाक्याचें मोठें दुकान दिसूं लागलें.

सगळे बाळगोपाळ खिडकींत उभे रहात; आणि त्या दुकानाची प्रभावळ पहात.

वर कपड्यावर रंगविलेली पाटी होती—"फटाकड्यांची जंगी वखार—"



त्याखालींच दोन बाजूस दोन मोठेमोठे पुठ्ठ्याचे डांबरी फटाके लावले होते. मन्यानें तितके मोठे कधीं जन्मांत पाहिले नव्हते.

आणि मग दोरीवर लोंबकळणारे आपटबार, पिस्तुलें; खालीं नळे, चंद्रजोती, बाण, विजेच्या फटाक्या, लवंग्या, सापाच्या गोळ्या!...साऱ्या वस्तु अगदीं व्यवस्थित नि आकर्षकपणें लावल्या होत्या.

मन्या आणि त्याचे संवगडी आतां खोटे कोट रचण्याऐवजी, तासचे तास खिडकींतून तिकडे आशाळभूतपणें पहात रहात.

तोंडानें गेल्या वर्षी आपण कोठून, कसल्या, किती फटाक्या विकत घेऊन उडविल्या, त्याबद्दल चुरशीचें बोलणें चाले.

नि प्रत्येकजण आपण जास्त उडविल्या असेंच प्रतिपादन करीत असे.

आपले सारे मित्र गेलें कीं मन्या पुन्हां हळूच खिडकींत येई; आणि मनाशीं उंच मनोरे बांधीत, त्यांतून येत्या दिवाळीसाठीं काय काय खरेदी करावयाचें, त्याचा विचार करी.

शेवटीं त्रयोदशी आली. मंदी म्हणत म्हणत लोक रंगीबेरंगी दिवे लावूं लागले. मन्याच्या घरांत शेणाच्या गोळ्यांवर पणती तेवूं लागल्या.

आज दुपारपासूनच तो दुकानाजवळ दोनतीनदां जाऊन आला होता.

आईजवळून रुसून बसून घेतलेल्या एक आण्यांत त्यानें तडतड्यांचें पान विकत घेतलें नी बोहऱ्याला पुष्कळ प्रश्न विचारले. "या डांबऱ्याचा आवाज खूप मोठा येतो का हो?"

"आणि त्या नळ्यांचें झाड किती मोठं होतं?...तीन आणे किंमत? अबब! फार आहे!"

"बाण वर फेंकायचा? असं का? आणि घरावर पडला मग??"

बोहरी दाढींतून बोटें फिरवित त्याला कांहीं उत्तरें देई; आणि मग सांगे, "तुज्या बाबाला शांग फटाकड्या घेयाला! माज्याकड् लय् लय् तऱ्हा हाय! समजलं काय्?"

घरीं आल्यावर आईला वकील नेमून मन्या बाबांची वाट पाहात राहिला. वाट पाहतां पाहतां बाबा शेवटीं आले. एका हातांत वडणेंवगैरे कांहीं सकाळच्या

अंघोळीस लागणारें सामान; आणि दुसऱ्या हातांत ऑफिसचे कागद!...चेहरा नेहमींसारखाच कांहींसा त्रासिक...

मन्या दबकत एकदां आंतून बाहेर आला व बाहेरून आंत गेला. नंतर आई तशीच आली, व गालांतल्या गालांत किंचित् हंसून तशीच आंत गेली

कोट टोपी काढून बाबा आरामखुर्चीवर पडले. "काय, चहा देतां ना आम्हाला?"

आई बाहेर आली. बरोबर चहा होताच. "चकली, चिवडा, कांहीं?"

"कांहीं नको बुवा!...चहा पुरे नुसता..." बाबा कप हातांत घेत म्हणाले; "आणि मन्या नाहीं कुठं दिसत?"

मन्या आंतल्या खोलींतून सारं ऐकत होता. कान टवकारून बाबांचे पुढील सारे शब्द तो टिपूं लागला.

"असेल आंत. उद्यां दिवाळी ना? त्या गडबडींत आहे." ती थोडी हंसून पुढें म्हणाली, "फटाक्या, दुसरं काय? म्हणतोय् आल्यावर सांग आपल्याला घ्यायला!"

मन्याचे कान जास्तच टवकारून उभे राहिले.

"काय तें? फटाक्या?" बाबा किंचित त्रासिक स्वरांत म्हणाले–"वेडा आहे झालं. विदेशी मालांत उगीच पैसा ओतायचा..."

मन्याला राग आला. विदेशी-स्वदेशीचें बंड बाबांच्या तोंडून त्यानें आजच प्रथमच ऐकलें होतें–"असे आहेत आमचे बाबा अगदीं; आम्ही कांहीं म्हटलं कीं यांचं आपलं कांहीं तरी व्याख्यान असतंच."

"जाईना! हौस आहे पोराची; वर्षांतून एकदां कधीं मागणार!" आईला रदबदली करतांना मात्र ऐकून मन्याला पुन्हां आशा उत्पन्न झाली.

त्यानें हळूंच मान करून दाराच्या फटींतून पाहिलें.

"तुमचे हे असले लाड बरं!...मग कांहीं तरी संवयी लागतात हो, मुलांना!" बाबा कपबशी आईच्या हातीं देत हसून म्हणाले, "बरं. पण आहे कुठं तो फटाक्याबहाद्दर?"

मन्याच्या तोंडावर स्मित झळकलें; अंगावर मूठभर मांस चढलें.



"आंत असेल. देतें हं पाठवून त्याला बाहेर!" आंत येत आई म्हणाली.

"हें पहा," तिला थांबविण्यासाठीं बाबा म्हणाले, "उद्यां दोन चार मित्रमंडळी फराळाला येणार आहेत सकाळीं. तीन दिवस सुटीच आहे ऑफिसाला बरं का?"

"हं!" म्हणत आई आंत शिरत असलेली पाहून मन्याला वाटलें ही वेळ योग्य आहे बाहेर बाबांकडे जायला.

पण तो पुढे निघायला आणि आई आंत शिरायला एकच गांठ पडली.

"आतांऽ" करीत आई थबकली; तिनें संभाळलें नसतें तर कपबशीचें लग्नच लागायचें.

तिलाहि त्याच्या लपण्याचें हंसू आलें. मागें ओटीवर पाहून ती मोठ्यानें म्हणाली, "पहा बरं चोर; हळूच दारामागं राहून ऐकत होता सारं."

"आंऽऽ! होय रे मन्या?" बाबा म्हणाले. मन्या मोठ्यामोठ्यानें हंसतच त्यांच्याजवळ गेला. बाबांच्याहि चेहऱ्यावर थोड्या सुरकुत्या पडल्या होत्या.

आईनें मागें दोघांकडे वांकून स्मित केलें.

जणूं काय ती मन्याला म्हणत होती—"झालं, बाळ? आतां तुम्ही दोघे आपापसांत वाटेल तें करा हो; मी आपली जातें!"

आणि मन्यालाही वाटत होतें "आतां कसले बाबा हातून सुटतात माझ्या? मी बरोबर बनवतों बघ त्यांना!"

कमीजास्त करून शेवटीं मन्याच्या इच्छेप्रमाणें तीन रुपयांच्या फटाक्या आणायचें ठरलें; नि थोड्या वेळानें मन्याबरोबर बाबा खालच्या दुकानापर्यंत आले.

तेथें तर तोबा गर्दी होती. बोहरी प्रत्येकाला आस्थेनें विचारीत होता.

मन्याला पाहातांच तो हसला—"हां, मोटा शेट, काय हुकूम?"

मन्यानें बाबांकडे व बोहऱ्याकडे एकाच वेळीं हंसून पाहिलें.

बाबांनीं तीन रुपये दुकानदाराच्या हातांत दिले व म्हटलें—"हा निवडील त्या तऱ्हा; आणि जास्तींत जास्त इतके."

दुकानदारहि हंसला. मन्याचा हात धरून त्याला वर नेऊन त्यानें त्याला फटाक्याच्या राशीसमोर उभे केलें. मन्याला वाटलें'-काय घेऊं अन् काय नको.'

पण बजेट आधींच ठरलें असल्यामुळें त्याला शेवटीं तडजोडच करून फटाक्या पिशवींत भराव्या लागल्या.

मग बोहऱ्यानें खूष होऊन एक लवंग्याची पेटी त्याला बक्षीस दिली.

त्याच्याकडे हंसून पहात, मन्या पायऱ्या उतरूं लागला.

घरीं केव्हां जाऊं आणि आईपुढें साऱ्या फटाक्या केव्हां ओतूं असें मन्याला झालें होतें. पण बाबा दुकानदाराशीं बोलत होते.

"तुमचं स्टेशनरीचं दुकान बंद वाटतं सध्या ?"

"नाय, हायना साहेब च्यालूं ! ए तो आपले दिवाळीवास्ते. कागद बिगद समदा आंत पडलाच हाय् !" बोहरी हंसून म्हणाला.

"या फटाक्यांत फायदा बराच असेल ?

"हाय् थोडा थोडा. पण कॉंपिटिशन लय्. अने ए वर्षाला तो मंदी फार मारते ! सतेनास झ्याला हाय् धंदेचा !"

"फटाक्या म्हणजे भीतीच नाहीं हो ?"

"हैतो; पन म्हनूनच इन्शुअर कराला पडते !"

मन्या कंटाळला; त्यानें शेवटीं बाबांचा हात ओढला.

'हां हां; ए धाकला शेटला फटाकडी उडवायची लय् घाई झ्याली हाय्! हाः हाः !' दुकानदार मोठ्यानें हंसून म्हणाला.

मन्या धांवतच जिना चढला. आईनें प्रथम त्याचें कौतुक केलें. पण नंतर त्यांपैकीं तुळशीच्या लग्नासाठीं कांहीं काढून ठेवल्या.

संसाराची संवय बायकांना पहिल्यापासूनच ! मन्याला किंचित् वाईट वाटलें; पण मग त्यानें घेतली झाली स्वतःची समजूत करून.

आणि मग ती रात्र, पहाट, सारा दिवस धुडगुस नुसता. वात असली की 'ठो,ऽ-'; विझली कीं सुरसुरी. लौकर संपतील म्हणून लंवग्याची माळहि तो सोडवूं लागलेला पहातांच बाबा त्याला रागावले. व्हराड्यांत नुसता धूरच धूर होई.



पहांटे पेटलेली उदबत्ती त्या रात्रीं दहा वाजेपर्यंत जळत होती !

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळपर्यंत मन्याचें सारें भांडवल संपलें होतें.—नाहीं म्हणायला एक हिरव्या काड्याची पेटी तो पुन्हां पुन्हां खिशांतून काढून उघडून पाही नि बंद करी.

कसेंबसें जेवण घशाखालीं लोटून, (पांच दिवसांचा गणपती पोंचवल्यावर मनाला जसें ओकेंओकें वाटतें तशा वृत्तीनें) त्यानें आपल्या फटाक्याच्या रिकाम्या खोक्यांत डोकावून पाहिलें

पेट्यांचे तांबडे हिरवे खाकी कागद, सर्पांची रिकामी डबी, जळलेल्या वांकड्या तारा !...त्यानें मोठ्या आशेनें पुन्हां पुन्हां आंत वाकवून पाहिलें.

शेवटीं त्याला एक साधी, एक डांबऱ्या फटाक्याची वात सांपडली.

उत्साहानें पुन्हां उदबत्ती पेटवून तो व्हऱ्हांड्यांत आला.

हळूंच वात शिलगावल्यावर ती सुरसुर करीत क्षणभर नागमोडी वळणें घेत तुरतुर उड्या मारूं लागली. त्यानें हसून टाळ्या वाजवल्या !

पण दुसऱ्याच क्षणीं तो कांहींसा रंजीस झाला; त्याचें सारें भांडवल संपलें होतें; उदबत्ती अगदीं मनाविरुद्ध विझवून तो हळू हळू पावलें टाकीत त्या खिडकीजवळ आला.

समोरच्या फटाक्याच्या दुकानांत पुष्कळ दिवे लागले होते.

विजेच्या लख्ख प्रकाशांत नाना तऱ्हेचें दारू सामान पडलें होतें. दुकानावरील वर्दळ आतां हळू हळू कमी झाली होती.

मन्यानें डोळे भरून तिकडे बराच वेळ पाहिलें.

त्याच्या मनांत कल्पना येत होत्या, "याची काय किंमत असेल, ?" "तें कोण विकत घेईल ?" "कुठं वाजवील ?"......

इतक्यांत बोहरी आपल्या नोकराला कांहीं सांगत होता, तिकडे त्याचें लक्ष गेलें. त्याला तुटक तुटकच ऐकूं येतें होतें-"सगळं बरोबर आहे ना ? कागदांचीं रिमं नेलीस का? "

तो आणखी कांहीं बोलत होता; पण मन्याला गुजराथी कळेना.

मन्या पुन्हा फटाक्यांकडे पाहूं लागला. इतक्यांत आईनें त्याला हाक मारली; त्याचा नाइलाज झाला.

रात्रीं मन्याच्या स्वप्नांतही तो बाबांकडे फटाक्यांसाठीं हट्ट करत होता. कितीतरी फटाक्या विकत घेत होता.

एकदां तर डांबरी फटाकाच त्यानें हातांत घेऊन वाजविला. शेवटीं चारचौघांनीं एक कोट रचून तो शिलगावला व ते बाजूस झाले.

त्याचा आवाज मोठमोठ्यानें येऊं लागला. सगळा एकच गिल्लागोंधळ...

इतक्यांत त्यानें डोळे उघडले. पण ओरडाओरड थांबली नव्हती.

विजेच्या, लवंग्या फटाक्या, डांबरे यांचे मोठमोठे आवाज अजूनहि ऐकूं येत होते. दारूच्या धुराचा छातींत भरणारा वास सुटला होता.

स्वप्न कीं खरें त्याला समजेना. त्याला वाटलें ' धूर केल्याबद्दल बाबा आता आपल्याला रागावतील,!'

' पण गोंधळ कसला ? धांवपळ कसली चालली आहे ? '

तो उठून उभा राहिला. इतक्यांत लांबून धांवत येणाऱ्या आगीच्या बंबाची घंटा त्याला ऐकूं आली.

त्यानें पाहिलें तों बाबाआई वगैरे आपण नेहमीं उभे रहातों त्या खिडकींत उभीं आहेत; खोलीभर दारूचा धूरच धूर ! आणि फटाक्याचा धुमधडाका सारखा चालू !—

तो धांवत धांवत खिडकीजवळ आला. त्यानें बाबांना घाबऱ्या घाबऱ्या विचारलें. ' काय झालं ? काय झालं, बाबा ? '

पण बाबांनीं सांगण्यापूर्वींच त्याला दिसून आलें. रस्त्यावर खूप गर्दी जमली होती; समोरच्या फटाक्याच्या दुकानास आग लागली होती; धुराचे लोळ निघत होते. मधून मधून ज्वाळा लळलळत होत्या. वरच्या पत्र्यांनीं तापून तडतडावयास सुरवात केली होती.

इतक्यांत ठण् ठण् वाजत बंब समोर येऊन उभे राहिले.

हें अनपेक्षित दृश्य एकदम पाहून, मन्याचें कोवळें मन क्षणभर दचकलें; हळहळलें ! प्रथम त्याच्या तोंडून शब्द देखील निघेना !



नंतर तो हळूहळू बाबानां विचारूं लागला—" कशी लागली आग ? "

पण तिथें सगळेच पहाणारे होते. कोणालाच काय झालें तें ठाऊक नव्हतें.

मधूनच एकदम दोन चार डांबरे फुटले किंवा लवंग्या फटाक्यांची पेटी वाजूं लागली कीं मन्या दचकून पुन्हां पुन्हां बाहेर डोकावून पाही.

धूर घरांत शिरूं लागला; पत्र्यावरून ज्वाळा व किटाळें वर उडूं लागलीं; आईनें झटकन खिडक्या बंद करून, मन्याला मागें ओढलें; नि तीं सर्व लांबच्या खिडकीत जाऊन तिकडून पाहूं लागलीं.

तीन रुपयांच्या फटाक्या मन्याच्या एवढ्याशा पिशवींतच मावल्या होत्या. त्याच्या कितीतरी पट मोठी रास दुकानांत पडलेली मन्यानें काल पाहिली होती.

आणि तीच आज त्याच्या डोळ्यासमोर...वाजत—जळत होती !

त्याला मौज वाटण्याऐवजीं त्याचें हृदय धडधडूं लागलें; होतें. त्याला वाटलें " अरेरे, बिचारा दुकानाचा शेट "......

मोठमोठ्या साहेबी टोप्या आणि काळे कोट घातलेले बंबवाले पाण्याची गुंडाळलेली रिकामी नळी सोडीत धांवपळ करूं लागले.

शिट्या वाजवून लवकरच पाण्याचे फवारे सुटले. पहारीनें दरवाजे फोडून त्यानीं उफाळणाऱ्या ज्वाळावर पाण्याचा आंतून मारा सोडला.

हळू हळू आवाज कमी येऊं लागला. ज्वाळा विझल्या, धूर वाढला; दारूच्या धुराबरोबर पाण्याची वाफ घरांत शिरत होती.

शिपाई गर्दी मोडीत होता. गर्दीमुळें पहांटेच्या ट्रॅम गाड्या हळू चालल्या. होत्या. आग विजल्यावर ठिकठिकाणीं घोळके जमून आपापसांत चर्चा चालली होती.

शेवटीं सर्व आटपून बंब पुन्हा घंटा वाजवीत निघून गेले.

त्या भयानक दृश्यामुळें मन्याचें हृदय अजून धडधडायचें थांबलें नव्हतें.

अगदीं रंजीस मनानें तो खिडकींतून हळूच घरांत आला.

दिशा फांकत होत्या. तरी त्यानें आपल्या खिशांतील ती हिरवी काडी काढली; नि पुन्हां खिडकीजवळ येऊन ती उजळली...

सकाळ झाल्यावर मन्या खालीं उतरलाहि; फोडलेल्या दारांत काळा पोषाक घातलेला एक बंबवाला खुर्ची टाकून बसला होता.

जळक्या फटाक्यांची ही रास पडली होती ! कांहीं टेबलं, खुर्च्या आणि शेल्फ अर्धवट जळून त्यांचा कोळसा झाला होता. जवळच्या हॉटेलवाल्याला याची झळ

लागली होती. पलीकडचा सलूनवाला ठार बुडाला होता.

मंडळी जमली होती. त्यांचें बोलणें ऐकत, मन्या त्याच्यामागें जाऊन उभा राहिला. तो कानानें ऐकत होता. पण त्याचे डोळे, धुरानें काळवंडलेल्या व आगीनें होरपलेल्या पडक्या भिंतीकडे लागलें होतें.

लोक आपापसांत बोलत होते–"हा सलूनवाला मात्र साफ बुडाला; बिचाऱ्यानें दिवाळीसाठीं पंखेबिंखे लावले होते आणखी !"..."आणि घरवाला नि फटाकेवाला ?..." "अहो कुठले ? दोघेहि इन्शुअर्ड; एकदां कारण बरोबर पटलं कीं सगळी भरपाई ! उलट थोडी फार प्राप्तीच, म्हणाना !" "हं ! बरा किफायतशीर धंदा ! घर जुनं झालेलं आणि हा धंदा असा चुरसीचा ! यांतून सगळीकडे असलीही मंदी"...

मन्याला त्यांतलें कांहीं कळेना. त्याला अजून आग कशी लागली तें मात्र समजावयास पाहिजे होतें. तो दुसऱ्या तांड्याजवळ जाऊन उभा राहिला. "उंदरानें इलेक्ट्रिक फटाक्या पाडल्यामुळें पेटल्या. जवळच्याच लवंग्या फटाक्या पेटल्यावर धडाका उडायला काय वेळ लागतो ?"

मन्याला आठवण झाली "त्या दुकानच्या शेटनें आपल्याला त्यांतलीच एक लवंग्या फटाक्याची माळ 'अग्गद' दिली नव्हती का ?"

'त्या दुकानदाराचें आतां काय झालें असेल ! बिचाऱ्याचें किती नुकसान ?' तो तसाच हळू हळू पावलें टाकीत जिना चढूं लागला.

त्याच वेळीं एका हॉटेलमध्यें तो बोहरी बसला होता.

पण त्याचा चेहरा दुर्मुखलेला नव्हता. उलट, आपल्या बरोबरच्या जिवलग मित्राला तो किंचित् हसत म्हणत होता, "चलीं ! उंदरामुळं लवंग्याफटाक्यांना आग लागली. हुंः ! पटलं म्हणजे झालं एकदाचं, इन्शुअरन्स कंपनीला ! ! घरवालासुद्धां खुषींत आहे. नवीन इमारत बांधायला घेणार आहे म्हणे !...मंदी-मुळें काय होईल याची भिती वाटत होती मला; पण आतां..."

मित्रानें पटल्याची टाळी दिली.

उंदरामुळें लवंग्या फटाक्या, फटाक्यामुळें दुकान, आणि दुकानामुळें घर जळलें !...तें खाक झालें आणि विझलेंहि !...

त्याचें पुढें काय झालें तें मन्याला कसें समजणार ?

त्या लवंग्या फटाक्यांच्या आगीमुळें, मन्याच्या बालमनांतील भावनांच्या लवंग्या फटाक्यांना लागलेली आग मात्र कितीतरी दिवस पिचत होती !



# पूर्वजांची आठवण

सकाळीं उठले कीं ते कामाला लागत. धूर ओकणाऱ्या चुलीच्या चिमण्या फार धुरकटल्या कीं साफ करणें हेंच त्यांचें काम !

तोंड धुतलें, चहा घशाखालीं उतरविला कीं त्यांची पायपिटी सुरूं.

सुरकुतलेलें नाक व चढलेल्या भिंवया त्याच्या फुगीर वाटोळ्या चेहऱ्याला थोडें गांभीर्यच आणीत. हा झाला जाड्या !

त्याच्यामागून निमूटपणें खालीं मान घालून चालणारा रड्या ! तोहि आपले पाय उचली. त्याचा चेहरा पाहून कोणीहि गोंधळावें. चालतांना त्याचें बरेंच पुढें आलेलें सारें अंग हालत असे. उजव्या हातानें टोपी काढून डाव्या हाताच्या बोटांनीं डोकें खाजविण्याची त्याला भारी खोड !

त्याचे ग्रहच एकंदरींत वाईट ! लोक त्याच्याकडे पाहून हंसत; मोठ्या शहाणपणाची गोष्ट म्हणून त्यानें कांहीं करावयास घ्यावें; पण तें हटकून मूर्खपणाचें ठरून त्याची चारचौघांत फटफजीती व्हावी. जाड्या त्याला नेहमीं हिडिसफिडिस करी; पण पुष्कळदां त्याचा सल्लाहि घेई. त्या वेळीं, 'नेहमींच आपण चुकतों !' या अनुभवामुळें रड्या ओठ हतबलपणें पुढें काढी, भिंवया धनुष्याकृति करी व पुढें चालूं लागत गंभीरपणें म्हणे —"माझं कुठं काय म्हणणं आहे ?',—

बऱ्याच प्रसंगीं दोघांचें पटलें नाहीं तरी त्यांची मैत्री मात्र कायमची ! दिवसभर उन्हांत घाम काढून काम करावें. रात्रीं पुन्हा घराचा आश्रय !

हाच त्यांचा रोजचा कार्यक्रम ! कधीं इकडे नाहीं कीं तिकडे नाहीं !

इतर जगाशीं जणूं त्यांचा मुळीं संबंधच नव्हता कसला !—

"डॉ. वरुणतीर्थ."

ती पाटी पाहतांच चालतां चालतां दोघे थबकले.

दोघांनीं एकमेकांकडे पाहून समोरील दाराकडे मोर्चा फिरविला. जाड्यानें तोंडावर बोट ठेऊन रड्याला गप्प बसण्याची खूण केली व दार ठोठावलें.

दाराच्या फटींतून एक म्हातारें टक्कल बाहेर डोकावलें.

"घराची साफसुफी,...चुलीचं धुरांडं....कांहीं साफ करायचं असेल तर आलों आहों !" दोघे एकदम म्हणाले.

"छे ! आम्हांला नाहीं जरूर !" तो म्हातारा स्वैपाकी म्हणाला.

दोघांनीं एकमेकांकडे पाहिलें. जाड्यानें आपल्या मित्राकडे पाहिलें; रड्या ठराविक रीतीनें डाव्या हाताच्या बोटांनीं डोकें खाजवित तोंड रडकें करून म्हणाला,—"माझं कुठं काय म्हणणं आहे ?"

"पहा तरी !" जाड्या लाडीगोडीनें हातवाऱ्यांसह स्वैपाक्याला म्हणाला.

पण तसें पहायचें काय होतें ? तरी त्यानें आंत पाहिलें.

खरंच ! जिकडे तिकडे धूळ सांचली होती; भटारखाना व चुलीवरील चिमणी धुरकटली होती. लादीवर...

स्वैपाक्याचा बेत एकाएकीं बदलला. तो दरवाजा सबंध सताड उघडून जाड्याला खुणावीत म्हणाला "बरं !—या तर आंत..."

जाड्यानें स्वतः प्रवेश करून उजव्या हाताच्या आंगठ्यानें रड्याला आंत शिरण्याची खूण केली.

त्याच्या पिचलेल्या पण कांहींशा रडक्या चेहऱ्यावर भाव दिसत होता— "बरं ! चला बाबा ! माझं कुठं काय म्हणणं ?"

आणखी एक तासानें खोल्या अगदीं 'साफ' झाल्या होत्या.

जाजमांचीं लहान लहान आसनें, तसबिरींचे अनेक आकारांचे तुकडे, भिंतींचा चुना, व विटा...नाना तऱ्हेचा मालमसाला ठिकठिकाणीं सैरावैरा...

नि त्यांतच आपापसांतलि 'मतभेद' मुळें झालेल्या धुसपुसीत ते दोघे परतले होते !...त्यांचें हें खडाष्टक नेहमींच चाले !



शेवटीं ते तिसरी खोली 'साफ' करावयास उठले.

त्या बाजूस ते झाडू घेऊन वळणार, तोंच, एक डोक्याचे केंस उभे राहिलेला, पांढरी दाढी वाढलेला, अवलिया प्राणी हातवारे करीत त्यांच्याच बाजूस धांवत धांवत आला.

जाड्या प्रथम क्षणभर गोंधळला; तरी हाच डॉ. वरुणतीर्थ हें त्यानें तत्काळ ताडलें. रड्याकडे पाहून त्याला तो खुणा करूं लागला.

पण रडकुंडीस आलेला रड्या बिचकून मागें मागें जात होता. त्याचा चेहरा नेहमींप्रमाणेंच सांगत होता—"माझं कुठं काय म्हणणं आहे ?"

"डॉ, वरुणतीर्थ" म्हणजे एक मोठाच शास्त्रज्ञ ! सारें आयुष्य त्यानें प्रयोगामागें घातलें होतें. त्या एवढ्या मोठ्या घरांत त्या दोघां म्हाताऱ्याशिवाय कोणीच नसे—एक स्वतः डॉक्टर; दुसरा म्हातारा म्हणजे स्वैपाकी जगू !

घराचा पुढील दरवाजा गेलीं अनेक वर्षें बंद असे. जणूं जगाकडे डोकावून पहाण्याची डॉक्टरप्रमाणें जगूचीही इच्छा नव्हती !...

सारें आयुष्य ज्या एका खोलींत घालवावयाचें डॉक्टरांनीं ठरविलें होतें, ती मात्र बरीच प्रशस्त होती.

एका कोपऱ्यांत हजारों रुपयांचीं रसायनें मांडून ठेवलीं होतीं. दुसऱ्या बाजूस एका लांब रुंद टेबलावर प्रयोगाचीं सारीं उपकरणें पसरलेलीं असत. बर्नरची मोठी ज्योत लोखंडी तिवईखालीं अखंड जळत असे. निरनिराळ्या कांचेच्या चंबूंत, अनेक हिरवींतांबडीं रसायनिक मिश्रणें उकळत असलेलीं दिसत. दोन स्टूलें कोठें तरी पडलेलीं असलीं तरी डॉक्टर त्यांवर कधींच बसत नसत. टेस्टट्यूबमधील मिश्रणें एक करून त्यावर प्रयोग करण्यांतच ते सदा गढलेले !

डार्वीन म्हणाला, 'मनुष्याची उत्क्रांति होत आली आहे. ॲमीबापासून सुरवात झाली; बदलत बदलत माकड, व माकडांतून मनुष्य !'...

डॉक्टरांचे कांहीं आक्षेप असले तरी त्यांतील बरेचसें ते कबूल करीत; पण त्यांचें म्हणणें असें कीं, "ज्या क्रिया नैसर्गिकरीत्या होत असतात, त्यांचा क्रम शास्त्रज्ञानानें बदलून एकएक मागील स्थिति रासायनिक परिणामानें कोणत्याहि जीवाला प्राप्त करून देतां येईल."

आणि हें सिद्ध करण्यामागेंच त्यांनीं आपलें सारें एकाकी आयुष्य ईरेस पडून घालविलें होतें.

आज हिरवें व तांबडें मिश्रण एक करतांच, त्यांनीं कल्पना केलेला जांभळ्या रंगाचा वायु येऊं लागला. त्यांच्या आनंदाला सीमाच नव्हती!

मिश्रणांतील एक थेंब मोठ्या टबमधील पाण्यांत टाकतांच, आंतलें पाणी जोरानें उसळून आलें. ग्यॅस उडूं लागला.

डॉक्टरांचें हृदयहि आनंदानें उसळलें. हातांतील मिश्रणाप्रमाणें एका मोठ्या चंबूंत बरेंचसें मिश्रण तयार केलें होतें; त्याकडे पाहून ते मोठ्यानें, अगदीं खदखदां हंसले. आपला हा नवा शोध कोणाला तरी दाखवावा म्हणून ते माणसाच्या शोधार्थ धावूं लागले.

"जगू! जगू!" म्हणून स्वैपाक्याला हांक मारीत ते धांवत सुटले.

तोच दुसऱ्या खोलीच्या दाराशींच त्या दोन नवख्या मानवी व्यक्ती मध्येंच पसरलेल्या त्यांनीं पाहिल्या. एक जाडी व एक रडी!

रड्या घाबरून रडूं लागला!—

जाड्या हातांतील लांब केरसुणी सरसावून मारामारीच्या पवित्र्यांत उभा राहिला.

डॉक्टरांचें कोठेंच लक्ष नव्हतें.

"कोण तुम्ही?...बरं पण तें असो. अरे वेड्यानों, मी शेवटीं यशस्वी झालों! या! माझ्या मागून या!" ते आपल्या पांढऱ्या दाढीवरून हात फिरवीत घाईघाईनें म्हणाले; नि आपल्या रसायनशाळेकडे चालूं लागले.

जाड्यानें रड्याकडे पाहिलें. रड्यानें तोंड वांकडें केलें; मान खालीं केली.

जाड्यानें निर्णय घेऊन डॉक्टरांच्या मागून हळूहळू पाऊलें टाकावयास सुरवात केली. रड्याहि बिचारा त्याच्यामागून जाऊं लागला.

त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होतें—"चला बापडे! जाऊं या कीं; माझं कुठं काय म्हणणं आहे?"

डॉक्टरांनीं जातांना एक कोंबडी बरोबर घेतली; मोठ्या टबमध्यें आणखी पाणी घातलें; आणि ते दोघांची वाट पहात उभे राहिले.



हातांत हात घालून ते दोघे आंत येत होते.

बाटल्या, कपाटें, टेबलें...बापजन्मीं त्यांनीं कधीं हें पाहिलं नव्हतं!

तेव्हां दोघे शेवटीं एकमेकांकडे टकमक पाहूं लागले.

"चला, चला,...वेळ घालवूं नका!" डॉक्टर अधीर होऊन शेवटीं म्हणाले—"आज मी एक भयंकर व महत्वाचा शोध लावला आहे. हें या चंबूंतील औषध पहा. यांतील एखादा थेंबहि भयंकर घडामोड करूं शकेल. आतांच पहा! ही कोंबडी पाण्यांत टाकली..."

असें म्हणून त्यांनीं कोंबडी पाण्यांत सोडली; तिला एका हातानें दाबून धरून कशीबशी तिची धडपड त्यांनीं थांबविली; नि दुसऱ्या हातानें ट्यूबमधील दोन थेंब त्या पाण्यांत टाकले!

पहातां त्या भल्या मोठ्या टबमध्यें भयंकर प्रलय सुरू झाले!

पांढरा, हिरवा ग्यास...मोठमोठे बुडबुडे नि चमत्कारिक खळबळ!

आवाजानें सारी खोली भरून गेली.

जाड्यापेक्षां रड्याच जास्त भेदरला. ती खळबळ थांबेपर्यंत ते आळीपाळीनें एकमेकांकडे व टबकडे आश्चर्यानें पहात होते!

खळबळ थांबतां थांबतां त्यांनीं आंत पाहिलें; तों कोंबडीचे एक अगदीं लहानसें पिल्लूं पाण्यावर तरंगतें आहे!

रड्याला वाटलें—'बिचाऱ्याला बाहेर काढावं.' पण इतक्यांत त्याल वाटलें, 'आपल्या हाताचं कांहीं झालं तर?' त्यानें दचकून हात आंवरला.

डॉक्टरांनीं निष्ठुर होऊन आणखी एक थेंब आंत टाकला.

पुन्हा तसलीच खळबळ!...रड्या रडूंच लागला!

पण लौकरच टबांतील सारें वादळ थांबलें.

पाण्याच्या तळाशीं एक मोठें अंडें तेवढें दिसत होतें.

जाड्याला आश्चर्य वाटलें. रड्याला वाईट वाटलें.

डॉक्टर म्हणाले, "हा माझा महत्त्वाचा प्रयोग! डार्विनच्या शोधानंतर तो जगांत सगळीकडे क्रांति करील!"

त्यांच्या बोलण्याकडे दोघांचेंहि लक्ष नव्हतें. डॉक्टरनां वाटलें, "काय लेकाचे ! अरसिकेषु कवित्व"...

ते पुन्हां धांवत सुटले. त्यांना वाटलें, 'जगूलाच तो प्रयोग दाखवावा.'

ते ओरडत सुटले—"जगू ! जगू !"

त्या मोठ्या प्रयोगशाळेंत हे दोघे आतां एकटेच !...समोर मोठें टब; आणि त्याजवळच एक स्टूल.

एका कोंपऱ्यांत एका मोठ्या कांचेच्या बाटलींत मोठा सोनेरी मासा खालींवर पोहत होता; रडयाचें लक्ष तिकडेच वेधलें.

"हा मासा पाण्याच्या सपाटीखालीं किती फूट असेल ?" मोठ्यांत मोठा बिकट प्रश्न त्याच्या डोक्यांत पहिल्यानेंच उद्भवला; व लगेच त्यानें जाडयाला तसें विचारलेंहि.

"श्शूऽऽ" त्यानें त्याला दटावून गप्प केलें. "डॉक्टरच कोण मोठा आला !" जाडयाला वाटलें. त्यानें त्या माशाकडे आशाळभूतपणें पाहिलें.

जगांत असो नसो, त्या नव्या प्रयोगानें जाडयाच्या मनांत तरी भयंकर क्रान्ति केली होती.

जवळच्या स्टूलावर त्या भयंकर औषधाचा चंबूहि कांठोकाठ भरलेला त्याला दिसत होता.

त्यानें जाहीर केलें "बस्स् ! ..या माशावर प्रयोग करायचा !"

"बरं आहे ! माझं कुठं काय म्हणणं आहे ?" रडया कपाळाला थोडया आंठ्या घालून, माथें खाजवित अगदीं शांतपणें म्हणाला.

जवळच्या चिमठ्यानें जाडयानें अंडें हळूच बाहेर काढलें. औषधाचा चंबू जवळ आणून ठेवला; व दोघांनीं मिळून तो मासा असलेली मोठी बाटली उचलून आणली.

जाडयाचा रडयावर विश्वास नव्हता. तो औषधाचा चंबू आपल्या हातीं घेऊन तो स्टूलावर उंच उभा राहिला.

"हूं ! आण ती बाटली इकडे !" जाडयानें रडयाला हुकूम फर्मावला.



पेलत नव्हती तरी रडयानें रडत कुंथत ती बाटली उचलून धरली !

"हूं ! टाक तो मासा आंत !" जाड्यानें दुसरा हुकूम पुकारला.

बाटलीच्या भारानेंच रड्या आधीं चेंगरला होता. रडकुंडीस येऊन त्यानें "नाहीं" अशीं मान हलविली.

"मूर्ख कुठला ! बरं, ती बाटली नीट तरी धरशील का ?" जाड्या थोड्या रागानेंच ओरडला. एका हातांतला चंबू संभाळून तो बाटलींतील मासा पकडूं लागला. सुळसुळीत मासा हातीं येणें बाजूसच राहिलें.

रड्याच्या हातची बाटली मात्र एकदम हलल्यामुळें जाड्याचा स्टूलावरून झोंक गेला; आणि...

"अरे अरे !" म्हणून रड्या मोठमोठ्यानें ओरडण्यापूर्वींच, हातांतील औषधाच्या चंबूसह जाड्या टबमध्यें उताणा पडला !

रड्याचें तर धाबेंच दणाणलें ! त्याच्या हातांतील बाटली खालीं पडून केव्हांच फुटली होती.

इकडे हवेमध्यें भयंकर मोठा प्रलयकाळ सुरू झाला होता. हिरवे, निळे, जांभळे, वायु वर जात होते ! उकळत्या पाण्यापेक्षांहि ती खळबळ मोठी होत होती. भोंवतालच्या दाट वाफेमुळें टबहि दिसेनासें झालें !......

"आतां मीं काय करूंऽ ?" म्हणून ओरडत, रड्या बिचारा मुळूमुळू अश्रू ढाळीत होता.

त्याचे व जाड्याचे नेहमीं खटके उडत; तरी तो त्याचा अनेक वर्षांचा मित्र ! जाड्यावरील संकट तें रड्यावरचेंहि !—

रड्याच्या अश्रूनें भरलेल्या डोळ्यापुढें, कोंबडी,...कोंबडीचें पिल्लूं, अंडें...असें सारखें एकच एक दृश्य दिसूं लागलें होतें.

"ते तर तीन थेंब टाकलेले ! हा सबंध चंबू ! !" त्याला आठवण झाली; आणि तो मोठ्यानें रडूं लागला !

—त्याला पुन्हां पुन्हां वाटे, "आतां मी काय करूं ?"

शेवटीं पाण्यांतील खळबळ थांबली; हिरवे निळे ग्यास ओसरले !...

रडया रडें आंवरून टबकडे उत्सुकतेनें पाहूं लागला,—

पण जाडया कांहीं रडयाला दिसेना !

त्यानें दुःखातिरेकानें तोंड फिरविलें. असेल नसेल, इतक्यांतच—

एक लहानसें पण लठ्ठ माकड—पायांत लांडी विजार, अंगांत आंखूड कोट, डोक्यांत लहानशी फाटकी टोपी अशा थाटांत—पाण्याबाहेर पडलें नि एकदम स्टुलवर चढलें.

रडया केवढ्यानें तरी दचकला; त्याची अगदीं निराशा झाली.

तो मोठ्यानें शोक करूं लागला...''अरेरे, ! प्रिय मित्रा, तूं मला सोडून कुठें गेलास ? '

त्याच्या डोक्यांत विचार आला, ' थोडं पुढें जावं; नि माकडालाच विचारावं सारं ! '

आपल्या सरळ स्वभावाला अनुसरून त्यानें जवळ जाऊन त्या माकडाला विचारलें, " माझा मित्र कुठं ? माहीत आहे तुला ? "

" चूप, निर्लज्जा !" तें लठ्ठ माकड एकदम ओरडलें; रडया दचकला.

"मला ओळखलें नाहींस ?" पुन्हां आवाज आला, "माकड म्हणतोस मला ?"

रडया तर तत्काळ तेथल्या तेथें गारठल्यासारखाच झाला.

आपल्या मित्राजवळ व आपल्या मित्राविषयीं, त्याला पुष्कळ बोलावयाचें होतें. पण मग त्या माकडानेंहि त्याला तसा दम द्यावा ना ?

शेवटीं तो आगतिकपणें मान खालीं घालीत, पण रडक्या तोंडानें उसासा टाकून म्हणाला—" हंः ! बरं आहे बाबा ! माझं कुठं काय म्हणणं आहे ?"...

बिचाऱ्याला डॉ. वरुणतीर्थांच्या प्रयोगाची नि माणसाच्या मूळ पूर्वजांची खरी कल्पना आली नव्हती ! !...

[ मध्यवर्ति कल्पना इंग्रजी फिल्मवरून ]



# शास्त्रज्ञाचा शेवट

" वाः ! जवळ जवळ अर्धा इंच !" हालअपेष्टांनीं सुकलेल्या त्याच्या चेहऱ्यावर पसरलेलें हास्य व तोंडांतून बाहेर पडणारे ते उद्गार त्याचा त्या क्षणींचा विजयानंद दाखवीत होते.

त्याचें काटकोळें शरीर अभिमानानें फुगलें; जाड कांचांचा चष्मा दोन बोटांच्या चिमटीनें नाकावर नीट बसवीत तो पुन्हां कांहींसें अस्पष्ट पुटपुटला.

हातांतील घडीच्या फुटपट्टीनें समोरच्या चमत्कारिक सशाचें काळजीपूर्वक मोजमाप घेत त्यानें त्याचें निरीक्षण पुढें चालविलें.

एकेकाळचा मेडिकल कॉलेजचा हुशार विद्यार्थी ! पण सूक्ष्म जंतूशास्त्राच्या अभ्यासास सुरवात होतांच त्यानें कॉलेज सोडलें होतें. पूर्वीपासूनच ' छूछ आनामें कोइबी चीज उठाव ' असल्या तऱ्हेची ' सहा-आणे-बाटली '-प्रॅक्टीस करण्याची कल्पनाच त्याला असह्य वाटे !...

त्याच्यापुढें एकच मोठी महत्त्वाकांक्षा होती. सूक्ष्म जंतूशास्त्रांत अपूर्व क्रांति घडवून आणणें !

वेळोवेळीं कॉलेजांतून लंबे केलेल्या उपकरणांवर त्यानें लागलीच आपला शास्त्रीय संसार तर थाटला. पोटाची खळगी भरण्याच्या आशेनें वळवळणाऱ्या व परीक्षागिरणींतून सांच्याप्रमाणें बाहेर पडणाऱ्या 'म्हाताऱ्या तरुणांची त्याला ' मनापासून कींव येई ! आणि म्हणूनच नेहमींची रुळलेली चाकोरी लाथाडून, निरनिराळ्या सूक्ष्म जंतूंच्या अभ्यासांत, सूक्ष्मदर्शकयंत्राच्या नळीमध्यें तो डोळे खुपसी; प्रचंड संशोधनात्मक टिपणें लिहिण्यासाठीं रात्रीचे दिवस करी !

नळबाजारासारख्या मुंबईतील बकाल वस्तीत त्याचें वास्तव्य ! एका जुनाट इमारतींत रस्त्यापेक्षां दहाबरा पायऱ्या खालच्या तळघरवजा जागेंत, एक हॉल रिकामा दिसतांच तो मिळवून, त्यानें त्यांतच आपलें स्वयंपाकघर, प्रयोगशाळा, उठाबसावयाची खोली, सर्व कांहीं एकदम थाटलें होतें !

एका लहानशा फटींतून प्रकाशित होणाऱ्या कोंपऱ्यांत त्यानें एका उंच खाक्यावर त्याच्या सबंध प्रयोगशाळेचें भूषण असें आपलें किंमतवान् सूक्ष्मदर्शक यंत्र ठेवलें होतें. तीन खुरांच्या खुर्चीवर तो तोल संभाळून बसे; आणि आपल्या डोक्याला ताण देऊन, सूक्ष्म...सूक्ष्मतर जंतूंचा गोतावळा आपुलकीच्या भावनेनें शोधण्यांत तासचे तास घालवी !...

या गडबडींत तो स्वतःचा गोतवळा मात्र कव्हांच विसरला होता; तो स्वतःसहि बराचसा विसरला होता म्हटलें तरी चालेल ! कॉलेज सोडल्यानंतरचीं गेलीं तीन वर्षे, अनेक वेळां उपाशी, तर कित्येक प्रसंगीं पावाचे शिळेदुर्ळे तुकडे खाऊन, त्यानें काढलीं होतीं. 'पण या स्थितीचं वाईट वाटण्याइतकं भावना प्रधान आपण आतां राहिलेलों नाहीं; शास्त्राचा शेवट पहाण्याच्या उत्कटतेंत, आपल्या साऱ्या कोमलवृत्ती समूळ नाश पावल्या आहेत !' असेंच त्याला वाटे.

इतर व्यवसाय न करतां स्वतःचा निर्वाह, पशुखान्याची जोपासना, रसायनाची खरेदी, या सर्वाला पुरवावयाचा पैसा म्हणजे निर्धन अशिक्षित पित्यानें स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन त्याला दरमहा पाठविलेले तीसपस्तीस रुपये ! त्यावरच त्याची सारी मदार !...

अगदी निर्विकार वृत्तीनें तो बापाला लिही—"अभ्यास उत्तम चालला आहे. शेवटची परीक्षा लौकरच होईल ! या वेळीं पैसे शक्य तो जरा जास्त व लौकर हातीं येतील असे पाठवावेत."

असल्या अपराधाची जाणीव त्याला कधींच झाली नाहीं. स्वतःच्या किंवा पित्याच्या हालअपेष्टांनीं द्रवणइतक्या मृदु मनोवृत्ती त्याच्याजवळ आतां शिल्लक राहिल्या असतील तरच ना ? त्याच्यापुढें एकच होतें; शास्त्र! निष्ठुर ज्ञान-पिपासा !

आपल्या खोलीच्या प्रकाशित कोपऱ्यांत मांडलेल्या सूक्ष्मदर्शकाखालीं ठेवलेल्या व्हिटॅमिन्स किंवा जीवनतत्वांवर महिनेच्या महिने तो रात्रंदिवस



विचार करी; त्यानें यशस्वी रीतीनें एका प्रयोगाचा शेवटहि गांठला होता. या जीवनतत्वांचा अर्क, बकऱ्याच्याच पिटयूटरी पिंडापासून प्रथमच काढण्याचें सारें श्रेय, त्यानें संपादिलें होतें. मात्र या जीवनार्कांचा पशुजीवांवर काय परिणाम होतो हें त्याला आतां पहावयाचें होतें; नि त्याचाच अभ्यास करण्यासाठीं हल्लीं त्याच्या रात्रीच्या रात्री जागून जात होत्या.

निरनिराळे पशुपक्षी गोळा करून त्यानें एक स्वतःचा खाजगी झू तयार केला. अनेकविध प्राण्यांना जीवनार्क देऊन त्यांची वाढ कशी होतें, याचें तो सूक्ष्म निरीक्षण करी. या अर्कावर त्यांची वाढ इतकी झपाट्यानें व अतोनात होई, कीं जणूं काय ते आपल्या डोळ्यापुढेंच वाढत आहेत, असें त्याला वाटे.

या अकल्पित यशानें दिवसेंदिवस, जीवनतत्वाचा गड्डाच आपल्या हातीं आला आहे अशा तऱ्हेची त्याची समजूत बळावूं लागली.

अनेक प्रकारचे प्राणी त्याच्या या प्रयोगांना बळी पडले. कांहीं काळपर्यंत या अर्कांच्यायोगें त्यांची फोफावून वाढ होई; पण त्या मर्यादेनंतर, जणूं अर्कांच्या अजीर्णामुळेंच कीं काय तें सर्व पटापट मरून जात !

पण एवढ्यानें निराश होण्याइतका तो कच्च्या दिलाचा नव्हता. मनाला सुचतील आणि शास्त्राला पटण्यासारखें वाटतील असे नानाविध प्रयोग करावयास तो निरलसपणें सदा तयार असे.

अनेक पशू अशा तऱ्हेनें मेल्यावर त्याला कल्पना सुचली. संबंध एकच जीव जीवनार्कांनें पोसण्याऐवजीं मोठ्या प्राण्याला लहान प्राण्याचा अवयव जोडला तर तेवढ्याच जीवनार्कावर कदाचित् चांगला पोसूं शकेल काय ?

कॉलेजमध्यें असल्यापासूनच, वाकबगार शस्त्रवैद्य म्हणून त्याची ख्याति होती. एक सशक्त ससा पिंजऱ्यातून बाहेर काढून, त्यानें रहाटावर उड्या मारणाऱ्या पांढऱ्या उंदरांपैकीं एकाचे पाय त्याच्या पायाच्या सांध्यांशीं जोडले.

हा जोडण्याचा प्रयोग म्हणजे शस्त्रक्रियेची खरोखर कमाल होती. भिन्न रक्तांचे प्रवाह एकामेकांत मिसळविणें, एका हाडाच्या सांध्यांत दुसरें बेमालूम बसविणें, व दोहोंतील ज्ञानतंतूंचा एकोपा करणें ! पुन्हां हीं सर्व एकाच क्रियेंत साधावयाचीं !

प्रयोगानंतर प्रत्येक दिवशीं, तो मोठ्या आशेनें त्याच्या यशस्वितेची वाट पाही. पण शेवटीं त्याची निराशाच झाली.

बसविलेले अवयव नव्या शरीरावर कांहीं जीव धरीनात.

कितीदां तरी, कितीतरी निरनिराळ्या प्राण्यांवर हा प्रयोग करूनहि तो यशस्वी होत नाहीं असें पाहून त्याची विचारशक्ति जरा निराळ्या मार्गानें काम करूं लागली.

प्राणिशास्त्राच्या एका जुन्या पुस्तकांत, पशु व पक्षी यांच्या रक्ताविषयीं नवीनच माहिती मिळतांच, त्याच्या कल्पनेला पुष्टि मिळाली; त्याला वाटलें, कबुतर व ससा यांच्या अवयवांचा मिलाफ लवकर होईल.

त्यानें त्याप्रमाणें त्याच्या खुराड्यांतील एका कबुतराचे पाय सशाशीं कलम केले व योग्य अवधि जावयाची तो वाट पहात बसला.

ते चार दिवस त्यानें अगदीं अशानिराशेंत काढले. पण पांचव्या दिवशीं सकाळीं त्यानें सशाकडे पाहिलें तों त्याला काय दिसलें ? ते कबुतराचे पाय सशाच्या शरीरावर जिवंत होते; एवढेंच नव्हे, तर त्यांची बरीच वाढहि झाली होती. त्या दिवशीं त्याचा आनंद अगदीं गगनांत मावेना !

पण एवढ्यानेंच तो समाधान पावला नाहीं.

'पायाला पायच जोडण्याऐवजीं सशाला कबुतराचे पंख जोडले तर ?'

शेवटीं त्यानें अलगद सांध्यासकट पंख काढून सशाच्या खांद्यांशीं कलम केलें. तीनचार वेळां अपयश आलें; पण त्यानें चिकाटी सोडली नाहीं.

एकामागून एक केलेले सहा प्रयोग अयशस्वी झाले होते. शेवटचाच म्हणून ठरविलेल्या या सातव्या प्रयोगाची आज अगदीं धडधडत्या हृदयानें त्यानें पहाणी चालविली होती.

बांधलेली मलमपट्टी सोडतांच, आश्चर्य, आनंद, भीति सर्व एकदमच वाटून, क्षणभर तो गोंधळला. कलम केलेले कबुतराचे पंख सशाच्या शरिराशीं बेमालूम बसले होते. त्यानें जास्त चिकित्सकपणें पहातां त्याला समजून आलें, कीं, मादीचाच पंख सशाच्या मादीला लावण्याची आपण काळजी घेतली असल्यामुळें आपण या वेळीं यशस्वी झालों. पंखाकडे जास्त निरखून पहातां ते झपाट्यानें वाढीसहि लागले असल्याचें त्याच्या दृष्टोत्पत्तीस आलें.



स्वतःच्या प्रयोगाची ती यशस्विता पाहून त्याचें काटकोळें शरीर अभिमानानें किंचित् फुगलें. हातांतील घडीच्या फुटपट्टीनें माप घेऊन समोरच्या सपक्ष सशाकडे कौतुकानें पहात तो हंसऱ्या चेहऱ्यानें उद्गारला —" आठ दिवसांत दोन इंच ! म्हणजे महिन्यानें "...

टेबलावर अस्ताव्यस्त पडलेल्या सामानांतून एक टांचणी घेऊन सशाचें व त्या पंख नसलेल्या कबुतराचें एक एक थेंब रक्त, त्यानें परीक्षाकांचेवर ( slide ) घेतलें व निरीक्षकदृष्टीनें तो सूक्ष्मदर्शक यंत्राकडे वळला.

आज तीन महिन्यांनीं त्याच सशापुढें तो प्रयोग करीत बसला होता. वाढलेले पंख, सशाचें अंग साफ झांकून टाकण्यांइतकें मोठे झाले होते.

त्यानें एक पंख हातांत धरून आपल्या बाजूस ओढला. सशानें तो लागलीच आपल्या बाजूस मिटण्याचा प्रयत्न केला; पंखांच्या ज्ञानतंतूंची शक्ति आजमावण्यासाठीं, त्यानें जवळचीं टांचणी चटकन् सशाच्या पंखांत खुपसली.

एकदम पंख फडफडावून सुटकेसाठीं बाजूस उडी मारतांच, ससा हात दोन हात उंच उडत, खोलीच्या दुसऱ्या कोपऱ्यांत जाऊन कोसळला.

हें दृश्य पहातां पहातां, त्याचा नेहमीं पोलादी अडसराप्रमाणें घट्ट बसणारा खालचा जबडा आश्चर्यानें एकदम सैल पडला; त्यावर सूक्ष्म हास्य झळकलें.

प्रयोग करणाऱ्या शास्त्रज्ञाची निर्विकारता त्याच्या डोळ्यांतून नाहींशीं झाली; नव्या खेळण्यावर कुतूहलानें झडप टाकणाऱ्या लहानग्या उतावीळ बालकाच्या डोळ्यांतील अधाशी चमकच तेथें दिसूं लागली.

त्यानें घाईघाईनें ससा पिंजऱ्यांत कोंबला व सर्व उपकरणें जागच्या-जागीं टाकून तो जवळच्या मोडक्या आरामखुर्चीवर लवंडला.

त्याच्या कल्पनाचक्षूपुढें तो उडणारा ससाच सारखा दिसत होता.

मनांत नाना विचार तुंबळ करीत होते...'आपणा स्वतःलाच जर इतकं आश्चर्य वाटतं, तर सर्वसाधारण लोक किती आश्चर्य पावतील ?'

आणि स्वतःचें दारिद्र्य, आजपर्यंत भोगलेलें दुःख,...सर्व आठवू लागतांच त्याला निराळीच कल्पना सुचली !—" लोकांना वाटणाऱ्या या चमत्काराचा पैशांत मोबदला घेतला तर ? या सपक्ष सशाचं प्रदर्शन मांडलं तर ? आपलें जन्माचं

दारिद्य संपेल !  मोठमोठे  नवीन  प्रयोग,  कीर्ती...सर्वच  आपल्याला हां हां म्हणतां सुलभ होईल "—

तो आरामखुर्चीवरून उठला; ससा बाहेर काढून त्यानें त्याला वर उडवलें. पंख हलवीत छताजवळून जवळून खालीं पहात ससा उडत असतांना त्याच्या डोक्यांतील पूर्वीची वेडी कल्पना बाजूस सरूं लागली.

खदखदां हंसून खोलींत येरझारा घालीत तो आपल्याशीं म्हणाला, "पैसाऽ! पैसा !! तूंहि पैशाला बळी पडूं पहात आहेस !...माणुसकी मोहावरच जगते का ?...मूर्ख आहेस !...पण मग मोह जरा वरच्या कोटींतला तरी..."

त्याचा विचार चालला असतां तो ससा एकदम खालीं कोसळला, व पडतां पडतां त्याच्या खांद्याला घट्ट बिलगला.

त्याला वाटलें, तो आपल्याला जणूं काय कसलें तरी गुपीत, कसला तरी संदेश, सांगत आहे. 'अरे वेड्या, स्वतः उडण्याची शक्ति मिळव ! हा कांहीं तरी नवा अनुभव आहे खास !...'

आणि आतां त्याच्या डोक्यांत तो नवा विचारच वारंवार चमकूं लागला अगदीं अल्पावधींत तो दृढमूलहि झाला. त्यानें आपला फाटका कोट अंगावर चढविला, खोली बंद केली व तो बाहेर पडला.

त्याचे पाय नकळतच त्याला राणीच्या बागेकडे नेत होते.

परततांना त्याच्या एका कांखेंत दोन ससाणे व दुसऱ्या हातांत कांहीं दिवस पुरण्याइतकें फळफळावळ वगैरे खाद्य होतें. आंत येतांच दाराला कडी लावून त्यानें खोलीत असलेले दोन्ही दिवे लावले. त्यांच्या वाती मोठ्या करून तो आपल्या मोडक्या खुर्चीवर बसला.

सर्व सामसूम होतें. त्याची छाती क्षणाक्षणाला धडधडत होती.

शेवटीं त्यानें कठोर मनानें निश्चय केला; टेबलावरील सुई उचलली, व आपल्या दंडांत खसकन् खुपसली. आणि रक्ताचा एक थेंब परीक्षाकांचेवर घेऊन त्यानें तो पसरला व त्यावर तबकडी टाकली.

आणलेल्या ससाण्यांतील एकाच्या अंगांत तशीच सुई टोंचून त्याच्या रक्ताचा थेंबहि पूर्वीच्याच कांचेवर पसरला.



यंत्राचा केंद्र लावून तो ती कांच सारखी निरखून पहात होता...

कांहीं वेळानें त्याची कसलीशी खात्री होतांत एकदम उठून आनंदानें त्यानें टाळी वाजविली.

हात मागें टाकून येरझारा घालीत त्यानें कसलासा निश्चय कायम केला. कोकेनची बाटली, शस्त्रांची पेटी, बँडेज, वगैरे सर्व सामुग्री त्यानें जवळ घेतली; व दोन्ही दिवे खालीं घेऊन त्यांच्या उजेडांत तो पिंजऱ्याजवळ बसला.

पूर्वी परीक्षा घेतलेला ससाणा बाहेर काढून, त्याच्या पंखाजवळ त्यानें कोकेनचें इंजेक्शन दिलें. नळी बदलून आपल्या डाव्या हाताच्या खांद्यावरहि ती तशीच भोंसकली.

थोड्या वेळानें चाकूची तीक्ष्ण धार ओढून, त्यानें सांध्यापर्यंत आपलें हाड उघडें केलें. व तेथें मोठ्या कौशल्यानें आधींच कापून तयार ठेवलेल्या ससाण्याच्या डाव्या पंखाचें कलम केलें. बँडेजनें जखम घट्ट बांधून, त्यानें हात मानेंत अडकविला व तो आरामखुर्चीवर पडून विचार करूं लागला.

त्या रात्रीं त्याला झोंप आलीच नाहीं; अर्धवट झोंपेंत चमत्कारिक स्वप्नें पडत; आणि त्याला वाटे, 'आपण हवेंत भराऱ्या मारीत आहों; जगाचा क्षुद्र पसारा आपल्या अलौकिक शक्तीचें कौतुक करीत आहे !...आपण...'

सकाळीं उठतांच त्यानें तयार केलेल्या जीवनार्काचें एक पूर्ण इन्जेक्शन घेतलें. ठरल्याप्रमाणें खिडकींतून उजवा हात पुढें करून आलेली दुधाची बाटली घेतली. दिवसभर पाव-दुधाशिवाय कांहीं न घेतां सारखें आरामखुर्चीवर पडून रात्रंदिवस त्याचा विचार चाले.

सहा दिवस अशा तऱ्हेनें गेले. सातव्या दिवशीं सकाळीं त्यानें भीत भीत हाताचें बँडेज सोडलें.

जखम बरीचशी भरत आली होती. पण पंखहि टवटवीतच दिसत होता.

उजव्या हातानें त्यानें पंखावर टांचणी फिरवतांच, त्याला आपल्याच अंगावर कांहींतरी टोंचणारें फिरत आहे असें वाटलें.

तो एकदम चमकला. त्याच्या चेहऱ्यावर यशस्वितेचा आनंद झळकला.

त्याची खात्री झाली, आपल्या शरिराला एक पंख तर चिकटला.

जखम पूर्ण भरण्यासाठीं कांहीं दिवस थांबून, उजव्या हातावरहि तसाच प्रयोग करावयाचें त्यानें ठरविलें !...

नि त्या दिवसाची तो वाट पहात राहिला होता.

योग्य अवधि संपला होता. दोन्ही शस्त्रक्रिया यशस्वी होऊन ससाण्याचे पंख त्याच्या खांद्यावर जगले होते. जीवनार्काच्या रोजच्या नियमित खुराकावर ते चांगलेच पोसले जाऊन झपाट्यानें वाढतहि होते.

पायाच्या टाचेपर्यंत त्याची लांबी व हात दोन हात पसरतील इतकी रुंदी झाली होती. बाहेर अगर खोलींत असतांनादेखील तो हल्ली एक मोठा ओव्हरकोट घालून वावरत असे.

आपल्या पंखांकडे पहात रहावें; ते उघडून त्याची लांबीरुंदी मोजावी येरझारा घालाव्यात; मध्येंच स्मित करावें, मध्येंच हातवारे करून मोठमोठ्यानें हंसावें;...दिवसांनुदिवस त्याचें अशाप्रकारें सर्व चाललें होतें !...

आणि त्याचे नवीन प्रयोग ?

रसायनाच्या बाटल्या कितीक दिवस बुच लावलेल्या स्थितीतच पडल्या होत्या. शेवटच्या शस्त्रक्रियेनंतर निगा राखली न गेल्यामुळें, लखलखणाऱ्या चाकू कात्र्या, सुऱ्या गं न तांबड्या झाल्या होत्या. पशुखाना बराचसा मरणोन्मुख झाला होता. सूक्ष्मदर्शक यंत्र बापडें उजेडाकडे आशाळभूतपणें पाही; पण त्याच्यावर सांचलेली धूळ साफ होण्याचा कधींच योग आला नव्हता.

सर्व खोलींवरच प्रेतकळा पसरली होती; तर आंतील निरनिराळ्या वस्तू-विषयीं जास्त कशाला ?

हल्लीं, खोलींत असतांना, रात्रीचा बाहेर पडल्यावर,...केव्हांहि तो स्वतःचे पंख व त्यांच्या शक्तीची वृद्धि या मार्गे असे

एकाद्या जन्मदारिद्र्याच्या हातीं अनपेक्षित ठेवा यावा, तशासारखीच त्याची स्थिति झाली होती. ‘जगाला, मनवी जगाला जिंकलं !’ असें त्याला पुनः पुन्हा वाटूं लागलें होतें. त्याची शास्त्रीय दृष्टि नष्ट पावली होती; ‘अलौकिक शक्तींचा



जगांतील सर्वांत श्रेष्ठ मानव !...या घमेंडखोर दृष्टीनेंच तो स्वतःकडे व मानव !... जगाकडे पाहूं लागला होता !

मग तो आतां शास्त्रज्ञ होता कीं काय हा प्रश्न तरी कशाला ?

तेवढें कशाला ? मधून मधून त्याची मनोदेवताच त्याला सांगे—“ अरे ! पाहिलंस का ?...शास्त्रज्ञाचा अंत झाला ! क्षुद्र मनुष्य पुन्हा मनुष्यांत मिसळला...!”

पण पुन्हा तो मनाचें समाधान करी व म्हणे—“ नाहीं; मी शास्त्रज्ञ आहे, व जगाला नवीन कांहीं तरी शिकवणार ! जगाला जिंकून त्याचा राजा होणार...!”

त्याचे प्रयत्न चालूच होते. जोराजोरानें खोलींतच पंख हालवून तो उडण्याचा प्रयत्न करी. मध्येंच कधीं तरी त्याचे पाय जमिनीपासून सुटत, पण ते पुन्हा टेकतां टेकतां तो कोसळून खालीं पडे.

रात्रीची सामसूम होतांच तो ओव्हरकोट घालून बाहेर पडे. माहीमच्या बाजूचें ओसाड मैदान आतां त्याची प्रयोगशाळा झाली होती ! रात्रभर तो पंख हलवी व आपली नवीन शक्ति अजमावून पाही !

शुक्राचा तारा वर येऊं लागला, पहाटेचें थंड वारें वाहूं लागलें, कीं तो पंख मिटे आणि ओव्हरकोट घालून घराकडे परते.

नेहमींप्रमाणें माहीम स्टेशनवर उतरून तो मैदानाकडे वळला.

काळोखाचा दर्या पसरला होता; झाडेंसुद्धां जवळ गेल्याशिवाय दिसत नव्हतीं !...रस्त्याच्या कडेला तीन चार माणसें हंसत खिदळत बसलीं होतीं; पण त्यानें तिकडे लक्ष दिलें नाहीं.

रस्त्यानें जातां जातां त्याच्या डोक्यांत त्या दिवशीं करावयाच्या उड्डाणा-विषयीं विचार चालूं होते—“ मानवी इतिहासांतील असली ही अपूर्व गोष्ट, मी एक हिंदी शास्त्रज्ञ, आपल्या हिंमतीवर आज करणार आहे ! साऱ्या जगांत, हवेंत उडणारा मनुष्य असा पाहिला मीच ! ! मीच सर्वांत श्रेष्ठ ठरणार; सर्व जगावर माझीच हिकमत चालणार ! बुद्धीवर उभारलेलं शास्त्र व त्या शास्त्रानें जिंकलेलं हें जग ! शास्त्रज्ञाचंच राज्य जगावर चालण्याचे हे दिवस

आहेत ! देवाबिवाच्या जुनाट कल्पना..."

पण त्याच्या तोंडून पुढील शब्द निघण्यापूर्वीच, जवळ झालेल्या मोठ्या चाहूलीनें तो भानावर आला. सभोंवार पहातांच त्याला समजलें...

त्याच्या भोंवतीं गराडा घालणारे चारपांच मवाली त्याला दम देत तोंडानें दटावीत होते—"ठेरो ! सब कुछ निकालो चिपचाप !..."

तो क्षणभरच गांगरला; पण दुसऱ्याच क्षणाला त्याला आपल्या नवशक्तीची एकदम आठवण झाली.

त्यांना बिचकविण्यासाठीं तो एकदम ओव्हरकोट काढतां काढतां ओरडून म्हणाला, "देता है !...पेहले पीछे हटो !"

मवाली चमकून मागें सरकले. पण जरा जागा मिळतांच त्यानें कोट भिरकविला पंख पसरले, व हवेंत उडी मारली.

तो हवेंत वर वर जातांना पाहून, त्या सामसूम वातावरणांत, मवाली जास्तच घाबरले. "या अल्ला !" "आदमी या सैतान ?" असल्या उद्गाराबरोबरच, ते डोळे ताणून ताणून वर पहात होते.

दहापंधरा पंख मारून तो एका झाडाच्या शेंड्यापर्यंत उडाला; नि झाडाच्या बाजूस झेप टाकून एक फांदी पकडून त्यावर तो बसला.

लांबचा असा हा त्याचा पहिलाच उडता प्रवास असल्यामुळें, तो दमून धांपा टाकूं लागला होता !...

भीति व आश्चर्य यांचा पहिला भर ओसरल्यावर मवाल्यांना एक नवीनच क्लृप्ति सुचली. त्यांना वाटलें—'त्याच्या खिशांतील ऐवजापेक्षां, त्याला स्वतःच जिवंत हस्तगत करणंच जास्त फायदेशीर ! थोड्याच दिवसांत भरणार असलेल्या एच. ओ. एच. फेटमध्यें, हा उडता मनुष्य म्हणजे जगाच्या आश्चर्यांत पडलेली नवीन भर ठरेल !'

कल्पना सर्वांना पटली; आणि त्यांनीं त्याचा पाठलाग सुरू केला.

हुसकावयासाठीं झाडावर झुगारलेल्या बऱ्याच दगडांतील एक, एकाएकीं त्याच्या बरगडीवर बसला. जिवावर उदार होऊन पंख फडफडवीत त्यानें पुन्हां हवेंत उडी घेतली. उडतां उडतां जखमेंतून होणाऱ्या स्रावामुळें, तो एकदां मोठ्यानें विव्हळला ?



मवाल्यांनीं त्याचा पाठलाग चालूच ठेवला होता.

नुकत्याच उडूं लागणाऱ्या पक्षाच्या पाठीमागें एखादा ससाणा लागावा, तशी त्याची स्थिति झाली. धांपा टाकीत झाडाझाडावर मुक्काम घेत, तो त्यांच्या कचाट्यांतून सुटण्याचा अटोकाट प्रयत्न करीत होता.

घटकेपूर्वीचें त्याचें जगांतील श्रेष्ठत्व, जगाचें साम्राज्य, मालकी...सारें... आतां ढासळण्याच्या पंथाला लागलें होतें.

दमल्यामुळें शेवटीं त्याचे पंख गळावयाच्या बेतांत आले. क्षणाक्षणाला धीर सुटत चालला; 'आपण पकडलों जाणार !' या कल्पनेनें त्याचीं सारीं गात्रें जास्त जास्त शिथील होऊं लागलीं होतीं...

खालीं काळोखांत चमकणाऱ्या, खाडीच्या पाण्याप्रमाणें, त्याच्या निराशेनें व्यापलेल्या मनांत शेवटचीच आशा चमकली—"उड उड ! हें खालीं दिसणारं जग अगदीं लांबवर पसरलेलं असलं तरी त्यावर तुझ्या शास्त्राचा अंमल चालेल ! बुद्धिदेवता हीच या दृश्य जगाची जन्मदात्री ! जगाचं कोडं बुद्धिच एकटी सोडवूं शकेल !..."

पण या विचारांच्या उड्डाणाबरोबर, तो मात्र खालीं खालीं येत होता. क्षणाक्षणाला आपल्या पंखांची शक्ति खर्च करून, आपले खालचे वरचे दांत एकमेकांवर घट्ट आवळीत, आणखी कांहीं अंतर काढण्याचा त्यानें प्रयत्न केला.

पण शेवटीं एका रस्त्याच्या कडेजवळपासच तो निशःक्त होऊन बेशुद्धींत धाडकन् खालीं कोसळला.

भानावर आला तेव्हां त्याचें सर्व शरीर ठणकत होतें. कष्टानें मान फिरवून त्यानें सभोंवार पाहिलें; त्याचे हातपाय जखडलेले होते.

एका रिकाम्या गॅरेजमध्यें तो कैदी होऊन पडला होता. क्षणभर सारी वस्तुस्थिती त्याच्या ध्यानींच येईना. पण कांहीं वेळानें आधल्या रात्रीपैकींच एक मवाली त्याचें जेवण ठेवून पुन्हां दार बंद करून गेला.

तेव्हां कोठे त्याच्या डोक्यांत चक्क प्रकाश पडला.

शास्त्राचा शेवटच त्याच्यापुढें होता ! त्यानें आपलें स्वातंत्र्य गमावलें होतें.

रागाच्या भरांत त्यानें तें मेलेलें अन्न लाथेनें उडविलें; व त्याला कोंडणारा पत्रा हातानें बडविण्याच सुरवात केली. उत्तर नाही कीं कोणी मनुष्य

नाहीं ! पत्रा ठोकतां ठोकतां त्याचा हात मात्र हळूहळू मंदावत गेला !

त्याच्या समोरून नाना चित्रें जाऊं लागलीं...

' उडणाऱ्या ससाचें प्रदर्शन ' ही मागें त्याच्याच मनांत डोकावलेली कल्पना त्याला पुन्हां आठवली मात्र ! त्याचें धाबें एकदम दणाणलें.

त्याच्यासमोर त्याचेंच एक चित्र उभें राहिलें...

' पंख तघडून तो एका पिंजऱ्यांत बसला आहे. जाणारे येणारे लोक, लहान मोठीं मुलें, त्याच्यापुढे कोण शेंगा, कोणी चणें टाकत आहेत. कोणी काठी ढोंसकून त्याला उडविण्याचा प्रयत्न करीत आहे. कोणी माकड समजून त्याला टिवल्या बावल्या करीत आहे !...'

' शास्त्रानें मनुष्याची प्रगति होत आहे का ?...'

प्रश्नामागून प्रश्न त्याला भेवडावीत होते.

" आपण यांच्या तडाख्यांतून सुटणार कसे ?" ही विवंचना त्याच्यासमोर उभी रहातांच त्याला क्षणभर वाटलें, ' पोलिसांची मदत घ्यावी !'

पण त्यापूर्वी त्याला आपलें दुसरेंच एक चित्र दिसूं लागलें.—'

' त्याची जीभ व हातपाय कापलले आहेत. जिभेअभावीं घश्यांतून चत्मकारिक आवाज निघत आहे—पंख बांधून त्या जीवन्मृत हाडामांसाच्या गोळ्याचें, हातगाड्यांतून पैशासाठीं गांवोगांव प्रदर्शन भरीत, ते पोट जाळणारे भिकारी फिरत आहेत !—

" नाहीं, नाहीं !" असह्य होऊन तो मोठ्यानें ओरडला..." मग आतां असलं मेलेलं आयुष्य जगण्यापेक्षां "...

त्यानें कोपऱ्यांत पडलेल्या मोटरच्या हत्यारांच्या पेटींतून एक मोठा अणकुची दार स्क्रुड्रायव्हर बाहेर काढला...

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मवाल्यांनीं प्रदर्शनच्या ठिकाणीं त्याला नेण्यासाठीं दार उघडलें; तों तो शास्त्रज्ञ उपडा पडला होता !

स्क्रुड्रायव्हर त्याच्या पोटांतून आरपार पाठीकडे आला होता !

नि मरतां मरतां दुःखानें हलविलेले पंख, जमिनीवर सांचलेल्या धुळींत लांबवर पसरले होते ! !

शास्त्राचे; मानवी मनाचेही पंख धुळींत लोळत पडले होते !...

भराऱ्या...गगनभेदी भराऱ्या शून्यांत विलीन होऊन माती मातींत मिसळली होती ! !—

---






त्या बिलंदर चोरानें कांहीं समाजद्रोही भयंकर गुन्हा केला होता.

' मरेपर्यंत फांशी '...' मरेपर्यंत विजेची खुर्ची ' असाच कांहींसा न्यायदेवतेनें पुकार केलेल्या न्यायाचा आशय !

देहान्त शासन मात्र त्याच्या नशीबीं ठरलं होतं !...

त्या तुरुंगांतील तो डॉक्टर म्हणजे नुसता डॉक्टर नव्हे...मानसशास्त्राचाहि सखोल अभ्यास केलेला एक कल्पक विद्वान डॉक्टर होता तो !

त्याच्या डोक्यांत एक अगदीं अभिनव कल्पना आली. कैद्याचा देहान्त होणारच; तर एक मानसशास्त्रीय प्रयोग तरी करावा ! हीच त्याची ती अभिनव कल्पना !....मोठ्या प्रयत्नानें त्यानें आपल्या प्रयोगाला सरकारी परवानगी मिळविली ! ...

एका काळोखी खोलींत त्या कैद्याला त्यानें आणवलं. तिथं तांबडे दिवे मंद मंद प्रकाशत होते ! ..कोणी कांहीं बोलत नव्हतं. तो दुर्दैवी प्राणी भांबावून घाबरून आपल्या भोंवतालच्या साऱ्यांकडे पहात होता.

तेवढ्यांत,....डॉक्टर गंभीर चेहऱ्यानें पुढें झाले. त्यांनीं त्याच्या खांद्यावर आपला थरथरता हात ठेवला आणि ते त्याला हळूंच म्हणाले, " हतभागी जीवा, तुला आतां मिळालेल्या शिक्षेप्रमाणें मरावयास तयार झालंच पाहिजे !"

त्यांच्याकडे तो तसा भीतीनें बघत आहे, तोंच खोलींतले एकामागून एक सारे तांबडे दिवे विझत गेले; शेवटीं, एक तांबडा दिवा तेवढाच त्या मोठ्या थोरल्या काळोखी खोलींत गंभीर मंदपणें प्रकाशत राहिला !...

डॉक्टरांनीं त्या कैद्याला एका टेबलावर बसविलं व ते त्याच्या कानाशीं हळूं-हळूं पुटपुटले,—"दुर्दैवी प्राण्याऽ!...माझा कांहीं इलाज नाहीं!... आतां तुझी सजा तुला भोगलीच पाहिजे! तुझ्या आधीं आज, काल...गेल्या दोन दिवसांत या दिव्याप्रमाणेंच कित्येकांच्या जीवन-ज्योति...पट, पट, पट, करीत विझून गेल्या! आतां हा दिवाहि तुझ्या मृत्यूबरोबरच विझून जाईल!...मग कांहीं दिवस तरी या खोलींत काळोख...काळोख...! आणि मग—पुन्हां तांबडे दिवे—पुन्हां काळोख"

एवढं बोलून ते क्षणभर थांबले!....तो मृत्यूच्या जबड्यांत समजून उमजून शिरत असलेला कैदी, त्या काळोखांतील एकुलत्या एका तांबड्या दिव्याकडे, (आपल्या मनांतील भयंकर खळबळ आंतल्या आंत दडवून) टवकारून पहात राहिला. त्यानें दोन तीन मोठे निःश्वास सोडले...हळूंच एक भयसूचक चीत्कार केला आणि...

...

तोंच डॉक्टर त्याचे डोळे फडक्यानें बांधून म्हणाले, "थांऽब...तुझे आतां जरा देखील हाल होणार नाहींत....फांशीनें मनुष्य घुसमटतो!...विजेच्या खुर्चीनें अगदीं जिवंत जळतो...काडीसारखा ताठ होतो..."

कैद्यानें अंगावर शहारे आल्यासारखं केलं!...

डॉक्टर पुन्हां क्षणभर थांबून त्याला म्हणाले, "अगदीं दहा मिनिटांत बघ तुझी या जगांतून कमींत कमी त्रासांत सुटका होईल! एक अगदीं साधा प्रयोग...करीत आहे मी!"

त्या हतभागी जीवाची छाती वरखालीं होत होती!

तिकडे दुर्लक्षच करत क्षणभर थांबून डॉक्टर म्हणाले, "माणसाच्या पायाच्या घोट्यांत अशी एक अत्यंत लहानशी, सूक्ष्म केंसासारखी,...पण फार महत्वाची रक्तवाहिनी सांपडली आहे अलीकडे!...ती उघडी केली...कीं, भोंक पडलेल्या मडक्यांतून जसं सगळंच्या सगळं पाणी झिरपून जातं ना,...तसं तिच्यांतून मनुष्याच्या अंगांतील सगळं-अगदीं थेंब न् थेंब-रक्त झिरपून जातं! त्याचं हृदय अगदीं कागदासारखं चपट होतं! शेवटीं पटकन थांबतं ..नि तो दहा मिनिटांच्या आंत गतप्राण होतो!—फांशीचा त्रास नाहीं,.. विजेचा धक्का नाहीं;....फक्त एकदां सुरवातीला चाकूनें ती शीर तोडावी लागते ना, त्यावेळीं एकदां दुखतं तेवढंच...."



तोपर्यंत त्या कैद्याची वाचा तर बंदच झाली होती...

डॉक्टरांनीं त्याला झोंपवलं...त्याला फडक्यांनीं टेबलाला घट्ट बांधलं. नि मग डोळे बांधलेल्या त्या कैद्याला ते म्हणाले—अगदीं हळुवारपणें म्हणाले–"बाऽय बाऽय...अनफॉर्च्युनेट सोल!"

...

आणि त्यानंतर त्याच्या लुल्या पडलेल्या पायाच्या घोट्याला त्यांनीं चाकूनें एक लहानशी जखम केली; तिथं सुई टोंचली; ..कैदी भयभीत आवाजांत एकदां चीत्कारला;...त्याबरोबर त्याला किंचित दडपून ते म्हणाले, "थांब बांब-अरेऽ...संपलं सगळं!...आतां कांहीं राहिलं नाहीं तुझं दुःख! तुझा दूरदूरचाऽ स्वर्गाचा प्रवास....या....अगदीं या क्षणापासून सुरळीत सुरूं झाला बघ..."

डॉक्टर किंचित थांबले. मग पुढं ते आपल्या हस्तकांना उद्देशून हळूं हळूं बोलूं लागले,..."ही...ही पाहिलींत ना? हं! हीऽच, मी म्हणत होतों तीं रक्त-वाहिनी, बरं कां?...पाहिलींत ना?....आहे लहानच! नि सुरवातीला असं थेंब थेंबच गळणार रक्त! पण ..थोडं थांबा...पाहिलंत....आतां झाली ना लहानशी धार सुरूं...हं घ्या पाहूं तें भांडं इकडं!...काय?...अबबबब...किती जोरानें वाहूं लागलं होऽ आतां रक्त!...इतक्यांत अर्धं भांडंहि भरून गेलं कीं!...घ्या..घ्या...तें दुसरं....लौकर, अगदीं लौकर...लौऽकर....म्हणतों ना?"

किंचित काळ त्या खोलींत पुन्हां भीषण शांतता झाली... त्यावेळीं एखादी टांचणी पडली असती तरी आवाज ऐकूं आला असता!

कैद्याची छाती तर घणाचे ठोकेच देत होती!

...

मग डॉक्टर पुन्हा कैद्याची नाडी आपल्या हातीं धरून घाबरल्या आवाजांत म्हणाले,..."पाहिलंत!...याचा चेहरा कसा अगदीं भेसूर नी फिक्कट दिसूं लागला...नाडीहि अगदीं मंदावली...सारं शरीरच कसं लुलं...अगदीं साफ लुलं पडलं आहे नुसतं!.. ही पहा आतां तर नाडीहि मधून मधून थांबूं लागली याची!...हं...किती मिनिटं झालीं? . आठ?? झालंच तर मग आतां!...दोन मिनिटांचाच सोबती आहे म्हणायचा!...बरं...चला लौकर;...घ्या तें चौथं भांडं पुढं...अहो, हळुं हळूं!...सांडवाल!..."

# मानवी भूतदया

पंचवटीच्या सांडव्यावर नेहमींच गर्दी; पण बुधवारचा बाजाराचा दिवस म्हणजे तर तोबागर्दी ! पावलापावलाला धान्याच्या राशीच्या राशी;...बैल सोडलेल्या लांबट टपाच्या गाड्या उभ्या;...भाजी-बाजारांत टोम्याटो, काकड्या, पपई नी मेथीच्या 'झाडां'च्या जुड्या...हे ढीग पडलेले.

घरांतल्या वयस्क संसारी बायका, ...नी कुठं ना कुठं तरी मिरवूं इच्छिणाऱ्या फटाकड्या पोरीहि आतां बाजार करूं लागल्यामुळें आम्हां पुरुषांची साधारणतः सोय चांगलीच व्हायची ! पण कधींतरी आमच्याहि जिवावर बाजार बेतायचाच !... त्यावेळीं कपाळाला सत्राशें आंठ्या घालून, भर दहाच्या नाशकी उन्हांत बाहेर पडणं भागच...तिथं कसलं अपील नाहीं...

सांडव्यावरून झुळझुळणाऱ्या गोदा-गंगेच्या पाण्यांत पाय बुडवून कपाळाला गारवा आणून, पंचवटी गांठावी; ..मग नारोशंकराच्या घंटेकडून डाव्या बाजूस तोंड फिरवावं...नी थेट रामकुंडापर्यंत भाजीची पहाणी करत धिम्या चालीनं चालूं लागावं !...जणूं काय, सारा बाजार खरेदी करायला बाहेर पडलों आहों, हाच थाट तोंडावर असायचा.

...

. मग माणसांच्या गर्दीइतकीच पाटीवालणींची 'भाऊ'-गर्दी भोंवतीं जमायची...'ए भाऊऽऽ'चा आवाज कानावर पडल्यावर भोंवतीं या आपल्या बहिणी कोण कोण जमल्या आहेत तें पहायला लागावं, तों एक वीस-पंचवीस पाट्या नी त्याखालचीं प्रमदावदनं दिसूं लागत...



त्यांतलीं कांहीं ढालीसारखे कुंकवाचे टिळे लावलेल्या लेकुरवाळ्यांचीं;...कांहीं कपाळभर चिरी ओढलेल्या नवोढांचीं;...कांहीं बोराएवढ्या कुंकवाच्या नवाळलेल्या पोरसवदा पोरींचीं;..साऱ्यांचा जयघोष मात्र एकच..."भाऊऽऽमी आदी आल्यें बरं काऽऽ ?"

त्यांची ती आपापसांतील हंसत हंसत होणारी नंबराची चढाओढ, मारामारी नी शब्दाशब्दी !...कांहीं वजनी खरेदी करायची नसली तरी एखादी पाटीवाली ठरवावी अशी कोणालाहि त्या गोंधळामुळें नक्कीच स्फूर्ती व्हायची !—

अशा वेळीं,....जणूं काय, मुलगी पहायलाच आपण गेलों आहों अशा रुबाबानें साऱ्यांकडे पाहून त्यांतून कोणती निवडावी हा कोणत्याहि अवखळ तरुण मनाला प्रश्नच पडावा ..

त्या जीवनकलहाच्या धकाधकींत तरण्याताठ्या पोरी नेहमींच हां हां म्हणतां पुढं आघाडीवर दिसत !...त्यांच्यामागं लेंकुरवाळ्या, थोड्या नवल्या झालेल्या खेडवळ गृहिणी !...आणि त्यांच्यामागं धांपा टाकीत असलेल्या, वृद्धत्वाकडे झुकणाऱ्या, सुरकुतल्या तोंडाच्या,...पांढऱ्या कपाळाच्या,....थरथरल्या मानेच्या ...गरीब बिचाऱ्या !...

...

चटका...क्षणकाळ चटका लावणारी तारुण्याची मोहिनी ! तसले मनोमय चंचल विलास, अभावितपणें मनांत क्षणकाळ अवतरावेत यांत आश्चर्य कसलं ! पण मग वाटावं,...मानवा मनाच्या सर्वसामान्य हालचालींमुळें या तडफेच्या फटाकड्या तरण्याबांड पोरींना नी त्यांच्या शब्दांतील लाडुक झांकेला दुसरीकडे कुठंही यशद हात मिळेल !...त्यांचं कांहीं नुकसान होणार नाहीं एखाद्याच्या दुर्लक्षानें !—

मग आपली दृष्टी दुसऱ्या – त्याच्या मागच्या थराकडे वळणार !...संसाराचे टक्केटोणपे खाऊन त्रासलले त्यांचे चेहरे पाहून क्षणभर 'पाटी करावी' अशी मनाला इच्छा होणारच !...

पण मग त्या मागचा तिसरा थर दृष्टिपथांत येऊन आघाडीवरच्यांना ओरडून सांगावंसं वाटे, "चलाऽ ? पळाऽ!...एका लिंबासाठीं, दोन मेथीच्या जुड्यांसाठीं नी चार कोथंबिरीच्या काड्यांसाठीं पाटी करायला मी कांहीं कुबेर लागलेलों नाहींय् !....फळाऽ ! !"

त्या उद्गारांनीं पुढले दोन थर भोंवतीं अधिकच जवळ जमून कटकट करणार !....पण तिसऱ्या थरांतील एखाद-दुसरी—सुरकुतया पडलेल्या चेहऱ्याची–म्हातारी आपली पाटी डोक्यावर टाकून तोंड फिरवूं लागणार !...त्यांतूनच म्हातारपणींचं दुबळं मन डोकावतांना दिसणार ...!

तेव्हां मात्र लागलींच आंतूनच आपली घोषणा बाहेर पडणार...." ए !—एऽ!...म्हातारेऽ! !....चल ये ! पाटी घेऊन येऽ तुझी !.... "

भोंवतालच्या इतक्या मोठ्या घोळक्यांतून त्या म्हातारीलाच शेवटीं निवडून काढण्यांतला गाजरपारखी अरसिकपणा-दुसऱ्या कोणाला आवडण्याचा तो प्रश्न नसे....स्वत:ला तरी सुखद वाटे !—तरी पण ..कोणी भाई ते पहाता असता तर म्हणाला असता, " यांत नुसतां अहंपणा नी दुबळी भूतदया आहे मानवी मनाची ! दुसरं काय !—"

पण चालू समाज-व्यवस्थेंत तरी भूतदया....हो केवळ भूतदया...म्हणजे कांहीं गुन्हा तर नव्हे ?....'आपली उच्च परिस्थिती' या जाणिवेचा थोडा अहंपणा त्यांत असला तर त्यांतहि चुकल्यासारखं काय ठरावं ?

...

पण त्यावेळचा स्वतःचा अहंपणा तर यापुढेंहि मजल मारी !...तोंपर्यंत त्या-म्हातारीची नुसती निवड झालेली असायची;...अजून देण्याघेण्याचा प्रश्न शिल्लकच असायचा; तेव्हां मग प्रश्नोत्तरं सुरू व्हायचीं...

" मल्हार दरवाजा....काय घेणार ग ??—" " भाऊऽ...तुमी काय आजच पाटी करतां ?...रोज देतां तेवढंच द्या कींऽम्हातारीला...." " तें कांहीं नाहीं !...मागून तुम्ही नेहमीं वांदे करतां....पांच पैसे देईन !—" " काय भाऊ ?...दोन आने....सात पैस...सा पैस तर खरं ?" " यायचंय् कां पांच पैशांत ?..." " बरंऽ चल भाऊ, मग !...म्हातारीचं नाय् ऐकत, तवां...."

ती आपल्या फाटक्या पदरानें आपलं घामाघूम तोंड पुसून पाटी पेलीत पुढं आली कीं मनांत यायचं..." तिचे सात पैसे नी दोन आणे वावगे नव्हते... तरी पण—"



या अहंपणानें क्षणभर ग्रासून,...झटपट, कांहींच नाहींतर शेरभर टोम्याटो, पांच–दहा लिंबं....मेथी, मुळा, कोथिंबरीच्या जुड्या घ्यायच्या; तिच्या टोपलींत टाकायच्या....नी घराकडे परतायचं....

...

परत फिरतांना उन्हाच्या झळा वाटू लागत नि कंठाला शोष पडे...मग नारोशंकराच्या घंटेजवळ रसाच्या दुकानांत बांकावर बसकण घ्यायची. म्हातारीनें बापडीनें पाटी खालीं ठेऊन दुकानाच्या दारांत थपकल मारलेली...

तोंच रसाचं ग्लास सपवतां संपवतां, रसवाल्याला अगदीं नैसर्गिकपणें सांगायचं " त्या म्हातारीलाहि 'अर्धा' रस द्या हं !"

प्रथम ती आढेवेढे घेणार हें ठरलेलं ! ...पण मग त्यानें पितळेचे दोन पेले भरून ठेवले, कीं, आपल्याकडे चोरून एकदोन कृतज्ञ कटाक्ष टाकून आपलं किंचित बोलकं झालेलं तोंड हलवत हलवत ती रस पिऊन टाकी !—त्यावेळीं मनांतल्या मनांत खूप गंमत वाटून हंसूं यावं...

मग मिरची कोथंबिर भरलेली ती टोपली ( खूप जड आहे अशा मुद्दाम केलेल्या बहाण्यानें ) तिच्या डोक्यावर चढवायची नी तिनें "अरेऽ नकोरऽ भाऊ, घ्यईन मी !" असं म्हणून डोक्यावर ठेवत चालू लागायचं;....तिच्या ताब्यांतच नसलेलीं तिचीं अस्थिर पावलं चालतां चालतां वांकडींतिकडीं पडायचीं नी तिनें पुन्हां पुन्हां घामाघूम झालेला आपला चेहरा पुसायचा !....चालतां चालतां आपण तो गंमतीचा देखावा गपचूप पहात आपल्याशींच हसायचं !—

...

शेवटीं, घर गांठल्यावर तिच्या डोक्यावरून ती टोपली अलगद खालीं उतरायची !....ती जवळजवळ रिती टोपली पाहून ( चार चार भरलेल्या पिशव्याही लोंबकळत स्वतःच घरीं आणणाऱ्या ) काटकसरी चुलतीच्या डोळ्यांत डोकावतांना दिसणारा राग आपण निमूट सोसायचा—नी उलट बडरपणें काकूंना दुधाचा 'पाणी कम्' चहा करायला सांगायचं !....

पाय पसरून 'हुश्श' करीत म्हातारी गॅलरींत बसलेली पाहूनहि तिचे पांच पैसे द्यायची टंगळमंगळ करायची..." उशीर झाला रऽ भाऊ; मला माज पैसे देस.—" अशी तिची तीन चारदां झालेली कुरकुर ऐकल्यावर, तिला शेवटीं स्वतः

नेऊन पितळेचा पेला भरून चहा द्यायचा !....संकोचानें सुरवातीस 'नको नको' म्हणून शेवटीं ती तो मिटक्या मारीत पीत असल्याच लांबून पहायचं नी मग....

"पांच पैसे फार झाले ग तुला म्हातारे !" असं म्हणत तिला क्षणभर सौम्य राग आणून तिच्या हातांत प्रथम एक आणा व ती किलकिल्या डोळ्यांनीं नी सुरकुतल्या निस्तेज चेहऱ्यानें राग आणण्याचा प्रयत्न करून आपल्याकडे पाहूं लागली, कीं मागून एक आणा अगदीं अचानकपणें व तिला अनपेक्षित असा तिच्या हातांत ठेवायचा !

त्यामुळें ती एकदम दचकली, आनंदली,...."म्हातारा होरऽभाऊऽ तूं !" असे आशीर्वादात्मक उद्गार काढून हसली, कीं मनांत शेवटचं न्यारं समाधान मानायचं !...

...

आधीं कमी किंमत ठरवून तिला नाराज केलेलं...पै पै सांठवण्यासाठीं कित्येक दिवसांत ती रस प्याली नसेल तो पाजलेला ... घरीं आल्यावर अगदीं दुधाळ चहा तिला मिळालेला !—नी शेवटीं अगदीं कल्पनाहि नसतांना तिला एक आणा वर मिळालेला !—या प्रसंगमालिकेंत तिला सर्वप्रकारें अचानक सुख खास मिळालं असेल ....या कल्पनेनेंच आपल्या जीवाला खूप सुखसमाधान वाटायचं !....

नी मग आपली केवळ भूतदया, आपला अहंपणा देखील कोरड्या तात्विक शब्दापेक्षां आपल्याला अधिक अभिमानास्पद वाटूं लागायचा...नि म्हणून त्या पाठमोऱ्या हळूं हळूं नाहींशा होणाऱ्या...(लौकरच कायमच्याहि नाहींशा होणाऱ्या) आकृतीकडे किंचित आर्द्र डोळ्यांनीं पहात उभं रहायचं !...

...

माझ्या आयुष्याच्या प्रभात–कालखंडांत असले प्रसंग तीनचारदां तरी घडले असतील...तीनचार म्हाताऱ्या पाटीवाल्यांची मी अशी न्यारी निवड केली असेल....त्यांचे असे 'हाल' केले असतील....

त्या साऱ्या म्हाताऱ्या आतांपर्यंत मातींत मिळाल्या असतील !—पण त्यांच्या चेहऱ्यावरील त्या त्या वेळचे ते भाव...नी त्या सुकलेल्या आकृत्या ! त्या हृद्पटलावर अजूनहि खोल कोरलेल्याच वाटतात !—

आणि माझ्या मनांत अजूनहि त्या साऱ्या भुतासारख्या पुन्हां पुन्हां भरारून येतात जातात !—

---



# त्या पेढ्यांतलं अमृत

नोटीस मुलांपुढं वाचली, सही केली नि पुन्हां शिकवायला वळलों—तरी पण जाण्याऐवजीं चुळबुळ करीत तो किंचित् लाजून म्हणाला—" सर–सरऽ! जरा बाहेर येतांऽ??"

जरा गोंधळून मी त्याच्या मागून लगेच वर्गाबाहेर गेलों.

चौफेर शांत होतं; प्रत्येक वर्गातून शिकवण्याचा तेवढाच आवाज येत होता.

नोटिशीची वही खांकेत मारून आपल्या अल्पाकच्या काळ्या कोटांत त्यानें हात घातला. नि आंतल्या खिशांतून एक गुलाबी पुडी काढून माझ्या हातीं दिली.

तेव्हां त्या पुडीप्रमाणेंच गुलाबी झालेला त्याच्या हसतमुख चेहऱ्याकडे मी विस्मित नजरेनें पाहूं लागलों.

"काय रेऽहें?" अशा चेहऱ्यानें मी पुडी सोडूं लागलों—तेवढ्यांत तो घाईघाईनें म्हणाला..."हं हं ....इथं नको...घरीं सोडा, सर !"....

"कसलं बुवा गुपित ?—आहे तरी काय आंत ?"

"पेढेऽ !...मला मुलगा झाला,सर !!" तो लाजून खालीं हळूंच पहात कांपऱ्या आवाजांत म्हणाला.

"वा !—सुंदर बातमी !...पण एवढी मोठी पुडी ? काय, तुला काय वेड लागलंय्, यादव ?—आजची ही महागाई कोण ? तूं...सर्वांनाच जर अशा—"

फिरवणाऱ्या शिपायांच्याच जातीचा तो एक ! पण जाण्याच्या आदल्या दिवसापर्यंतहि कोणाला तें गुपित कळलं नव्हतं !—

तें मला समजल्यावर, मीच शेवटीं त्याला बाजूला बोलावलं; दोन रुपायाची नोट काढून त्याच्या हातीं दिली नि म्हटलं "अरे ऽ, लग्न करतोयस्... तर जरा जाहीर तरी कर तें; बाकीचेहि कोणी अहेर करतील...तेवढीच खर्चांत मदत !—"

पण माझी नोट खिशांत घालीत तो संकोची हंसून म्हणाला—"पण या नोटींत जी गंमत आहे ती त्यांत नाही, सर ! कशाला नसत्या भानगडी नि उपकार कोणाचे ?—कोणी म्हणायचं आपल्या लग्नाचं यानं लिलांव लावलंय म्हणून !— आपली परिस्थिती ती आपली—कोण कोणासाठीं हसत नाहीं, रडत नाहीं !....लग्न होतं एकदांच, माणसाचं ! —नि लग्नास खर्च हा व्हायचाच ! जाईल !...हीहि आपली नड निघून जाईल !—"

...

नि आज एका वर्षानें, आतां त्यानें आपल्या पहिल्या मुलाच्या बारशाचे हे पेढे वाटले होते; ते हे असे !

तेव्हां मला वाटलं...आपल्या कायम परिस्थितींतील साऱ्या बारकाव्यांची केवढी चाणाक्ष पकड घेतां येते, एकेकाला !—आपल्या आयुष्याची झांकली मूठ सव्वा लाखाची करून त्यांतलं सुख चवीनें चाखायची हीहि एक कलाच असते म्हणायची !—' शिपाई झालोंच आहोंत आपण, तर उत्तम शिपाई तरी होऊं ! ' हें रसरशीत मानव्याचं तत्व होतं यादवचं !—

नि मग त्यावेळीं दुसरंहि एक वाटलं मला—"आपल्या हातून अभावितपणें देखील घडणारं चांगलं,...दाखविली जाणारी निरपेक्ष स्नेहाळ सहानुभूति...यांचीं अमृत–बीजं कुठं तरी अकल्पितपणें रुजत जात असतात ! तें त्यावेळीं समजत नाही आपल्याला हें खरं !—पण त्या रोपटांचीच झाडं होतात; फुलतात; फळतात; नि त्यांचं अमृत पुन्हां अकल्पितपणेंच उलट आपल्यापर्यंत येऊन पोहोंचतं; तें आपल्याला चाखायला मिळतं !...तेव्हां मात्र आपण विस्मयानें दचकतों !"



आणि म्हणूनच, यादवच्या सांगण्याप्रमाणें, त्यानें मला आस्थेनें दिलेली ती पेढ्यांची गुपित–पुडी...गाजावाजा न करतां, न सोडतांच, मी दिवसभर खिशांत बाळगली; तिची गोड ऊब अनुभवली !...संध्याकाळीं घरीं गेल्यावरच ती सोडली. आनंदानें माझं अंग त्यावेळीं रोमांचित झालं ! जीवनांतला न्यारा अनुभव होता तो !

मग त्यातले तीन पेढे माझ्या गड्याला,....तीन माझ्या मुलाला, नि तीन माझ्या बायकोला दिले ! त्यांची गोड तोंडं माझ्या हृदयांत अगम्य गोडवा निर्माण करीत होतीं.

...नि उरलेली तीन मी स्वतः खाऊं लागलों—तेव्हां मला ते होते त्याहून शतपटीनें अधिक गोड वाटत होते....कारण ?...कारण असं...

—गरीबी, परिस्थितीची जाणीव, माणुसकी, स्वाभिमान, जिवंतपणा,... यांची संमिश्र लज्जत होती त्या पेढ्यांमध्यें !!—त्या पेढ्यांतलं तें अमृत आमच्या यादवच्या हृदयांतलं होतं; हो, नि थोडंफार माझ्याहि हृदयांतलं होतं—

---

# सौजन्याचं मोल !

माणसाचं मन शाबूत असलं तर तें कुठंहि–लहानसान गोष्टींत देखील–प्रतीति होईल !—

आपल्याला सिगारेट बिडी ओढण्याची संवय असावी ; नि एखाद्या वेळीं आपल्या खिशांत बिडी सांपडावी, पण काडी कांहीं सापडूं नये; मग अशावेळीं,... तलफ तर भागत नाहीं ती नुसती हातांत धरून !—रस्त्यांतून आजूबाजूनें जाणारा एखादा ‘ जागतिक बिडी-काडी-मंडळा’चा सभासद आपल्याला भेटावा, या हेतूनें आपली शोधक दृष्टि भोंवतीं फिरत असते. शेवटीं तो तसा भेटावा; त्यानें अगदीं आपल्या खिशांतून पेटीहि बाहेर काढावी;....पण त्यांत फक्त शेवटची एकच काडी—

यावरून मला अशाच एका प्रसंगाची आठवण होत आहे या वेळीं !....हो, त्या दिवशीं तोहि असाच एका काडीच्या जरुरीमुळ फिकिरींत पडला होता;....आणि मी—मोठी गंमतच झाली ती !....

...

पंचम जॉर्ज बादशहाच्या जुबिलीचा प्रसंग होता;....सारी मुंबानगरी दिव्यांनीं लखलखत होती. रस्ते तोबा गर्दीनें फुलले होते. आणि मी त्याच गजबजलेल्या जनसंमर्दांत चोहूं बाजूस स्वैर पाहात पाहात भटकत एकटाच फिरत होतों !—

मायबाप–राजाच्या गौरवार्थ चाललेली ती ‘दिवाळी’;....ती पहावयास जनसागर लोटणारच !...इलेक्ट्रिक हाऊसपासून तों क्राफर्ड मार्केटपर्यंत मी भांबावलेल्या नजरेनें सारं पहात आलों होतों, शेवटीं...मार्केटच्या दाराजवळ तो बसस्टॅन्ड आहे ना,... त्याच्याजवळ मी उभा राहिलों.



पायीं चालणारे झपझप चालले होते. मोटारींची रांग मात्र फ्लोराफाऊंटनपर्यंत पुढें तितकीच मागेंहि लागली होती !—जणूं खोखोचा खेळच तो !–भिडूंनीं वाटेल तिथं भिडावं, वाटेल तिथून धावावं; हार आलेल्या गड्यानें मात्र गिरक्या मारीत रस्ता कांटायचा !—श्रीमंतांच्या मोटारींवर असलं न्यारं ‘राज्य’ आलं होतं आज एकाएकीं !—

त्या प्रकाराचं मला अजाणतांच हसूं आलं;....कांहींशा यांत्रिकपणेंच माझ्या खिशांतील एक गरिबाऊ सिगारेट काढून मी ओढूं लागलों !—

असल्या एकाकी भ्रमणांत माणसाचे डोळे अगदीं चलाख असतात. माणसाचं मन जिवंतपणें व ग्राहकशक्ती प्रखर तल्लखपणें वांवरत असते !—आणि विचार तर भराभर भरारून येतच असतात,...अगदीं एकामागून एक!—

...

तसाच उभा राहून मी मुकाट्यानें पहात होतों; त्या चालणाऱ्या घोळक्यांची झपझप गती आणि त्या मोटारींच्या लांबलचक मालिकेंतील प्रत्येक दुव्याची थोड-थोड्या वेळानें ( पुढच्या मोटारीच्या गतीवर अवलंबून होणारी ) गचकेखाऊ प्रकारची प्रगती ! त्या असामान्य घटनेची मला तर मनोमय गंमतच वाटली !—

आणि केवळ सूडबुद्धीनें मी मनांत म्हटलं, “ बरं झालं, आतां तरी या लोकांचं नाक खालीं झालं कीं नाहीं ?—नाहीतर पावसाळ्यांत, आपल्याच वेगांत चालून, आम्हां गरीब पदचरांना रस्त्यांतील राडीचं सचैल स्नान घालणारी हीच ती उन्मत्त मोटारवाली मंडळी !—त्यांचीच जणूं गाढवी वरात काढली आहे कोणीतरी यावेळीं !—आणि आज तरी त्यांच्या पुढून दिमाखानें दिल चाहेल तसं जाण्याचा मान आम्हां सामान्य मानवांना दिला आहे !—”

त्या बिचारानें मी पुन्हां हसलों व जळलेली सिगरेट फेकून देऊन, दोन तीन अगदीं ‘ थंड्या पडलेल्या ’ मोटारींजवळून, अगदीं मोठ्या रुबाबांत आडवंतिडवं चालत गेलों !....

तोंच पुढल्या घोळक्यानें माझीहि गति खुंटली. व मी पुन्हां दुसऱ्या एका ठिकाणीं जाऊन थांबलों !—

...

तिथं उभ्या उभ्या समोर पाहिलं; तीं एक छोटी 'बेबी ऑस्टीन'!...किती सुंदर!....मालकाची सौंदर्यदृष्टी पुरेपूर दिसत होती तींत; आणि आंत बसलेलं तें तरुण युरोपियन (इंग्लिश असावं, मला वाटतं) जोडपं?....त्यांचा पोषाखहि तसाच सुंदर!....ती मोहक सडपातळ तरुणी त्याला अगदीं अनुरूप अशीच होती.

तरीहि, त्यांच्या बाजूस मी निर्विकार मनानेंच पाहिलं,...पण मग व्हील-जवळ बसलेल्या त्या तरुणाची तऱ्हेवाईक चुळबुळ पाहून, माझं लक्ष पुन्हां एकदम त्यांच्याकडेच वेधलं!—

—त्यानें एक सिगारेट तोंडांत धरली होती; पण ती पेटलेली मात्र नव्हती! तो कांवराबावरा इकडे तिकडे पहात, ती सिगारेट तशीच तोंडांत धरल्या धरल्या, प्रत्येक जाणाऱ्या येणाऱ्याला, दोन्हीं हातांनीं खूण करीत, अर्धवट बोबड्या शब्दांत पुन्हां पुन्हां प्रश्नार्थक विचारीत होता–"मॅऽअबाऽऽ? मॅ ऽऽ अबॉ ऽऽ?"

एक कोंकण्या आपल्याच नादांत दिव्यांचा लखलखाट पहात निघून गेला. धोतराचा सोगा हातांत धरून चालणारा एक गुजराथी भाई; तोंडांतील 'हिरवा धागा' फेंकून धूर सोडीत मोटारीकडे ओझरतं पाहिल्यासारखं तो करून पुढेंहि चालूं लागला...

त्या मोटारींतल्या तरुणाची ती हातातोंडाची असली हालचाल चार पांच वेळां झाली. पण अजूनहि न पेटलेली सिगारेट त्याच्या तोंडांत तशीच! तें पाहून, मग मात्र माझी खात्री झाली, कीं, त्याला काड्याची पेटीच पाहिजे होती. विकत घ्यायला खालीं उतरेन म्हणेल, तर मग पुढची मोटर हलेल व मग मागला ड्रायव्हर हॉर्न बोंबलवूं लागेल. बरं, गप्प बसावं तर सिगारेट पेटवतां येत नव्हती!–अशा मोठ्या पेंचप्रसंगांतच सांपडला होता तो!

...

समोरच पण जरा लांब अंतरावर असलेल्या इराण्याच्या गजबजलेल्या हॉटेलकडे एकदां निराश दृष्टी फिरवून, बिचारा मागील गादीवर टेकून स्वस्थ बसला!–तितक्यांतच त्यानें आपल्या बायकोकडे वळून पाहिलंन्; दोघांचीहि दृष्टिभेट होतांच त्यांनीं मंद स्मित केलं!–आणि तीं पुन्हां गप्प बसलीं—

पण त्या त्याच्या स्मितयुक्त मौनांत विरस मात्र पूरपूर भरला होता.



माझ्याकडे त्याचं लक्ष नव्हतं. पण मी मात्र त्यांच्या त्या गुपचुप चाललेल्या हालचालींकडे, एका बाजूस निमूट उभा राहून पहात होतों—

प्रथम मला वाटलं, 'बरा खोड्यांत सांपडला आहे, बेटा!—स्वार्थासाठीं वेळेवर अशा हव्या तेवढ्या गयावया करतील लेकाचे!—पण एऱ्हवी चढेलच बेटे! बरं,....आतां नाही क्षणभर त्याला काडी मिळाली, तर जगाला काय आग लागणार आहे थोडीच?—आणि जीव नाहीं कांहीं जाणार आहे त्याचा! त्यांच्या क्षणिक चैनीची त्यांना किंमत [illegible] ऽ?...आणि ज्यांच्या जिवावर हे जगतात, ते आमचे हजारों दुर्दैवी देशी लोक अन्नाशिवाय—'

—पण मग मींच माझ्या या विचारमालिकेला धिक्कारून उपहासानें हसलों! मला पुन्हां वाटलं, 'माझा हा उगीचच,...कठोर, निराश, नि एकांगी त्रागा आहे!....यावेळीं केवळ एक धूम्रपी म्हणून तरी त्याला पाहिजे असलेली काडी कोणीतरी पुढें करावी ही साधीसुधी सौजन्याची,....माणुसकीची अपेक्षा आहे त्याची!– तिलाही तो माझ्यासारख्या 'जातभाई'कडून पारखा व्हावा कां?—'

...

केवळ असल्याच विचारामुळें, शेवटीं माझा हात नकळतच पटकन् माझ्या खिशांत गेला!—

पण माझ्या पेटींतहि दोनतीनच काड्या होत्या. मी त्याला पेटी पुढें करण्यासाठीं त्याच्या बाजूस चालूं लागतांच एक क्षणच मला पुन्हां वाटलं–"माझ्या दोन तनि काड्यांपैकीं मी त्याला एक देणार. तो आपली चैन पुढें चालूं करणार; आणि फार तर त्याच्या इंग्रजी रितीप्रमाणें तो मला म्हणणार–'थँक यू!'याहून जास्त, माझ्या विषयीं अगर माझ्या या क्षणींच्या इतक्या विविध भावनांविषयीं याला काय वाटणार आहे दुसरं?"

तरी पण मी पुढें झालों;....आणि माझी काड्याची पेटी मी अगदीं सहजपणें (पण त्याला अनपेक्षितपणेंच) त्याच्यापुढें केली!

किंचित चमकूनच त्यानें माझ्याकडे पाहिलं!–आणि मग वस्तुस्थीति एकदम जाणून, मोठ्या आनंदानें त्यानें तोंडभर स्मित केलं! नंतर शेजारच्या आपल्या

बायकोकडे स्मितयुक्त चेहऱ्यानें मान वळवून, त्यानें इतका वेळ तोंडांत नुसती धरून ठेवलेली आपली सिगारेट मोठ्या दिमाखानें पेटविली !...

त्यानें एक धुराचा भपकारा सोडल्यावर तीं दोघंहि माझ्याकडे आनंदी, संतुष्ट व हंसऱ्या अशा आपल्या मोहक चेहऱ्यांनीं पाहूं लागलीं।...

सारं कसं अगदीं मुकाट्यानें चाललं होतं !...मीहि कांहीं बोललों नाहीं !

पण काडीची त्याची गरज झाल्यावरहि, पेटी परत येत नाहींस पाहून, मला चटकन् संशय आला, 'पाहिलं !...माझी सगांची कल्पना खरी ठरली !...दोन काड्याच कां होईनात, त्या असल्या परिस्थितींत हातीं आल्यावर तो त्या मारणारच—'

पण त्या काड्या त्यानें तशा नेल्या असत्या, तरी माझं कुठं सर्वस्व चोरून नेणार होता तो ?—तो दुखावलेल्या भावनांचा प्रश्न होता एवढंच !–तेव्हां मनाची एकदम समजूत करीत मी आपला निमूटपणें परतूं लागलों !—

...

इतक्यांत, त्यांच्यांत कसलीशी दबल्या आवाजांत कुजबुज झालेली मला ऐकूं आली !–त्या दोघांचेहि चेहरे क्षणभरच गोंधळले ! तीं भांबावलेलीं दिसलीं !–

पण मग...दुसऱ्याच क्षणीं, त्या तरुणीनें आपल्या नवऱ्याला आपल्या उघड्या हाताच्या कोंपरानें हळूच सूचक स्पर्श केला;....माझ्याकडे व त्याच्याकडे पहात, पटकन् आपल्या हातांतील सुंदर पर्स उघडून, तींतून एक सुबक अशी नक्षीदार सोन्याची पेटी तिनें बाहेर काढली !–व ती त्याच्याकडे पुढं करीत, मला उद्देशून, हंसत हंसत पण भरकन् ती म्हणाली, "सेऽ प्लीऽज वेऽट !"

त्या त्यांच्या अनपेक्षित मुग्ध हालचालीचं मलाही आश्चर्य वाटलं ! मी परत फिरतां फिरतां जागच्या जागीं थबकलों !

आणि माझं आश्चर्य ओसरलं नाहीं, तोंच त्यानें ती सोनेरी पेटी पटकन् उघडली;...तीवर माझी एका काडीची ती पेटी ठेवली व तें सारंच माझ्या हातीं देत, तोहि हास्यमुद्रेनें मला म्हणाला, "विल् यूऽ? प्लीज डू !"

मीहि किंचित् भांबावून, त्याच्या शेजारच्या त्या तरुणीकडे पाहिलं. ती अगदीं हंसतमुखानं माझ्याकडेच पहात होती. आणि तिच्या नवऱ्यानें केलेल्या विनंतीस मी मान द्यावा अशा अर्थाचा आग्रहीभाव तिच्या त्या नजरेंत भरलेला दिसत होता.



मी माझ्या हातीं उघड्या असलेल्या त्याच्या त्या सोन्याच्या डबींत पाहिलं–तींतसुद्धां एकच सिगारेट होती !—

क्षणभरच मी घुटमळलों–पण मग तरीहि ती बाहेर काढली; त्यांच्या देखतच तिथं उभा राहून मी ती शिलगावली व रिकामी डबी पुन्हां त्याच्या हातीं दिली !—

तीं दोघंहि आनंदून म्हणालीं, "थँक्स !...मच् ओब्लाईज्ड !...."

...

—तोंच, बराच वेळ थांबलेल्या त्या मोटारमालिकेंतील पुढली मोटार हलली त्यानेंहि लागलीच आपली सुरू केली;...गियरचा आवाज झाला ! सिगारेट धरलेला हात वर करून मी त्यांच्याकडे हास्यमुद्रेनें पहात बाजूस झालों. त्या दोघांनींहि जातां जातां मागें वळून माझ्याकडे पहात मंद स्मित केलं !—

एकटाच दोन पावलं पुढं चालतां चालतां, त्या अनपेक्षित मिळालेल्या हातांतल्या सिगारेटचा मी एक झुरका घेतला. जवळच्या दिव्याच्या उजेडांत माझ्या चिमटीजवळच्या तिच्या टोंकाकडे मी सहज पाहिलं— '**555**' !

अतिशय आनंद वाटला होता मला त्यावेळीं !—मनांत विचार येत होता, "लेकाच्यांना चैनीची चटक,...स्वार्थ आहे; —पण त्यांच्याकडे सहानुभूती देखील भरपूर आहे; ...कृतज्ञता...त्यागहि ..आहे !–नवऱ्याबद्दलचा आपल्या मनांतील हा भाव दाखविण्यासाठीं ती तरुणी क्षणभरच किती घुटमळली ?–किती चटकन् तिनें त्याला पुढलं सारं सुचविलं. किती झटकन् त्यानेंहि तें ग्रहण केलं !–आणि आपली डबी व तींत असलेली एकुलती एक '**555**' शेवटीं किती अदबीनें व आस्थेनें त्या दोघांनीं मिळून माझ्यापुढें केली !—"

...

हा प्रसंग कदाचित् अगदीं किरकोळ, क्षुद्र वाटेल कोणाला !–पण मला तर तो फार फार महत्त्वाचा वाटतो,....चिरस्मरणीय वाटतो;....त्या तरुण जोडप्याविषयीं अगदीं कौतुक वाटतं; आणि मी अनेकदां मनाशीं म्हणतों, "हीं...हींच माणसांचीं मनं बरं !—क्षुद्र...क्षुल्लक गोष्टींतहि अशीं प्रतीत होतात !—"

या वस्तुस्थितीनें रंगलेली ती त्यांच्या सुवर्ण पेटींतील एकुलती एक शेवटची सिगारेट होती–म्हणूनच यावेळीं धूर व राख होऊन नाहीशी झालेली ती '**555**'

सिगारेट अजूनहि मला आठवते आहे...नाहीतर त्यानंतर अनेकवळां, मी त्याहूनहि भारी सिगारेट्स्, कधीं कधीं गंमतीखातर ओढल्या आहेत;...पण त्या कधीं कुठं व कोणत्या छापाच्या याची मला जरासुद्धां स्मृति नाहीं!---

धूम्र-रक्षा-रूपानें कोठल्याकोठें विलीन झालेल्या त्याच एका विशिष्ट सिगारेटची मला अशी आठवण रहाण्याचं कारण, त्या दिवशीं जळतां जळतां तिनें आपल्या भोवतीं निर्माण केलेलं वातावरण!—तिच्या धुराच्या लोटांबरोबर माझ्याभोंवतीं गजबजलेल्या माणसांचा तो प्रचंड कल्लोळ!—तसाच माझ्या मनांतहि त्यावेळीं अनेकविध विचारांनी घातला असलेला अपूर्व घाळ!...

मला पटतं,...ती सिगरेट म्हणजे माझ्या काडीची किंमत नव्हती! त्या जोडप्यानें माझ्या अकारण सौजन्याची...त्याच नाण्यांत, तत्काळ अगदीं वेळेवरच केलेली त्याची ती त्यागी परतफेड होती!—त्यांतच आदर्श माणुसकीचं प्रचंड प्रतिबिंब पडलं होतं!!

अमानुषालाहि अनपेक्षित मानवतादर्शनानें धक्का बसेल, भोंवळ येईल;...त्याच्या असल्यानसल्या हृदयाचं थोडंतरी पाणी होईल! मग मी तर सामान्य असलों तरी माणूसच होतों,...आहे!!

मग माझ्या त्या सौजन्याच्या मोलानेंहि माझ्या हृदयाचं पाणी माझ्या डोळ्यांतून क्षणार्धांत टचकन ओघळावं यांत आश्चर्य तं काय??...

---

उष्ण प्रकृती असणाऱ्या

सर्वांचा आरोग्यरक्षक

शीतल, शक्तिवर्धक,

आरोग्यदायक

# पर्ल काढा



आपल्या मुद्धां उपयोगी
पडेल. सर्व औषधी
विक्रेत्यांकडे
पर्ल काढा मिळतो.
एकदां वापरून पहा.

खर्चांत बचत करा व पैसा शिलकींत टाका

# सारस्वत
## को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

सुलभ आणि आकर्षक

**जनता बचत योजना**

व्याज २॥ टक्के

सविस्तर माहितीसाठीं लिहा अगर भेटा

शाखा:
फोर्ट, दादर, माहिम,
पुणें, बेळगांव.



स्थापना १९१८